नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी दिवाळी/८३



अनुक्रमणिका

दिवाळी '८३

विदर्भ साहित्य संघाचे सदस्य, हितचिंतक, युगवाणीचे लेखक, वाचक, वर्गणीदार, साहित्यिक आणि समस्त मराठीप्रेमी जनतेला ही दिवाळी सुखसमृद्धीची जावो.

– राम शेवाळकर
अध्यक्ष, वि. सा. संघ

– मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

– प्रकाश देशपांडे
संपादक, 'युगवाणी'



• संपादक : प्रकाश देशपांडे
• कार्यकारी संपादक : केशव जोशी
• संपादक मंडळ : भा. ल. भोळे, इंदुमती शेवडे, अ. द. वेलणकर, पंकज चांदे, अक्षयकुमार काळे

• विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.
• पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

इंदुमती शेवडे

‘ नो मोअर फ्लावर्स ’



ढगांच्या भराभर चिंध्या तरंगत येतात नि वर्गात शिरतात. पण मुलींचं लक्ष वेधत नाही. इथे ते दृश्य या ऋतूत नेहमीचंचय, टेबलाशी तिला वेढून त्या उभ्यायत.

रंगीत रेशमाची सुरेख टीप घालून तिने फांद्या पुऱ्या केल्या. लांबोळचा थेंबासारखे टाके... सारख्या लांबीचे... जणू मशीनने घातल्यासारखे मग लेझीडेझी टाक्यांत फूल करायला घेतलं...

मुलींच्या घोळक्यात कुजबुज सुरू होते... ती तिला अर्धवट ऐकू येते...

" किरण लुक एट हर फिंगर्स ! हाऊ लव्हली ?"

" सो स्लिम अँड आर्टिस्टिक...

" मालूम नही ? मॅडम जैसी उंगलियों-परसेही तो भिंडीको ‘ लेडीज फिंगर्स ’ नाम मिला..." सीमा.

" शू ऽऽ ! " ही मनजीत. वर्गात वयाने सर्वात मोठी. १३ वर्षांचीय्. अन मॉनिटर.

ही कुजबुज तिचे कान टिपत असतात. पण तिचं मन मोहरून येत नाही. टेबलक्लॉथ अॅनीच्या हातात देत ती म्हणते :

" कॅन यू डू इट नाऊ ?"

" येस, मॅडम ! " अॅनी जागेवर जाऊन बसते.

" टेक युवर सीट्स प्लीज..."

मुली आपापल्या बाकांवर जाऊन बसतात नि आपल्या ड्राईंगच्या वह्या काढतात.

ती उठते... रंगीत खडू घेऊन फळ्यासमोर उभी राहते अन् अलगद हाताने दोन नाचते मोर फळ्यावर काढते... एकात एक माना गुंतलेले... जॉमेट्रिक पॅटर्नमधले...

‘ सी ऽऽ ! ’ ‘ ओह ! ’ ‘ हाय ! ’ ‘ जादुई ! ’ दवलेले उद्‌गार वर्गात घुमतात...

" यू हॅव मेड इट सो ईझी मॅडम ", धाडस करून मनजीत म्हणते... ती धीटय, गोडबोलू... तिला चिकटायचा प्रयत्न करणारी...

" मग भराभर काढून या पीरियडमधेच संपवा ", ती रूक्षपणे सांगते...

मुली नाचणारे मोर काढत बसतात... पण तिचा मनमोर नाचत नाही. खुर्चीवर स्तब्ध बसून ती आपली निमुळती, लांबसडक बोटं पाहते...

अनुक्रमणिका

मग बाहेर पाहू लागते... आभाळात ढग सैरावैरा धावताहेत... दूर दिसणाऱ्या डोंगरांच्या रांगांना मधूनच विलगताहेत... वारा सुटलाय... त्यात झाडांच्या फांद्या डोलताहेत... मनात शब्द उमटतात–

'पाहून हे नाचणारे
आज कुठे मोरमन ?'

टेबलावर टेकलेले हात ती खाली मांडीवर घेते. ती 'हाऊ – लव्हली – स्लिम – आर्टिस्टिक' बोटं निरखते... मग चटकन् दुमडून घेते... या निरागस पोरींना ठाऊक नाहीय्... की हे हात शापित आहेत. ज्याला यांचा स्पर्श होतो त्यांच्या आयुष्याची माती होते...

पण खरं असतं हे असं ? हा हातगुण पायगुण, करंटेपण, शापित नशीब वगैरे ?

– लहान वच्चूचे ते डोळे... किती मोठाले, काळेभोर ! पण आपल्याला ते उगाचच मळकट, उदास वाटतात... खूप वर्षानंतर ताईला झालेलं ते पोर – केवढं कौतुक ? तिची मुलंच जगायची नाही... काही तर अर्धवटच. वच्चू जगला... आपल्या अंगी फार... शाळेतून आलो की आधी वच्चू... मग दुसरं काही... आजी रोज साग्रसंगीत न्हाऊ माखू घालायची... काजळतीट करायची...

"आजी, आज मी करते ना काजळतीट?"

"शशी, तुझं वय काय ?" आजीचा रागीट स्वर.

"अकरा–बारा."

"मग एवढ्या मुलींना काजळ घालणं जमत नाही ! एखाद्या दिवशी डोळे फोडून ठेवशील..." आजीचे अभद्र शब्द झोंबतात तरी आपण म्हणतो.

"जमेल ग, बघ तर खरी. अगदी अलगद, हलक्या बोटांनी लावीन..."

आजी आपल्याकडे, आपल्या हातांकडे पहाते. तिचा आपल्यावर भारी रोष. मी जन्मताच आई खाल्ली असा तिचा ग्रह. रागात असली की "मायखाऊ ! करंटी " म्हणायची. चिमटा बसायचा पण ऐकून घ्यायचो. आपल्या हातून वस्तू पडायच्या, फुटायच्या.

वाळंतिणीच्या खोलीतून ताईचा आवाज येतो.

"अग, आजी, घालू दे न तिला ? हौस आहे तर..."

"कारटी मेली 'बरं बैस,' आजी रागाने म्हणते– पण माझ्यासमोर घाल हो !"

आपण चाफेकळी बोट डबीत घालून दोन्ही डोळ्यात हळूच काजळ घालतो...

"जमलं ना, ? बघ..."

"हं जमलं... ठीकय्."

"मग उद्यापासून तुझ्याकडे आंघोळ, माझ्याकडे काजळ तीट..."

काजळ घालताना वच्चूचे डोळे दिवसें-दिवस गढूळ, मळकट होत चाललेयसं आपल्याला वाटतं. बोललं की तो हसायचा...पण चेहरा निर्विकार असे.

आधी कुणाला कळलंच नाही. ताईच्या लक्षात येतं. मग डॉक्टर, औषधपाणी होतं...तेव्हा कळतं...त्याचे डोळे अधू झालेयत...

अन् पुढे दृष्टीच जाते. डॉक्टर सांगून टाकतात "यावर इलाज नाही."

"ताई ! काय झालं ग असं ?" आपण व्याकुळ होतो.

"डॉक्टरने बाबांना रोगाचं नाव सांगितलं खरं...पण मला कळलं नाही...आपलंच नशीब...!"

आजीने काही म्हणायच्या आधीच आपल्या मनात येतं...आपण काजळ घालत होतो...आपल्या बोटांचा स्पर्श त्या डोळ्यांना झाला ! आपण आक्रसून जातो...

तो पहिला धसका !–

आजीचे अभद्र शब्द मनात घर करून बसतात.

"मॅडम !"

प्रिंसिपाल साहेबांचा चपराशी टेबलाशी येऊन उभा असतो. नोटीस आणलीय–ऑफिसात २–३० वाजता होटेल्स–इन–चार्जची मिटिंग. तिच्याकडे मुलींचं 'बी' होस्टेल आहे. ती सही करते...

मग मुलींचे मोर कुठवर आलेत हे पहात, काही दुरुस्त्या करीत वर्गात हिंडते...यानंतर लंच अवर.

'ढाण. ढाण' तास संपण्याची बेल होते...

उड्या मारत मुली बाहेर पडतात नि फुल-पाखरासारख्या उडून जातात...ती तंद्रीतच उठते... नि पर्स उचलून चालू लागते. मनजीत फळा साफ करून खडू...डस्टर वगैरे उचलून ठेवत असते...

"मॅडम !" मनजीतची हाक..."यू फरगॉट युवर बुक्स..."

'बुक्स ?' ज्युनियर केंब्रिजचा तास घेऊन ती आठव्या वर्गावर 'आर्ट अँड क्रॅफ्ट'च्या तासावर आलेली असते...हे ती विसरलीच होती...ती पुस्तकं घेते.

"थॅंक्स अ लॉट, मनजीत..."

दोघी शाळेच्या पायऱ्या उतरू लागतात. ती पुढे मनजीत मागे.

"हे तुझ्या बास्केटमध्ये काय दिसतंय ?" ती विचारते.

"स्वेटर विणतेय..."

"वा ! लोकरीचा रंग छानय..."

"तुम्हाला आवडला, वरं झालं...इट वाज गोईंग टु बी ए सरप्राईस..."

"कुणासाठी..."

"तुमच्या बर्थ डे साठी...?"

तिचं पाऊल थबकतं...ही मनजीत लाघवी, लोभस, लागट आहे...आपल्या जवळ येऊ पाहतेय. तिच्या डोळ्यांत कौतुक-भक्तिभाव दिसतो. नको ! तिला वेळेवर दूर करायला हवं...आपल्याला कुणात अडकून घ्यायचं नाहीय...

"नो, मनजीत ! नॉट फॉर मी !"

"का ?" मनजीतचा फुललेला चेहरा एकदम कोमेजतो. तिला खुलवण्यासाठी ती म्हणते.

"लुक, मनजीत, मला त्यापेक्षा छान कल्पना सुचलीय."

"येस !" पण मनजीत खुलत नाही.

"तुझ्या ग्रॅनीचा वाढदिवस कधीय ? तिला दर पत्रात तू दोनदोनदा नमस्कार लिहून पाठवीत असतेस ?"

"असेल कधीतरी...ऑक्टोबरकडे... नक्की तारीख ठाऊक नाही..." ग्रॅनीत मनजीतला इंटरेस्ट दिसत नाही.

"ठाऊक नाही ? इजन्ट इट बॅड ? मग तिला हे स्वेटर पाठवून चकित कर ! यू नो, आय हॅव लॉट मेनी ऑफ देम."

तिच्याजवळ तऱ्हतऱ्हेच्या रंगाचे, फॅशन्सचे, डझनभर तरी स्वेटर्स, ट्विनसेट्स, कोट होते... सारे इंग्लंडमधे घेतलेले...गेली दहा वर्षं तेच पुरताहेत...

दोघी डायनिंग हॉलमधे शिरतात.

टेबलाच्या एका हेडला ती. दुसऱ्याला मन-जीत. रोजच्याच जागा. पण तिचं लक्ष मनजीत-कडेय्. मनजीतचा चेहरा आता सावरलाय्...पण फुललेला नाही...तिला तिने दूर लोटलंय. जाणून-बुजून...वरं केलं...तिला कुणाला जवळ येऊ द्यायचं नाहीय...कारण...

ती मुकाट्याने एकेक घास ढकलत असते. पण जेवण वेचव राहतं...किती किती आठवायचं माणसानं ? पण ते आठवतच राहतं.

माजघरात बाबा जेवत असतात...'आर्ट व क्राफ्ट' मधे मॅट्रिकला ती पहिली आल्याचं सांगत असते...बक्षिसाची बाबांकडनं साडी...ती दिवस-भर तिने मिरवली. रात्री प्रार्थनेच्या वेळी समईने वीतभर पदर जळून जातो.

कलेच्या पुढच्या शिक्षणासाठी बाबा तिला शांतिनिकेतनमधे घालतात...तिला गणपती, नव-रात्राची सुटी. यंदाचा गणपती तीच बनवणारय. विकताचा नाही. तिने बनवलेला सुरेखसा गणपती फळीवर वाळत असतो...उद्या त्याची स्थापना.

रात्री धाडकन आवाज येतो. सारे उठून पाहतात. तो गणपती चक्काचूर होऊन खाली पडलेला. त्याच्या वाहनाने उंदरांनीच पाडलेला.

वाड्यातली मुलींबरोबर ती करंज्या करा-यला बसलीय. आजी तळायला...एक करंजी फुटते...तूप खराब होतं.

"ही कुणी केलीय ?" आजी विचारते.

करंजीला सुरेख बारीक दुमड... नखांची घातलेली. मुली म्हणतात.

"ही शशीने भरलीय ! आम्ही नाही."

"वाटलंच ! मग ती फुटायचीच." आजीचा चिमटा.

—होस्टेल्स इनचार्जची मिटिंग दीडतास चाललीय. मिटिंगला प्रिंसिपॉल कर्नल कुकरेजा, वर्सर मेजर मल्होत्रा, चार होस्टेल्सचे वार्डन-मेट्रन. प्रत्येक हॉस्टेलमधल्या विद्यार्थ्यांची संख्या,

वयोगट, त्यानुसार विभागणी, नवी भर्ती, अडचणी– गरजा, शिस्त. सगळेच विषय जिव्हाळ्याचे.

"माझ्या 'ए' मधे पोरंपोरी ४० च्या वर गेलीत. इतक्यांची देखरेख मला एकटीला झेपत नाही...कुणी मदतनीस हवी," मेट्रन मिस होम्सची तक्रार.

"दोन दाया आहेत ना मदतीला? फुल-टाईम?" वर्सर मिलिटरी आवाजात विचारतात. बजेट त्यांच्याच ताब्यात.

"यस सर! पण..."

"पुन्हा तुम्हाला इतर वॉर्डन्सप्रमाणे टीचिंग दिलं नाहीय...नुसती होस्टेलचीच ड्यूटी...दिवस-भर मिळतो."

"वट सर..." मिस होम्सचा आवाज खाली पडतो.

"'बी' मधे किती मुलीयत, मिस ठाकूर?" प्रिंसिपॉल तिला विचारतात.

"तेवीस," ती सांगते.

"मग तुमच्याकडे ७–८ वर्षांच्या मोठ्या मुली 'ए' मधून शिफ्ट केल्या तर चालतील..." प्रिंसिपॉल तोड सुचवतात...ते नवेच आलेयत... मेजर मलहोत्रांची शिस्त ठीकय्. पण बोलणं पिस्तुल झाडल्यासारखं.

"सर, डी मधले चार बल्बस् फ्यूज झाले. अन् यावेळी जास्त पॉवरचे हवेत!" हे 'डी' होस्टेलचे डॉ. सॅम्युएल.

"गॉड! गेल्याच महिन्यात नवे बल्बस् लावले होते!...यू बेटर वॉच युवर मिसचीव्हस बॉईज डॉक्टर," मलहोत्रांनी वार केला.

डॉक्टरांचा चेहरा लाल होतो.

डॉक्टरांची ती दशा पाहून 'सी'चे रमण भीतभीत सांगतात "आमचा अटेंडंट बहादुरसिंग फारच म्हातारा झालाय, सर! त्याच्याने काम होत नाही...त्याला रिटायर करावं असं वाटतं मला."

"ते तुम्हाला वाटतं. पण तो तयार आहे का?"

"मोस्ट ऑफ अस हियर आर् ओल्ड अँड रिटायर्ड, मि. रमण..." प्रिंसिपल हसून म्हणतात.

"वट नॉट दॅट ओल्ड, सर!"

"त्याला हलक्या ड्यूटीवर ठेवू या, मेजर! स्टोअर कीपिंगच्या, आय होप यू अॅग्री..."

नवीन मुलांचे युनिफॉर्म्स, त्यासाठी टेलरला तगादा, रिपेअर्स, 'सी'–'डी' मधल्या मुलांची वाटणी–वयानुसारी की वर्गानुसारी?

चर्चा चाललीच आहे.

बाहेर मोटारीचे आवाज येतात. म्हणजे आणखी नव्या अॅडमिशन्स. त्यासाठी वॉर्डन्सनी थांबणं भाग.

–पालक आपापल्या पाल्यांसह उतरताहेत. सामान निघतंय.

दोन मोठ्या मुली ९ अन् ११ च्या. म्हणजे तिच्याच वाट्याला. प्रिंसिपॉल ओळख करून देतात.

"या मिस ठाकूर, गर्ल्स होस्टेल इन जार्ज अन् सिनियर इंग्लिश टीचर. मि. अँड मिसेस मेहरा."

"टू मोर गर्ल्स फॉर यू मिस ठाकूर. रीता–गीता." मि. मेहरा हसत म्हणतात.

तिने मुलींना ताब्यात घेतलंय...प्रिंसिपाल शाळेची फी–खर्च इ. माहिती देताहेत...मुलींना सोडून जाताना आईचा चेहरा काकुळतो...डोळे भरून येतात.

"काळजी करू नका, मिसेस मेहरा...दे विल वी वेल लुक्ड आफ्टर."

मेहरा मंडळी निघून जातात...सामानासह मुलींना होस्टेल अटेंडंटने नेलंय.

"नेक्स्ट!"

ती उठते...चपराशी कार्ड समोर ठेवतो... "स्क्वाड्रन लीडर बॅनर्जी, अंबाला."

उंच, सडपातळ स्क्वॉड्रन लीडर आत येतात. प्रिंसिपल उठून शेकहँड करतात.

"माय सन परीक्षित..."

"गुड ईव्हनिंग सर" मागून आवाज येतो. ती क्षणभर थबकून त्या मुलाकडे पाहते.

किरकोळ अंगकाठी, गोरा फक्क रंग... भुरके सोनेरी केस...

"ईव्हनिंग मॅडम."

आवाज अर्धवट फुटलाय...अन् डोळे निळ-सर. बाहेरच्या आभाळासारखे?...खूप समज असलेले अन्...

समथिंग स्ट्रेंज...हे डोळे-केस भारतीय नाहीत...काहीसे ओळखीचे...कुणा...? तेच वय...

मान हलवून ती चटकन बाहेर पडते. पावला गणिक मनात ठोका पडत असतो...

"ओ, डॅनी ! डॅनी !"

७-३० ला डिनरनंतर विद्यार्थी आपापल्या होस्टेलमध्ये गेले की मग दोन तास अभ्यास...

वॉर्डन्सची देखरेख...होमवर्क, डिफिकल्टीज कच्च्या मुलांचा अभ्यास वगैरे पाह्यचं...

ती मधूनमधून फेऱ्या घालतेय...मुली मग्न आहेत...किरण, नीता, मनजीत रीडर घेऊन बसल्याहेत.

'मॅडमला विचारू या का ?' किरणची कुजबुज.

"अं ऽ ऽ?" नीता.

"मॅडम, ही लॅंबची कविता समजली नाही..." मनजीत म्हणते.

"कोणती ?"

"ओल्ड फॅमिलियर फेसेस."

"ओ ! वट इट्स व्हेरी ईझी..." ती म्हणते.

"तशी सोपीय. मॅडम...पण समरी लिहायला कठीणय्."

मनजीत सांगते... "हा शेवटचा स्टॅंझा..."

"हाऊ सम दे.. हॅव डाइड...सम हॅव लेफ्ट मी...अँड सम आर टेकन फ्रॉम मी...ऑल आर डिपार्टेड...ऑल...आर गॉन..."

तिच्या आठवणींचं दार किलकिलं होतं... पण ती फटकन बंद करून घेते...शब्द सोपेय. पण अनुभव...?

ती चेहरा सावरून वसते नि मुलींकडून समरी लिहवून घेते.

–मध्ये चार दिवस तिने सुटी घेतलीय... बरं नाही...मग लागून शनिवार-रविवार असतात.

रविवारी डिनरनंतर 'सी' चे वॉर्डन मि. रामन तिला भेटायला येतात.

"हाऊ आर यू मिस ठाकूर ?"

"ऑलराईट...थॅंक्यू."

"मंडेला शाळेत येणार ना ?'

"हो..."

"यू रिमेंबर दॅट न्यू बेंगाली बॉय ?"

"हं" ती हळूच म्हणते...

"ही इज सिंपली वंडरफुल..."

"कसा काय ?"

"तुम्ही चार दिवस रजेवर होतात... डॉ. मल्होत्रा तुमचे वर्ग घेत होते...ही वॉज टेलींग मी."

ती काही बोलत नाही. रामन आपल्याच धुंदीत...

"शेक्सपिअर ज्युनिअर केंब्रिज वर्गाला किती जड जातो ?...या मुलाला ओळीच्या ओळी पाठ ! त्याची आठ-दहा नाटकं वाचलीयत त्याने म्हणे. तुम्ही एक एसे लिहायला दिला होतात ना... 'ए मेमोरेबल एक्सपिरियंस ?' आज त्याने मला तो दाखवला...सुरेख इंग्रजी...एकही स्पेलिंगची चूक नही...कल्पनाही उत्तम...तुम्ही पहालच..."

"अरे वा ऽ !"

"मी सायंस ग्रुफ शिकवतो. त्यांतहीतरबेज..." मला वाटतं, त्याला डबल प्रमोशनद्यावं...

"तो ज्युनिअर केंब्रिजला आहे म्हणता... मग तुमच्या 'सी' मध्ये कसा ?"

"कारण वय फक्त तेराच आहे. 'डी' मधली मुलं १५ च्या वरची..." रामन बोलतच राहतात... "मी त्याची सर्टिफिकिटं पाहिली... थ्रुआऊट फर्स्ट क्लास आहे..."

"एक्सेप्शनल !"

"तेच तर...मलहोत्रांनी त्याला विचारलं तुझं इंग्रजी इतकं चांगलं कसं ? तर म्हणाला-माय मदर इज इंग्लीश..."

तरीच !...तिला त्यादिवशी वाटलं ते खोटं नव्हतं...रामन उठतात...

"ओनली...ही लुक्स रादर सॅड...मस्ट वी रॉंग समव्हेअर ! ओ. के. गेट वेल..."

–सोमवारी पहिला तास ज्युनिअर केंब्रिज वर्गावर इंग्लिशचा. ती क्लास-टीचर आहे.

आल्याबरोबर ती नजरेने वर्ग कवटाळते. परीक्षित अगदी मागच्या बाकावर कोपऱ्यात बसलाय. तिथून त्याचे आभाळी डोळे तिच्या हालचालीकडे पहात असतात.

मुलांच्या 'गुडमॉर्निंग, मॅडम' ला प्रतिसाद

देऊन ती खुर्चीवर बसते...टेबलावर वह्यांची चळत...शेजारी एक फूल गुलाबाचं, पिवळं...

"अवर एसे बुक्स मॅडम...ट्वेंटी कॉपीज."

वह्यांकडे बोट दाखवून वर्लविंदर सांगतो. तो मॉनिटर आहे.

"अन् हे फूल ?"

"फ्रॉम मी, मॅडम"...परीक्षित उभा राहतो.

"थँक्यू ? युवर नेम ?"

"परीक्षित बॅनर्जी..."

आज इंग्लीश टेक्स्ट–ज्यूलियससीझर. मुलं पुस्तक काढून बसलीयत.

"ॲक्ट वन...सीन टू...पेज सिक्स...लाईन्स...'नो कॅशियस, द आय सीज नॉट इटसेल्फ, बट बाय रिफ्लेक्शन...?'...आय हॅड एक्सप्लेन्ड द नेक्स्ट टेन लाईन्स ऑलरेडी...!" ती वर्गाकडे पहाते.

आपल्याला अर्थ विचारणार या भीतीने साऱ्या माना खाली...

"कॅन एनीवन डू इट ?"

कुणाचाच हात वर येत नाही...परीक्षित उठतो...संदर्भासहित ओळींचा अर्थ सांगतो...ती खुश होते. म्हणजे ओळी नुसत्याच पाठ नाहीत...अर्थही ठाऊकय त्याला...

"गुड...व्हेरी गुड."

मग पुढच्या ओळी समजवून सांगण्यात ती रंगून जाते.

–फ्री पीरियडमध्ये टीचर्स रूममधल्या टेबलाशी बसून ती निबंधाच्या वह्या समोर ओढते. आधी परीक्षितची वही शोधून काढते नि अधीरपणे वाचू लागते.

"इंग्लंडहून माझे वडील ममीसह हिंदुस्थानात परतले. त्यावेळी मी जेमतेम सहाचा. ती इंग्रज... इथलं हवामान, राहणी, कुटुंब संस्था...चालीरीती काहीच तिला आवडलं नाही...बंगाली लोक तसे हुशार...पण फार कॉंझरवेटिव्ह. कुटुंबातली नाती पाळणारे...तिने परत जायचं ठरवलं. मला नेऊ लागली...पण वडिलांचा नकार...पॅट्रिआर्किकल सोसायटीत मी. बॅनर्जी. अँग्लोइंडियन पण बंगाली. सो, दो इंग्लंड इज माय मदरलँड, इंडिया इज माय फादरलँड...माय मदर लेफ्ट मी...इट् वॉज् टेरिबल. आय् फेल्ट लोनली. इन माय मदरलस चाईल्डहुड ग्रॅंडमा फिल्ड दॅट व्हॅक्यूम...धिस इज माय मेमोरेबल एक्सपीरियंस. आय विल नेव्हर फरगेट द डे ममी लेफ्ट मी!" न संकोचता, एकूण त्याने आत्मवृत्तच लिहून टाकलं होतं. निबंधाला ती २५ पैकी २१ मार्क देते...खरं तर पूर्ण दिले असते तरी हरकत नव्हती. खूप वर्षानंतर शिकवायला उत्साह वाटावा असा विद्यार्थी तिला मिळालाय.

–परीक्षित मिड–टर्म परीक्षेत पहिला आलाय. प्रिंसिपॉलनी संबंधित शिक्षकांना बोलावून घेतलंय.

"आय हियर दिस बेंगाली बॉय इज व्हेरी ब्रिलियंट, मिस ठाकूर ?"

"हो सर. रिझल्ट–शीट वरून दिसेलच..." ती शीट पुढे धरते.

"डॉ. मल्होत्रा ? व्हॉट डू यू थिंक ?"

"माझ्या विषयातही उत्तम आहे."

"अन् माझ्याही" मि. रामन.

"मग याला सीनियर केंब्रिजला प्रमोट करायचं !"

"नो क्वेश्चन !, 'अॅग्रीड', वी गुड"

सर्वांचाच एकमत. परीक्षितचा वर्ग बदलतो. तसंच होस्टेलही बदलतं...मि. रामन हळहळतात.

–त्यानंतर ती वर्गात जाते. त्यावेळी दुसऱ्याच वह्यांचा ढीग टेबलावर असतो. पण फुलं नाहीत रोजसारखी. मग एकदम आठवतं–परीक्षित आता तिच्या वर्गातून सीनियर वर्गात गेलाय... त्याची जागा रिकामी–रिकामी वाटते. शिकवायचा उत्साहच निघून जातो...आता श्रवणभक्ती करणारेच तेवढे उरलेयत...पण हे असंच असतं... दरवर्षी जुनी बॅच जाते, नवी येते. त्याचं काय एवढं ?

ती पुन्हा निर्विकारपणे शिकवू लागते.

–शाळेचं आवार ओलांडून ती समोरची टेकडी चढून जाते...बाजूला दुसरी टेकडी.. त्यावर चर्च. त्याला वळसा घालून जाणारा रस्ता. पाईनची ताठ बाण्याची झाडं. त्याखाली दरी...पाण्याचा ओहोळ...लांब क्षितिजावर निळे–जांभळे डोंगर...

रेषांच्या लहरीच लहरी...लॅंडस्केप सुरेख निघेल.

कडेच्या जाडजूड थोराड झाडाचा बुंधा पाहून ती काखेतलं सामान खाली ठेवते...काही क्षण एकाग्रतेने पाहते...मग बोर्डावर कागद चढवते...रंग तयार करते.

बरेच दिवसानंतर आज तिला अशी लहर आलीय...सुटी आहे...हवाही छान...ज्युनिअर मेट्रनवर ती होस्टेल सोपवून आलीय...शाळा आठवडाभर बंद. अर्धीअधिक होस्टेल्स रिकामी झालीयत.

ती ब्रशनेच आऊटलाईन काढते नि समोरचा देखावा भराभर चितारू लागते. स्थलकाळाचं भान विसरते.

"ओह ऽ ऽ ! ब्यूट ! यू आर एन आर्टिस्ट ! डिडन्ट नो..."

–ती दचकते...हात थांबतो. परीक्षितचा आवाज.

"व्हेअर डिड यू लर्न इट, मॅडम ?"

काही वेळ ती बोलत नाही...ब्रश रंगांचा चाळा करीत रहातात.

" शांतिनिकेतन..."

त्या शब्दावरोबर मनात आठवणींच्या लहरीवर लहरी-उठतात...साऱ्या शरीरभर पसरतात.

"एम आय डिस्टर्बिंग यू मॅडम ?"

ती उत्तर देत नाही...ते शब्द तिला ऐकू येत नाहीत...ती मुकी होऊन बसलीय...लहरींचा विळखा तिला आवळून धरतो. देहभर शिरतो...

–शांतिनिकेतनचं ते अफाट आवार...एका जुन्या भारदस्त पळसाखाली बसून ती समोरच्या दोन प्रचंड जुनाट वृक्षांचे स्केचेस काढतेय...त्यांचे पीळदार स्नायू, सांधे, गाठी, उंचावलेल्या अनंत हातांसारख्या फांद्या, पानांचे आकार, मुरडणं... ऊन–सावलीत वदलणारे रंग...एकूण त्या झाडांचं व्यक्तित्व...अनेक वर्षाचं साहचर्य...अबोल भाषा हे सारं तिथे आहे. ते जाणवतं...ते रंग–रेषांनी कागदावर उतरायचंय तिला...त्याच्याशी ती एक-रूप झालीय...

"आय से, लव्हली, 'फंटास्टिक'"

ती हळूच मान वळवते... अनोळखी चेहरा.

"द इंट्रूडर इज इयन मॅकब्राईड ! कॅन आय सिट ?"

हातात स्केचबुक. खांद्यावर झोला–बॅग, कॅमेरा लांब केस–दाढी... डोळे गडद निळे.

"व्हाय नॉट ?"

तो शेजारी बसतो. ती स्केच पुढे धरते. टागोरांचं नाव ऐकून शांतिनिकेतनला अलिकडे परदेशी कलावंत येऊ लागलेयत... त्यांतलाच कुणीतरी एक असावा...

"सेम कास्ट... पेंटर्स" तो हात पुढे करतो. नकळत ती शेकहॅंड करते. मग लगेच हात परत घेते.

"तुमच्या बंगालस्कूल बद्दल बरंच ऐकलं होतं... काहीतरी नवं पाह्यचं–शिकायचं म्हणून आलोय..."

"मग ?"

"ट्रू इट्स समथिंग न्यू... अवनींद्र इज गुड, नंदलाल सो सो... बट मासोजीज लाइन्स स्पीक पोएट्री..."

– ही पहिली ओळख.

– पुढे स्केचेससाठी सूर्योदयाबरोबर एक-साथ बाहेर पडणं. मग मैत्री स्नेह–प्रेम वगैरे.

"व्हॉट इज शशी मीन ?"

"मून... चंद्रमा ! से चंद्रमा."

"यू आर लाईक मून... चंद्रमा"

"नॉट मूनी आय होप...?" ती हसते.

"नो ! लव्हली, काम, मिस्टीरियस..."

"बट वॅक्सिग अँड वेनिंग...?"

"येट, ऑलवेज देअर... वोंट यू बी ?"

"यस..."

"नॉट सो फास्ट शशी !..." तिला आतून कुणीतरी सांगत असतं.

पण आपण ऐकण्याच्या अवस्थेत नाही... आपलं नवं रूप तिलाही अनोळखीय...

"गो स्लो, थिंक !" वाटतं, ही आधीची मित्री, बुजरी... आजीनं टोचून दावून टाकलेली शशी बोलतेय... 'नो... आय वोंट...'

– त्यावर बाबांचं मौन... आजीचा विरोध अपेक्षितच.

"शशी, तो कोण, कुठला, खुंटीवरचा कावळा ! एक परदेशी."

"बाबा, तुम्हालाही तसंच वाटतं ?"

ते बोलत नाहीत... पण त्यांना इयन आवडलेला दिसत नाहीय. ही जुनी माणसं सारी एका जातीची. शिष्ट ! अडसर घालणारी !

"तो उत्तम चित्रकार आहे... बाबा ! चांगला माणूस आहे. दरिद्रीही नाही... त्याने प्रपोज केलंय मला."

"विलायतेला जाऊन मग लग्न करीन म्हणाला असेल..." आजीची कुत्सा...

"मुळीच नाही. इथे लग्न. मग विलायत."

– आपण तडफेनं म्हणतो... तरीही बाबा स्तब्ध.

"बाबा, काहीतरी बोला ना ?"

"काय बोलायचं, शशी ?... तुझं आयुष्य... ते तूच घडवायचं मी नाही. तू ते घडवतेयस. मग त्याचं फलितही तुझंच..."

– लंडन आपल्याला आवडलंय... फिंचले सेंट्रल स्टेशनजवळ रेडबोर्ड एव्हन्यूत दोन खोल्यांचं घर... बेड–कम–सिटिंग रूम अन किचन कम डायनिंग... पण स्वर्गतुल्य. सगळं आयुष्यच अपूर्व. पण आपली चित्रं थांबलीत. आधी बी. एड. करून नोकरी मिळवावी अशी इयनची सूचना. एका शाळेत मिळते... दोन वर्षं पापण्यासारखी फडफडून जातात.

– मिडिलसेक्स हॉस्पिटलमधे डिलिव्हरी होते. इयन उभाय शेजारी–

"लुक ही इज मेकिंग फनी फेसेस..."

"देन फनी फेस ?"

"नो. बेटर, लेट्स कॉल हिम डॅनी..."

डॅनी के चा चित्रपट नुकताच पाहिलेला असतो.

– भारतात दिसलेला इयन अजून हरवला नाहीय. पण दुसरा एक इयन मधूनच डोकावतो... घुमा, आतून घुसल्यासारखा वाटणारा. उगाच चिडणारा... मग मित्रमैत्रिणीत रमणारा... हे नवीनच–

"यू हॅव चेंज्ड, इयन"

"व्हॉट वे ?"

"परहॅप्स इंडिफरंट, समव्हाट सोशल, समटाईम्स इरिटेबल, सीक्रेटिव्ह... रेस्टलेस..."

"नो.."

"यस..."

"डोंट आरग्यू, शशी ! आय हेट दिस ॲनालायझिंग, हेअर–स्प्लिटिंग ! अ टिपिकल इंडियन ट्रेस... व्हाट युवर एंशंट सेजेस ॲंड फिलॉसॉफर्स हॅड, ऑफ हूम यू आर प्राऊड !" इयनचा टोमणा.

आपल्यालाही राग : "ऑफ कोर्स ! आय ॲम प्राऊड..."

मग आणखी वाद, अबोला, ताडकन उठून निघून जाणं. मग त्या जीवघेण्या नकोशा पार्ट्या सुरू होतात. लांब, पिंजारलेल्या केसांची पोरं–पोरी... नाचगाणी रात्ररात्र धिंगाणा... आपलं कुढणं.

"आय थिंक, ही इज हॅविंग फन विथ दोज गर्ल्स !"

सहा वर्षांचा डॅनी मुकाट्यानं सारं पहात असतो... अन खोलीत चित्रं काढीत बसतो... दूर दूर जातोयसं वाटतं–

– ती धिंगाणा–पार्टी पहाटे तीनपर्यंत चालते. धांगड धिंगा. ते पिंगा घालणारे धुंद नाचरे पाहणं असह्य होतं. आपण इयनला छेडतो... भांडतो...

अन इयन त्वेषाने निघून जातो... तो यावेळी कायमचाच...

– मग आपलं पिचत जाणं, जुन्याजुन्या आठवणी उकरून काढणं, विचार पिंजत बसणं...

इयन खुंटीवरचा कावळा ?... की त्या-दिवशी त्या डवरलेल्या पळसाखाली विसावून आपण इयनच्या हाताला हाताने स्पर्श केला तेव्हाच हे सारं ठरून गेलं होतं ? हा पुढचा आराखडा ? त्या भारदस्त वृक्षाने शहारून, नाही तर फुलांची टिपं गाळून, आपल्याला सचेत का केलं नाही ? आपली निवड चुकली... तिचं फलित आपण आता एकटीने भोगायचं... बाबा म्हणाले होते तसं ?

त्या फलिताचं एक बरं अंग. डॅनी आपल्याला मिळालाय. त्याच्या भरवशावर आपण पाच वर्षं काढली. निर्धास्तपणे...

–एकदिवस १२ वर्षांच्या डॅनीला इयन शाळेतून परस्पर घेऊन जातो. रात्री फोन.

"आय एम कीपिंग माय सन विथ मी ! ही

कॅन विजिट यू ऑन संडेज..."

"वट इयन...ही इज माय सन टू"

"ओ. के. बट वी कांट कट हिम इन टू हाफ्ज."

आपण स्तंभित...मूक

"आस्क हिम व्हेअर ही वुड लाइक टु स्टे इफ यू थिंक. राईट."

वाटतं जीव द्यावा, कोर्टात खटला भरावा, डॅनीला चोरून आणून भारतात पळून जावं...पण काही अर्थ? कायद्याने तो त्याचा मुलगा...मग आपल्याजवळ काय उरलं?

उरतं फक्त डॅनीच्या वाटेकडे रविवारी डोळे लावून बसणं...११ ते ५ त्याची सोबत...लंच, चहा, तऱ्हतऱ्हेचे मेनू...गप्पा...भटकणं...नवनवे प्रोग्रॅम्स...असे भरगच्च रविवार.

ठीकय...पण अशा जीवनाला काय अर्थ? त्यापेक्षा परत जावं. डॅनीला आपण एका रविवारी विचारतो.

"वुड यू लाईक टु कम विथ मी टु इंडिया?" डॅनी काही वेळ गप्प. मग हळूच म्हणतो.

"आय लाइक यू ममी!...वट हाऊ कॅन आय लाईक अ स्ट्रेन्ज कंट्री?" मग काहीसा विचारमग्न होऊन खाली पहात बोलतो... "आय हॅव नो चॉइस, ममी, यू अंडरस्टॅंड...? इंग्लंड इज माय होम...अँड डॅडी इज नॉट बॅड..."

म्हणजे सगळं संपलंय...डॅनीही दूर गेला... आपल्याजवळ काहीच उरलं नाही...फक्त रविवार ...डॅनीनं तेवढं एक ठेवलंय...पुढे तेही...

—लांबून परीक्षितची शीळ ऐकू येते. तिचे हातातले ब्रश रंगांशी चाळा करीत असतात. ती पेंटिंगचं सामान आवरू लागते. मूडच गेलाय...

...येस परीक्षित, यू डिड डिस्टर्ब मी!

—सीनियर वर्गाचा तास संपवून ती वर्गाबाहेर पडते...पाठोपाठ परीक्षित...उत्सुकतेने विचारतो.

"मग तो लॅंडस्केप पुरा झाला मॅडम?"

"अं ऽ, तो? नाही...तसाच आहे."

"मला पाह्यची उत्सुकता ह.ती."

ती काहीच बोलत नाही...चेहरा रूक्ष गंभीर.

"दॅट मीन्स...म्हणजे मी तुम्हाला डिस्टर्ब केलं...असंच..."

तिच्या प्रतिक्रियेसाठी तो अपेक्षेने तिच्याकडे पहात असतो...तिच्या गांभीर्यात....उदास छटा त्याला दिसते...ती पाहून तो अपराधीपणे म्हणतो,

"यू नो, मॅडम, मला रानात भटकायला खूप आवडतं...हा डबल अभ्यास नसता तर रोज गेलो असतो." स्वतःशीच बोलल्यासारखं तो बोलत असतो.

"पण त्या दिवशीची सकाळ खूप सुरेख होती. कोवळं सोनेरी ऊन...एकदम लहर आली ...खरं तर, मला माहित नव्हतं, तुम्ही तिथे पेंटिंगला बसलाहात—आय अपॉलाजाईस..."

"दॅट्स ऑलराईट..."

तिच्या हातात परीक्षितने ठेवलेलं टेबला-वरचं फूल असतं...लिलीचं...ते पाहून ती मृदुपणे म्हणते:

"हे तू काल तिथूनच तोडून आणलंस ना?'

"हो, त्यादिवशी...आय वॉंडर्ड लोनली एज अ क्लाऊड दॅट फ्लोट्स हाय ओव्हर व्हेल्स अँड हिल्स. व्हेन ऑल एट वन्स आय सॉ. ए क्राऊड...ए होस्ट."

वर्डस्वर्थच्या 'डॅफोडिल्स'मधल्या ओळींत तो हसून सांगतो...तीही हसते.

—"मिस ठाकूर...आय हॅव टु मेक अ रिक्वेस्ट." प्रिंसिपाल म्हणतात...

"येस, सर?"

"डॉ. सॅम्युअल महिन्याच्या रजेवर जाता-हेत. त्यांचे वडील आजारी आहेत. त्यांच्या जागी 'डी' वर कुणाला ठेवावं...प्रॉब्लेम पडलाय."

"सो?"

"आय सजेस्ट, महिनाभर तुम्हाला 'बी' वरून तिथे शिफ्ट केलं तर...?"

"का?...कुणी मेल टीचर नाहीत?" ती हळूच विचारते.

"तुम्हीच बघा. रामन 'सी' वर. रजि-स्ट्रारला क्षणाची फुरसत नाही. शाळेचं सारंच पहावं लागतं त्यांना. बाकीचे सगळे, कुणी नवे, कुणी अगदीच तरुण...ती मोठी मुलं होस्टेल डोक्यावर घेतील. रोजचा काही ना काही उपद्रव! तुम्ही मॅच्युअर. जुन्या, तुमचा वचक आहे."

ती गप्प राहते...तिचाही प्रॉब्लेम आहे एक तिथे तो परीक्षित आहे...एकाकी...ओढाळं, आलंबन शोधणारा...तिला इंटरेस्ट वाटायला लागलाय का ?...नको—तो दूरच बरा...

तिला गप्प पाहून कर्नल कुकरेजा विचारतात "का ? तुमची काही अडचण ?"

ही अडचण कशी काय सांगायची ?

"अं ऽ ऽ...नाही."

"मग उद्या संध्याकाळला तुमचं सामान शिफ्ट करू...डॉ. सॅम्युअल रात्रीच्या गाडीने जाताहेत. ओ. के. ?"

ती नुसती मान हलवते...मनात म्हणते, "आय होप एव्हरीथिंग विल रिमेन ओ. के." जपून वागायचं...बस,

'डी' मध्ये आल्यावर चार दिवसातच तिच्या लक्षात येतं...परीक्षित इतर मुलांसारखा प्लेग्राऊंडवर जात नाही...शाळेतून आल्यावर खोलीतच बसून असतो. सारखं वाचन. नाहीतर नोट्स—तिने हटकलं, तर म्हणतो.

"डबल प्रमोशनमुळे मला दोन वर्गाचा अभ्यास भरून काढायचाय मॅडम."

"पण सारखा अभ्यास ? ऑल वर्क अँड नो प्ले ? यू मस्ट प्ले..."

"आय डोन्ट लाईक दोज राऊडी गेम्स..."

"दॅट्स व्हाय यू आर सो थिन. अँड !"

तो नुसता उदास हसतो...म्हणतो :

"प्लीज, मॅडम...लेट मी..."

— त्यादिवशी ती होस्टेलचा सरप्राईझ राऊंड घेते...डॉरमिटरीज, मुलांच्या खोल्या पाहते... बहुतेक मुलं खेळायला—फिरायला गेलीयत... थोडीशी आहेत त्यांची आवरासावर सुरू होते.

परीक्षितला टोकाकडची खोली मिळालीय. काहीशी जुनाट, एकाकी. आत दोन कॉट्स, पार्टनर सलीम अली. त्याच्या कॉटवर भिरकावलेले कपडे, ओला टॉवेल. पुस्तकं पडलेली...परीक्षित वाचत बसलाय. तिला पाहून उठतो.

"ही हॅज गॉन फॉर ए वॉक..." परीक्षितचा खुलासा.

पण परीक्षितचं टेबल व्यवस्थित... पुस्तकांची उभी रांग...कपडे कपाटात...कोपऱ्यात स्टुलावर शाईच्या दौतीचं केलेलं फ्लॉवर पॉट... त्यात चार फुलं...भिंतीवर दोन फोटो...एक मेजर बॅनर्जींचा. दुसरा इंग्रज बाईचा—ब्लांडे, भुरके केस. निळे डोळे.

तर परीक्षितने वडिलांच्या डोळ्यांचा आकार पण रंग आईचा...केसही तिचेच...

"माय मम्मी..."

"हू लेफ्ट यू बिहाईंड लोनली अँड सॅड..." ती मनात म्हणते. मग मोठ्याने विचारते : "डज शी राईट टु यू ?"

'नो.' त्याने हळूच मान हलविली..."बट माय ग्रॅनी—फादर्स मम्मी...शी डज...रेग्युलरली... आय मिस हर." तिला उगाच उदास वाटतं.

ती इतर खोल्यांतून हिंडते...डॉरमिटरीज पहाते...तो तिच्या पाठोपाठ चालत असतो. बोलत असतो.

ती आपल्या खोलीकडे वळते...पडद्याशी उभी राहते—"सो ? दॅट्स ऑल..."

त्याचे ओठ उघडतात, मिटतात...काहीतरी बोलायचं मनात आहे...

"येस ?"

"यू नो मॅडम ?...यू लुक सो मच लाईक माय ग्रॅनी..."

"मी ?"

"तुमचा फेसकट, नाक...अगदी पहिल्या दिवशीच मला भास झाला...इतकं साम्यंय्..."

ती काही बोलत नाही...गंभीर होते...तो एकाएकी म्हणतो :

"मे आय कॉल यू ग्रॅनी, मॅडम ?..."

भलतंच...!...इतर मुलं त्याची चेष्टा करतील...हे एकाकी पोर आपल्यात आलंबन शोधतंय...पण नको...आपल्याला कुणाशी कुठलंच नातं जोडायचं नाहीय. पुअर चाईल्ड...

"नो, प्लीज !" ती रुक्षपणे म्हणते...

"ओऽऽ ! देन आय एम सॉरी..." तो एकाएकी सावरतो...

"हे बघ परीक्षित...डोंट फील हर्ट ! पण शाळेची एक शिस्त असते...मुलांमु करता येत नाही.

"मॅडम !"

त्याचा स्वर भारावल्यासारखा वाटतो. ती अस्वस्थ होते...मग दुसरेक्षणी ती सारं पुसून टाकते...तिला कुणी जवळ यायला नकोय... ठरवलेल्या वाटेवरून सरळ जायचंय एकटीने...

—पण सगळेच योगायोग तिला नको असलेले. विरुद्ध ! आधीच 'डी' मधे यायचं तिच्या मनात नव्हतं. पण नेमके डॉ. सॅम्युअलचे वडील आजारी, प्रिंसिपालने तिचीच निवड केलेली. आता परीक्षितचा अभ्यास भरून काढायचा म्हणून तिलाच ट्यूशन घ्यायचा आग्रह...म्हणजे अंतर राखणंही कठीण...पण त्या दिवसापासून तोच बेताने वागतोय. अबोल झालाय.

वर्गात तिने ब्राऊनिंगची 'Prospice' शिकवायला घेतलीय...

"आय वाज ए फाईटर, सो वन फाईट मोअर द बेस्ट अँड द लास्ट..."

ब्राऊनिंगचा आशावाद, धैर्य, मरणाला सामोरं जाण्याची निर्भय वृत्ती...शिकवताना ती रंगून जाते...तास कधी संपतो कळत नाही. या छोटया सुटीत मुलं 'इलेव्हन्सेस'साठी खाली निघून जातात...चहासाठी शाळेच्या ३१ पायऱ्यांची चढउतर करणं जिवावर येतं...पुन्हा पुढचा तास त्याच वर्गावर—इतिहासाचा...ती वर्गातच वह्या तपासत बसते...

मध्येच खोकण्याचा आवाज ऐकू येतो. ती वर पहाते...परीक्षित पुस्तकात डोकं खुपसून बसलाय. तो गेला नाही ते कळलंच नाही...

"यू हियर ?...चहाला गेला नाहीस ?..."

"मला भूक नव्हती..."

"बट यू लुक फेडेड, परीक्षित...यू मस्ट प्ले प्लेंटी, अँड ईट प्लेंटी."

"पण माझ्याजवळ वेळ कुठेय, मॅडम?... परीक्षा जवळ आलीय..."

तो खांदे झटकल्यासारखे करतो. नि पुन्हा वाचू लागतो...ती पुढे बोलत नाही...घंटा होते. मुलं वर येऊ लागतात.

रात्री ती त्याचा अभ्यास घेते...'प्रॉसपिस'—ची समरी त्याने लिहून काढलीय...कठीण ओळींची एक्स्प्लेनेशन्सही तयार केलीयत...'ज्यूलिअस सीझर'चे ज्यूनिअर मध्ये झालेले दोन अॅक्टस अजून शिकवायचे राहिलेयत.

ती पुस्तक काढते...पण त्याचं लक्ष नाही. पान उघडलेलं नाहीय...एकाएकी तो म्हणतो...

"यू नो मॅडम, 'डेथ' बद्दल ब्राऊनिंगपेक्षा खलील जिब्रानची कल्पना जास्त सुपीरियर आहे..."

"पण जिब्रान कोर्समध्ये नाही. तो केव्हा वाचला ?"

"गेल्या सुटीत...घरी ! लिसन :

आय शॅल लिव्ह बियाँड डेथ...

अँड शॅल रिंग इन युवर इयर्स !

इव्हन आफ्टर..."

—ती त्याच्या चेहऱ्याकडे पाहते...अन् तिला बरं वाटत नाही...ही डज लुक फेडेड...अन् हे मृत्यूचे विचार...

"परीक्षित तुझं वय किती ?"

"म्हणजे ?...चौदाचा होईन पुढच्या महिन्यात. का ?" तो आश्चर्याने म्हणतो.

"या वयात तुला मृत्यूचे विचार कशाला हवेत ?"

"कां ? मृत्यूचा विचार करणं म्हणजे मरणं नव्हे ! आफ्टर ऑल, डेथ इज ए फॅक्ट ऑफ लाईफ...लाइक बर्थ, सॉरो—अँड फेट !"

काय बोलावं तिला सुचत नाही. ती अस्वस्थ होते...'ज्यूलियस सीझर उघडते...

"पेज फॉर्टीनाईन..."

त्या रात्री तिला झोप येत नाही. अस्वस्थ वाटतंय...का ? परीक्षितचं मन दुखावल्याची ही टोचणी ?...की त्याचा फिकट चेहरा पाहून...? ...की दहा वर्षं मनाला दडवून ठेवलेल्या आठवणींची ही चुळबुळ ?

डॉ. सॅम्युअलच्या सुटीचे आणखी किती दिवस उरलेयत ? आठेक असतील...तेवढे काढले की संपलं.

दुसरे दिवशी संध्याकाळी ती प्रिंसिपालना भेटते...काठी घेऊन ते फिरायला निघालेयत. वाटेत सहज गाठ पडल्यासारखं ती भासवते...पण तिने त्यांना मुद्दाम गाठलेलं असतं...

"गुडीव्हनिंग !...अं.. डॉ. सॅम्युअल वेळेवर येणारयत ना ?"

"ओऽ...सॉरी, मिस ठाकूर...सांगायला विसरलोच...त्यांचे वडील वारले..."

"अरे ?...च् च्"

"त्यांनी पंधरा दिवस आणखी सुटी वाढवलीय...सारं उरकून मग येतीलसं पत्र आलंय..."

तिला हताश वाटतं...पहिले उरलेले आठ + पंधरा म्हणजे तेवीस दिवस आणखी काढायचे ! पाऊण महिना ? न कळत उद्‌गार निघतो :

"गॉड ! सो मेनी डेज ?"

"का ? तुम्हाला काही त्रास नाही ना ?... मि. धवन–ते ज्यूनिअर टीचर...नीट मदत करतात ना ?"

"हो...तसं नाही...पण......यू नो...परीक्षा जवळ आल्याहेत..." ती दुबळेपणाने म्हणते...

"ट्रू...युवर लोड ऑफ वर्क विल इंक्रीज ! कांट हेल्प...!"

सालावाद शिरस्त्याप्रमाणे परीक्षांच्या आधी विद्यार्थ्यांचे मेडिकल चेक–अप, मापं घेणं सुरूय... वजन, उंची, छातीची रुंदी, यांचे तपशील दरेकाच्या कार्डात नोंदवले जाताहेत...

आठवीवर तिचा आर्ट अँड क्रॉफ्टचा तास चालूय...बहुतेक मुलींचे मोर रंगवून आलेयत. त्याचं काम पहात ती हिंडते...

खिडकीतून तिला प्रिंसिपालचा चपराशी येताना दिसतो...त्यांचा निरोप आणलाय. तिला तावडतोब बोलावलंय...आता नवीन काय उपटलं ? तिचा जीव दडपतो.

"मनजीत, लुक आफ्टर द क्लास..."

"येस, मॅडम !"

"अँड डोंट मेक एनी नॉइज..."

"नो, मॅडम."

ती पर्स उचलते. मनजीत टेबलाशी येते.

"ते स्वेटर संपलं ?"

"हो...केव्हाच...ग्रॅनीला पाठवून दिलं..."

"गुड गर्ल !"

–प्रिंसिपॉलच्या खोलीत शाळेचे डॉक्टर बसलेयत...शाळेच्या टेकडीखालच्या गावात प्रॅक्टिस करतात.

"आफ्टरनून, मिस ठाकूर..."

"आज सीनियर वर्गाचं चेक–अप होतं ना डॉक्टर ?"

"तेच संपवून आलोय्..."

"एव्हरीवन ओ. के. ?"

"येस..."

"तो बंगाली मुलगा...हाऊ इज ही, मिस ठाकूर ?" प्रिंसिपालचा सहज विचारावं तसा स्वर.

"ए विट फेडेड ऽ...अदरवाईज ओ. के का ?"

"ही इज रादर डेलिकेट...चौदा वर्षांचा मुलगा, छाती फक्त २२ इंच..." डॉक्टर म्हणतात.

"असायचीच ! शाळा संपली की लगेच अभ्यासाला बसतो. खेळत नाही... दुसरा व्यायामही घेत नाही."

"देन यू मस्ट आस्क हिम टु," डॉक्टर.

"आय डिड, डॉक्टर. पण तो म्हणतो त्याला दोन वर्षांचा अभ्यास एकदम संपवायचाय."

"दॅट्स ट्रू" प्रिंसिपाल.

"अन क्लासही मिळवायचाय ! मग काय बोलणार ?"

"मग त्याचाच ताण पडतोय ! मी तपासलं त्याला...म्हणत होता–ही ऑलवेज फिल्स टायर्ड... अन भूकही लागत नाही..."

"देन ? एनीथिंग रॉंग ?"

"अँ...नो ! बेसिकली नथिंग !–नथिंग दॅट आय कुड नॉट फाईंड !" डॉक्टर ऐटीत सांगतात.

डोंबलं ! तुमचं वरवरचं चेक–अप, तुमची लायकी–ठाऊकय. नुसत्या LCPS वर फुगलेले ! ...ती मनात म्हणते...

"ओनली, ही मस्ट टेक सम एक्सरसाईज ...अँड धिस टॉनिक."

ते कागदावर नाव लिहून देतात...अन बाहेर पडतात. त्यांच्या मोटारीची घरघर तिला ऐकू येते. अन मनात उगाच शंका थरथरते–ती प्रिंसिपालना विचारते.

"डॉक्टर काही लपवीत तर नव्हते ना ?"

"नाही...ही डिडन्ट से एनीथिंग टु मी...! वेल, लुक आफ्टर हिम..."

तिला हायसं वाटतं–ती म्हणते, "आय वुड."

–संध्याकाळी ती होस्टेल–अटेंडंटकडून बाजा-

अनुक्रमणिका

रातून टॉनिक मागवून घेते...डायनिंग हॉलमध्ये ती 'डी' मधल्या मुलांच्यासोबत जेवायला बसते ...(आता ती 'डी' ची वार्डन आहे म्हणून. टेबल बदललंय्.) हातात बाटली.

परीक्षित दोन जागा सोडून बसलाय. ती त्याला शेजारी बसायला सांगते...ती समोर बाटली ठेवते.

"हे काय ?"

"तुझं टॉनिक."

"म्हणजे ?"

"डॉक्टर्स ऑर्डर्स..."

"बट, मॅडम, आय एम ऑलराईट..."

"नो, यू आर नॉट !" तिचा स्वर चढतो... "टू स्पून्स ट्वाईस अ डे, बिफोर मील्स...!"

परीक्षित उंदरासारखा दबून बसलाय्...ती बाटली हालवून दोन चमचे पेल्यात ओतते...मुलं मुकाट्याने पाहत असतात.

"हे टॉनिक, अन रोज थोडा व्यायाम...यू सॉ डॉक्टर्स रिपोर्ट ?"

तो उत्तर देत नाही. घुम्यासारखा बसून रहातो.

"यू हर्ड मी ?" ती–तीव्रपणे विचारते...

"येस मॅडम !" परीक्षित भेदरून म्हणतो ..."बट मॅडम..."

"नो बट्स ! अँड नो मोअर एक्स-क्यूजेस !" तिच्या स्वरातला तीव्रपणा गेलाय्... इतर मुलं ऐकताहेत.

"तुला वेळ नाही...पण काढायचा...फक्त १५–२० मिनिटं. कुठलेतरी गेम्स, नाहीतर आसनं, वॉकिंग, रनिंग..."

"रनिंग ?"

"व्हाय नॉट ?...त्याला कमीतकमी वेळ लागेल..."

"येस, मॅडम !" वलविंदर मध्येच बोलतो "... मी नि रवी–सलीम रोज सकाळी धावायला जातो..."

"यू कॅन जॉईन अस, परीक्षित" हा सलीम-त्याचा रूम मेट.

"आपल्या होस्टेलखालचा डांबरी रस्ता किती सुरेख आहे धावायला...मोसमही चांगला आहे..." ती म्हणते....

चार दिवस ती रोज उठल्यावरोवर परीक्षितच्या खोलीत जाऊन पाहून येते...बिछाने रिकामे दिसतात. म्हणजे परीक्षित सलीमबरोबर नियमित व्यायाम घेऊ लागलाय...जोडीला नियमित टॉनिक...जेवण तिच्या शेजारी...साऱ्यावर तिची देखरेख...

'धाड ! धाड !...' तिच्या दारावर धक्के बसत असतात.

ती खडबडून जागी होते...

"मॅडम, मॅडम, उठा लवकर !" वलविंदरचं ओरडणं.

ती पटकन गाऊन चढवते. दार उघडते.

समोर भेदरलेली पाच सहा मुलं... अन ज्यू. वार्डन मि. धवन... सलीम रडत असतो... रवीचे लाल डोळे, वलविंदरचा रडवेला आवाज...

"मॅडम, परीक्षित..."

"परीक्षित व्हाट ?" ती घाबरून विचारते.

"ही सीम्स डेड, मिस ठाकूर..." मि. धवन हळूच सांगतात.

"गॉड !" ती मटकन पलंगावर बसते... सारं एकदम बधिर होतं...

मि. धवन सांगत असतात :

"सलीमबरोबर रोजसारखा तो धावायला गेला... बाकीची मुलं वेगाने पुढे निघून गेली... तो रेंगाळला नेहमीसारखा... ही मुलं परत फिरली, तो त्यांना अर्ध्या वाटेवर पालथा पडलेला दिसला... मग त्यांनीच त्याला उचलून आणलं अन मला जागवलं. तो बाहेर व्हरांड्यातय. मी प्रिंसिपालला फोन केलाय... अँब्युलंस येतेय..."

– पुढच्या हालचाली तिला स्वप्नात पाहिल्यागत वाटतात.

बाहेर अँब्युलन्सचा भोंगा... चौघांनी उचललेला परीक्षितचा निश्चेष्ठ देह. प्रिंसिपाल उशाशी. ती बाजूला... आणखी इतर चेहरे... ती वारंवार परीक्षितचा हात दाबून बघतेय... नाडी गेलीय... पण रक्त धावत असल्याची सरसर म्हणजे जिवंतय ? मिलिटरी हॉस्पिटल... पांढरं टेबल... स्टेथॉस्कोप लावून तपासत असलेले

पांढरे कोट... दोन–तीन... त्यांचे मख्ख चेहरे... हलणाऱ्या माना... धवन सारं सांगतायत.

"ही इज डेड...डाइड एन अवर ऑर सो अँगो." डॉ. सॅलेटोर.

"वट हाऊ... व्हाय ?" हा प्रिंसिपालचा आवाज.

"हार्ट फेल्युअर... ही हॅड अ विक हार्ट..."

"विक हार्ट..." तो ध्वनि तिच्या कानात घुमतो.

"पण गेल्या आठवड्यातच त्याचं मेडिकल चेकअप झालं होतं. डॉक्टर !" प्रिंसिपालचा त्या शब्दांवर विश्वास बसत नाही...

"पुष्कळदा साध्या तपासणीत समजत नाही." डॉक्टर म्हणतात... "विक हार्ट, अन त्यात रनिंगचा स्ट्रेन ! इट कोलॅप्स्ड..."

ते शब्द तिच्या मनाला दंश करून जातात.

निर्जीव देह घेऊन अँम्ब्युलंस परत येते. तोवर कॅम्पसची कळा बदललीय. शाळेसाठी जायला निघालेले मुलामुलींचे, नोकर शिक्षकांचे घोळके भयभीत, चकित, कुजबुजणारे. एकच गर्दी. धावाधाव–

मधल्या असेंब्लीहॉलमधे परीक्षितचा देह ठेवलाय. मुलं फुलांनी सजवतायत. हलक्या, मंद स्वरात प्रार्थना सुरू होतात.

परीक्षितच्या वडिलांना फोन केलाय. पण ते हेडक्वार्टर्समधे नाहीत... दूर आसामात कुठेतरी ड्यूटीवर गेलेले. तिथे त्यांचा शोध सुरूय... फोन्स चालूयत... ते येतील तेव्हा पुढचं. मग वर्फाच्या लाद्यांवर देह ठेवला जातो.

– रात्रभर ती थिजून बसलीय... डॉक्टरांच्या मघाशीच्या वाक्याचं विष हळूहळू भिनत चाललंय... विचाराचा स्पंद उठतो... मोडून पडतो...

सकाळी प्रिंसिपाल सांगतात :

"मृतदेह रस्त्यावर सापडला... म्हणून पोलिसांना रिपोर्ट केला... पोस्टमार्टेम करावंच लागेल."

"त्या परवानगीसाठी तरी स्क्वॉ. लीडर बॅनर्जीशी... काँटॅक्ट व्हायला हवा..." डॉ. सॅम्युअल म्हणतात.

"रजिस्ट्रार, बर्सर मल्होत्रा फोनपाशीच बसूनयत... आळीपाळीने."

"गो. ईट समथिंग, मिस ठाकूर..." संध्याकाळी मिस होम्स म्हणते.

"नो ! थँक्स, मिस होम्स !...नॉट टुडे."

रात्री कधीतरी बॅनर्जी सापडतात. फोनवर परवानगी देतात... त्यांना वेळेवर पोचणं अशक्यय...

सकाळी पी. एम. साठी सरकारी दवाखान्यात न्यायला गाडी तयार होऊन उभीय... चौघेजण आत येतात. ती हळूच म्हणते

"सर, आय वुड अकंपनी हिम !"

प्रिंसिपाल तिच्याकडे काहीसे चकित, गोंधळलेल्या... नजरेने पाहतात.

"यू नीडन्ट कम, मिस ठाकूर !"

"सर, आय वाँट टु कम... त्याचं जवळचं कुणीच नाही... अँड..."

"ही वाँटेड टु कॉल मी ग्रॅनी !'... तिला सांगावंसं वाटतं... पण शब्द बाहेर पडत नाही... टु हिम आय वॉज ग्रॅनी.

ती मोटारीत त्याच्या उशाशी जाऊन बसते.

एकंदर प्रकरण चार तास चालतं... दवाखाना १० मैलावर... मग डॉक्टरांचा शोध पोस्टमार्टेम... मग रिपोर्ट मिळतो... "हार्ट फेल्युअर..." दुसरं काही सापडलं नाही.

पी. एम. रूमच्या बोडख्या टेबलावर देह ठेवलाय... विद्रूप झालेला... पण पांढऱ्या चादरीत लपेटलेला.

ती क्षणभर ते पहात उभी राहते... अन एकाएकी दुसरंच दृश्य डोळ्यासमोर तरळतं– तसंच टेबल, पांढरी चादर. चॅरिंग क्रॉस हॉस्पिटल. लंडनचं...

तिने त्या रविवारी डॅनी येणार म्हणून त्याला आवडणारी 'ट्यूना' फिश मुद्दाम आणलेली असते... नेहमीचंच दुकान. नेहमीचाच डबा BONITO... करी केली. डॅनीने भरपूर खाल्लीय.

रात्री इयनचा फोन

"सो यू पॉईझन्स डॅनी, शशी !"

"व्हॉट ?"

"डोंट अॅक्ट ! बिकॉज ही डिडन्ट वाँट टु गो विथ यू टु युवर रॉटन कंट्री ! आय नो."

"नो इयन नो"

"गो टु चॅरिंग क्रॉस हॉस्पिटल अँड फाइन्ड व्हॉट यू डिड."

आपण हॉस्पिटलमधे कसेबसे पोचतो. नर्स नेते... समोर पांढऱ्या टेबलावर डॅनीचा देह. पांढऱ्या चादरीत गुंडळलेला. इयन कोपऱ्यात उभाय.

नर्स हळूच सांगते... "टोमेन पॉईझनिंग... समथिंग इन फुड ही एट..."

म्हणजे आपण आणलेला ट्यूना-फिशचा डवा ! पण त्यावरची तारीख आपण वाचलेली नसते. डोकं गरगरू लागतं...

इयनची तीक्ष्ण नजर मात्र आपल्याला अपराधी ठरवीत असते ! मर्डरेस... मर्डरेस...

संपलं. इयनची ही खूणही नाहीशी होते... मग त्याचं नाव तरी कशाला ठेवायचं ?... अन त्याचा देश तरी कशाला हवा ?...

– वच्चूचे आंधळे डोळे, फुटणाऱ्या करंज्या, मोडून पडलेला गणपती तिरस्काराने पेटलेला इयन, आपल्या करीने मेलेला डॅनी... अन् आता हा परीक्षित...

आपण त्याला व्यायाम घ्यायला सांगितलं. धावायला जा म्हणून आग्रह केला... प्रॉमिस घेतलं... अन त्याचं मरण ओढून आणलं...

सरणावर त्याचा देह ठेवला, त्यावेळी तिला वाटलं त्यावर उडी घ्यावी... पण तिने हातांनी नुसते डोळे मिटून घेतले...

सूर्य कलला होता. हवेत थंडी भरली. झाडाच्या वेड्यावाकड्या सावल्या, स्मशानातला भयाण भकासलेपणा, घों घों, सुटलेला वारा तिच्या कानात घोगरे शब्द घोंगावत असल्याचा भास होतो.

"आय शॅल लिव्ह बियांड डेथ...
अँड शॅल सिंग इन युवर इयर्स..."

"सिंग व्हाट ?" तिच्या अंगावर काटा उभा राहतो...

"सिंग व्हॉट ?" दॅट आय एम गिल्टी ?... येस... येस परहॅप्स आय एम"


आय नो... माझे हे हात शापित आहेत... अभद्र, करंटे आहेत... पण का ?...

का ? व्हॉय ?...

□ □

नीलिमा भावे

हरवलेला



मुलं घरातून पळून का जातात, याची पाहणी करण्याची एक योजना आमच्या संस्थेनं हातात घेतली होती. या पाहणी–योजनेसाठी लहान मुलं निवडायला म्हणून मी तेव्हा एका रिमांड होममधे जात असे. रस्त्यावर संशयास्पद पद्धतीनं घोटाळ-णारी, बांद्रे सेंट्रल किंवा बोरीबंदरला गाडीतून उतरून बावरून इकडे तिकडे पहात असणारी, किंवा एखाद्या लहान–मोठ्या गुन्ह्यात अडकलेली मुलं पोलीस धरून आणायचे आणि त्यांना रिमांड-होममधे भरती करायचे. मग त्या मुलांशी बोलून, त्यांच्या घरचे पत्ते आणि इतर माहिती काढून घेऊन पोलिसांकरवी त्यांना त्यांच्या घरी पोहच-वण्याचं काम रिमांडहोमकडून केलं जायचं. गुन्हे करताना सापडलेल्या मुलातदेखील घरातून पळून जाऊन काही दिवस बाहेर राहत असलेल्या मुलांचं प्रमाण खूपच मोठं असायचं. अशा सर्व प्रकारच्या पळून आलेल्या मुलांना भेटून त्यांच्याशी बोलणं, शक्य तर त्यांच्या पालकांशी–शिक्षकांशी संपर्क साधून त्या मुलांबद्दल, त्यांच्या घरच्या परिस्थिती-बद्दल अधिक माहिती मिळवणं, हे आमच्या योजनेचं काम होतं.

एक दिवस मी अशीच नेहमीप्रमाणे रिमांड होमच्या केस फाइल्स चाळून हव्या त्या मुलांची नावं टिपून घेत होते. पाच–सहा नावं काढून झाल्यावर त्यातल्या एकाला बोलवायचं ठरवलं. जास्तीची नाव काढून ठेवणं आवश्यक असायचं, कारण त्यातले काही जण या चौकशीची वेळ येई-पर्यंत घरचा पत्ता कळून परतही पाठवून दिलेले असायचे. अशी यादी करून त्यातलं एक नाव चिठ्ठीवर लिहिलं–अब्दुल महंमद, राहणार अलीबाग, वय वर्षे दहा. चिठ्ठी घेऊन अब्दुलला आणायला पाठवण्यासाठी म्हणून मी रमेशला शोधायला लागले.

रिमांड होमच्या कचेरीत लहान सहान कामं करण्यासाठी होममधे दाखल केलेल्या मुलां-पैकीच दोन चार चुणचुणीत आणि आज्ञाधारक मुलं असायची. पाणी आण, फाईल नेऊन दे, अशी फुटकळ कामं. पण त्यांचं मुख्य काम म्हणजे चौकशीसाठी आतल्या मुलांना आणायला म्हणून चिठ्ठया घेऊन जाणं. अशाच कामावर रमेश तिथं नेमलेला होता. मी तिथे जायला लागले, तेव्हा-

पासून तो होता. तिथल्या इतर मुलांच्या मानानं तो लहान होता. चणीनं लहानखुरा, तसाच वयानंही लहान. दहाएक वर्षांचा वाटायचा. चेहरा फिकट पांढुरका, जरा अशक्त वाटणारा. डोळ्यात बापुडवाणे भाव. त्याला पाहिल्यावर "गरीब दिसतंय् पोरगं" अशीच भावना प्रथम मनात यायची. त्याच्याबद्दलचे होमच्या आतल्या शिक्षक, पर्यवेक्षक इत्यादी मंडळींचे रिपोर्ट्सही "चांगल्या वर्तणुकीचा" असेच होते. शिवाय त्याला लिहिता वाचता चांगलं येत होतं. शाळेत गेल्याचं विसरला नव्हता. रमेशला बोलावून मी त्याच्या हातात चिठ्ठी दिली आणि 'या मुलाला घेऊन ये', म्हणून सांगितलं. रमेश होममधे दोनतीन महिन्यापासून होता. आतली सगळी मुलं त्याच्या माहितीची झाली होती. तो चिठ्ठी हातात घेऊन जाण्यासाठी वळला. वळता वळता त्यानं ती वाचली, आणि त्याची पावलं क्षणभर थबकली. मला वाटलं, त्याला माझं अक्षर नीट लागलं नसेल. म्हणून चिठ्ठीत काय लिहिलंय्, ते मी त्याला सांगितले. तरी त्याचं पाऊल चटकन् उचलेना. "अरे, तुला माहित नसला हा मुलगा, तर विचार तिथे आत कुणाला तरी. पुष्कळ दिवस झालेत याला इथे येऊन. पाहलं की ओळखशील तू. बघ इथे तीन महिन्यांपूर्वीची तारीख आहे तो दाखल झाल्याची–" मी फाईल उघडून पहात त्याला म्हणाले. रमेशनं एकदा फाईलकडे पाहलं, मग पुन्हा एकदा चिठ्ठीवरचं नाव वाचलं. मग जराशा अनिच्छेनं, जरासा नाइलाज झाल्यासारखा तो जायला निघाला.

रमेश जिना उतरून गेल्यावर मी आमच्या योजनेची प्रश्नपत्रिका बाहेर काढली. त्यावर अब्दुल महंमदचे नाव लिहिले. रहाण्याचं ठिकाण, वय वगैरे लिहायच्या आधी त्याची फाईल नीट वाचून घ्यावी म्हणून उघडली. अब्दुलला चोरटी दारू नेताना पकडलं होतं. त्यानं आपला पत्ता मुंबईबाहेरचा, अलिबागचा दिला होता. पण प्रोबेशन ऑफिसरनं त्यात काहीतरी दुरुस्ती केलेली दिसत होती. वाचून पाहलं तर अलिबागच्या पत्त्यावर त्याच्या पालकांना लिहिलेलं पत्र परत आल्याचं त्यात लिहिलं होतं. पत्र परत आल्यावर अब्दुलला पुन्हा चौकशीसाठी बोलावून घेण्यात आलं होतं, आणि आपण खोटा पत्ता दिला असल्याचं त्यानं कबूल केलं होतं. पण खरा पत्ता मात्र तो सांगत नव्हता.

हा दहा वर्षांचा मुलगा घरी परत जायला तयार का नसावा, याचा मी विचार करायला लागले. याचे वडील फार संतापी आणि मारकुटे होते ? की त्याला छळणारी सावत्र आई होती ? की आईवडील नव्हतेच. आणि अनाथ म्हणून कुण्या नातेवाईकाकडे आश्रितासारखा राहत होता ? मोहाला बळी पडून घरातून चोरी करून पळाला होता ? की मोठ्या मुलांच्या वाईट संगतीनं फूस लावून आलेला होता ? सिनेमातम्या हीरो मंडळींना प्रत्यक्ष बघायच्या आकर्षणानं आला होता ? की कसल्यातरी भीतीच्या दडपणानं घरापासून पळाला होता ?

घर सोडून पळून येणाऱ्या मुलांची सर्वसाधारण कारणं अशीच असायची. पण घरची माणसं बोलवत असतील, तर बहुतेक मुलं परत जायला तयार असायची. बारा तेरा वर्षांखालची छोटी मुलं तर, घराबाहेर राहण्याचा अनुभव एकदा घेतल्यानंतर घरी परत जायला आतुरच असायची. पण हा अब्दुल मात्र वेगळाच दिसत होता. एवढचाशा दहा वर्षाच्या मुलानं आपलं छोटंसं गाव सोडून मुंबईसारख्या अफाट अनोळखी शहरात यावं आणि अशा येणाऱ्यासमोर वाढून तयार असलेलं आयुष्य जगावं. फूटपाथवर राहून हॉटेलातलं शिळं–पाकं अन्न खावं. मिळेल ते काम करावं. प्रसंगी भीकही मागावी. गुंडांच्या क्रौर्याला, वासनेला बळी पडावं. पावसात भिजावं, थंडीत कुडकुडावं. रस्त्यावरच्या बेवारशी कुत्र्यापेक्षा फारसं वेगळं नसलेलं आयुष्य जगत रहावं. पण घरी परत जायला नकार द्यावा. असं या अब्दुलच्या पूर्वायुष्यात काय घडलं असेल ? आणि पूर्वायुष्य, पूर्वायुष्य म्हणजे तरी काय ? त्याला समजू लागल्यापासून आतापर्यंत, म्हणजे सारा ४–५ वर्षांचा काळ–

अब्दुलला भेटायची माझी उत्सुकता वाढीला लागली. रमेशला जाऊन बराच वेळ झाला होता. अजून हा कां आला नाही ? एरव्ही तर चिठ्ठी हातात पडल्याबरोबर धावत जातो, आणि सांगितलेल्या मुलाला पुढे घालून लगेच येतो. आतून

मुलांना चौकशीसाठी घेऊन येण्याचं हे काम म्हणजे जणू काही एखादी दरबारी कामगिरी असल्यासारखं महत्त्वपूर्ण हसू त्याच्या एरव्हीच्या बापुडवाण्या चेहऱ्यावर उमटायचं. त्या दुसऱ्या मुलाच्या मागोमाग चालताना त्याच्या डोक्यात नेहमीचा गरीबीचा भाव असतो, पण जिवणीच्या कोपऱ्याशी मिष्किल कावेबाजपणाच्या स्मित छटा उमटल्याचा भास मला कधी कधी झालेला असतो. मुलाला घेऊन येण्याच्या त्या ५–१० मिनिटांच्या कालावधीत तो स्वतः गुन्हेगार म्हणून पकडला गेलेला मुलगा शासन यंत्रणेचा प्रतिनिधी असतो, आणि म्हणून त्या मुलाच्या वरच्या पातळीवर असतो. रमेशच्या दहा वर्षे वयाच्या डोक्यात खरं म्हणजे मीच हे सर्व विचार कोंबते आहे, असंही मला एकीकडे वाटत असतं. ऐट दाखवणं, वर्चस्व गाजवणं, स्वतःचं महत्त्व वाढवणं असले विचार रमेशच्या चेहऱ्यामोहऱ्याशी अगदी विसंगत नाहीत का?

पण अजून का आला नाही हा? मी माझ्या खुर्चीतून उठते, आणि खिडकीशी जाऊन बघते. समोरच्या आवारात रमेश दिसतो. कुणातरी मुलाशी बोलतो आहे. पण हा मुलगा चांगला १५–१६ वर्षाचा दिसतोय्. अब्दुलचं वय तर १० वर्षं म्हणून फाइलमध्ये लिहिलेलं आहे. प्रोबेशन ऑफिसरनं अंदाजानं लिहिलं असलं, तरी १० वर्षांचा मुलगा १५–१६ सारखा दिसणं कठीणच. अरेच्चा पण तो मुलगा नुसता बोलायला थांबलाय् वाटतं. म्हणजे रमेशनं त्याला थांबवून धरलंय्. त्याची आत्ता खेळायची सुट्टी आहे, ती त्याला वाया घालवायची नाही. बोलता बोलता तो चालायला, आणि मग तर मान वळवून धावायलाच लागतो. तो जातो तशी रमेश इकडे तिकडे पाहून, दुसऱ्या एका मुलाला बोलवून काहीतरी विचारत राहतो. माझं आश्चर्य वाढत जातं. एव्हाना चांगली १५–२० मिनिटं झालेली असतात. अब्दुल कुठेच सापडत नसेल, खेळायच्या मैदानात, अभ्यासाच्या वर्गात, हस्तव्यवसायाच्या वर्गात, मुदपाकखान्यात, किंवा अगदी सिकरूममध्ये देखील, तरी रमेननं केव्हाच परत येऊन मला तसं सांगायला हवं होतं. पुष्कळदा मुलं पहिल्या चौकशीत खोटं नाव देतात. अब्दुलनं पत्ता खोटा दिल्याचं दिसलंच होतं. नावही खोटं दिलं असेल, तर तो आता त्या नावाला ओळख देणार नाही, ही शक्यता होती. पण रमेशनं परत येऊन काय ते सांगायला नको होतं का? तो आपण नुसता वेळ काढत इकडेतिकडे पहात होता. परत येण्याचा त्याचा इरादा देखील दिसत नव्हता. मला त्याचा जरा रागच आला. अब्दुल सापडत नव्हता, तर दुसऱ्या तीन चार मुलांची नावं माझ्याजवळ होती की या मुलांच्या प्राथमिक चौकशा झाल्या असत्या, तर त्यातली १–२ मुलं तरी आम्हाला आमच्या पाहणी योजनेत समाविष्ट करता आली असती. आजचा दिवस काही अगदीच फुकट गेला नसता.

टेबलाशी परत येऊन दुसऱ्या एका मुलाच्या नावाची चिठ्ठी लिहिली आणि पुन्हा खिडकीशी जाऊन मी रमेशला शोधायला लागले. तो आता जरा पलीकडे जाऊन उभा होता. माझी नजर त्याच्यावर पडते न पडते तोच तो मान फिरवून दुसरीकडे पहायला लागल्याचं मला दिसलं. म्हणजे मी त्याला शोधतेय हे त्याला माहीत होतं तर! माझ्या हालचालीवर त्याचं पूर्ण लक्ष होतं आणि त्याला मला टाळायचं होतं. म्हणून तो कचेरीत परत देखील येत नव्हता. मला काही समजेच ना. मी त्याला हाक मारून बोलावलं. पण त्यानं न ऐकल्यासारखं केलं. तिथेच उभ्या असलेल्या दुसऱ्या एका मुलाला खुणा करून मी त्याच्याकरवी रमेशचं लक्ष माझ्याकडे वेधून घेतलं. आता त्याचा अगदी नाइलाजच झाल्यासारखा दिसला. त्यानं एकदा डोळे उचलून माझ्या दिशेनं पाहिलं आणि मग हळूहळू पावलं टाकीत तो ऑफिसकडे आला.

"अरे काय झालं तरी काय? अब्दुल महंमद सापडला नाही का तुला? मग परत येऊन लगेच तसं सांगायचं नाहीस का? उगाच वेळ-काढूपणा कशाला करीत होतास?"

मी इतकी बोलले पण तरी याचं आपलं एक नाही, की दोन नाही. नुसता खाली बघत पायाच्या बोटांची चाळवाचाळव करीत होता.

"बघ आता तू विनाकारण उशीर केलास, म्हणून माझी सगळी दुपार फुकट गेली. ऑफीस बंद व्हायची वेळ आली. दुसऱ्या कुणाला बोलवून आणणं देखील शक्य नाही आता. जा तू आपल्या कामाला."

हे शेवटचं वाक्य मी जरा जोरातच म्हटलं,

पण रमेश काही जागचा हलला नाही. मी त्याच्याकडे बघायला लागले, तशी त्यानं माझी नजर चुकवली. पायाची चुळबुळ चालूच होती. ओठ जरा विलग होऊन पुन्हा मिटले.

"काय झालं रे? कुणी रागावलं का तुला आत?" मला विचारल्याशिवाय राहवलं नाही.

"बाई, मीच अब्दुल महंमद" हळू आवाजात वाक्य आलं. नजर अजूनही खालीच होती. मी नकळतच खुर्चीत पुढे झुकले. माझ्या हालचालीसरशी त्याने डोळे उचलून वर पाहिलं. माझ्या आश्चर्यानं विस्फारलेल्या डोळ्यात त्याची अगतिकतेने ओथंबून राहिलेली नजर काहीतरी आधार शोधते आहे, असं मला वाटलं. की तो नुसता भासच होता? माझ्याच मनाचा खेळ?

"तू खोटं नाव दिलं होतंस?"

"हो"

"का?"

"मी आधी पण एकदा इथे येऊन गेलोय्. तीन वर्षांपूर्वी. खरं नाव दिलं असतं, तर जुनी फाईल शोधून मला तुम्ही घरी पाठवलं असतं."

"तुला जायचं नाही घरी?"

"नाही."

"मग कुठे रहाणार आहेस?"

"कुठे पण."

"पकडला जायच्या आधी कुठे रहात होतास?"

"एका वाडीत रहात होतो, दादा लोकांच्या सोबतीने."

"किती दिवस?"

"लक्षात नाही. वर्ष–दीड वर्ष असेल"

"म्हणजे दीड वर्षापासून तू मुंबईतच आहेस?"

"हो."

"म्हणजे घरून दुसऱ्यांदा पळालास?"

"हो"

"का पळालास?"

एक नाही, दोन नाही.

"घरी आवडत नाही तुला रहायला?"

उत्तर नाही.

"काय रे?"

"आवडतं की" निरर्थकपणाच्याही पलीकडचं उत्तर.

(कदाचित माझा प्रश्नही तसाच!)

"मुंबई जास्त आवडते?"

या प्रश्नाला देखील उत्तर नाही.

"पळून मुंबईलाच कसा काय आलास तू?"

"दुसऱ्या लहान शहरात लौकर सापडून परत पाठवून देतात. आणि गेल्या वेळी आलो तेव्हा मुंबईची थोडी माहिती पण झाली होती."

एवढं बोलणं चाललं होतं, तेवढ्यात ऑफिसची वेळ संपून गेली. रमेशकडून पुन्हा एकदा त्याच्या घरचा पत्ता घ्यायला हवा होता. ते काम दुसऱ्या दिवशीवर टाकणं मला योग्य वाटेना. न जाणो, आज रात्रभरात त्याचा विचार पालटून उद्या पुन्हा त्यानं एखादा वेगळाच पत्ता दिला तर! आता यावेळेस तो सरळपणे सर्व काही सांगण्याच्या मूडमध्ये दिसत होता. त्याचा फायदा घेऊन मी त्याला पत्ता विचारून घेतला, आणि त्यानं एक व्यवस्थित पत्ता दिला देखील.

दुसऱ्याच दिवशी मी उत्तराचं पाकीट सोबत पाठवून रमेशच्या वडिलांना एक चौकशीचं पत्र लिहून टाकलं.

त्यादिवशी ऑफिसमध्ये रमेश माझ्या टेबलच्या जवळपास यायचे टाळत होता. त्यामुळे आदल्या दिवशीच्या आमच्या संभाषणाची मी त्याला ओळख दिली नाही. नुसता नेहमीप्रमाणे मुलांच्या नावाच्या चिठ्ठ्या त्याच्यासाठी दिल्या.

मी रमेशच्या वडिलांना पत्र लिहून पोस्टात टाकलं, त्याच्या बरोबर पाचव्या दिवशी म्हणजे जवळजवळ उलट टपालीच त्यांचं उत्तर आलं. पाकीट फोडून पाहिलं तर, वहीच्या पानाहून थोडी मोठी अशी चार पानं पाठपोट, म्हणजे एकूण आठ पानं मजकूर होता. बेताची मार्जिन सोडून, व्यवस्थित पॅरेग्राफ पाडून, एकसारख्या सुवाच्य अक्षरातलं उत्तर स्वतः रमेशच्या वडिलांनीच लिहिलं होतं.

रमेशचे वडील त्यांच्या लहानशा गावातल्या सरकारी दवाखान्यात कंपाऊंडर होते. रमेश त्यांचा सगळ्यांत मोठा मुलगा. त्याचं वय बारा वर्षांचे होते. त्याच्याखाली आणखी तीन भावंडं होती. दोन भाऊ आणि एक बहीण. रमेश वयाच्या आठव्या

अनुक्रमणिका

वर्षापासूनं घरातून पळून जायला लागला होता. गेल्या चार वर्षात पाच सहा वेळा तरी पळाला होता. कधी शेजारच्या तालुक्याच्या गावाला, कधी आणखी लांब, तर दोनदा खुद्द मुंबईलाच गेला होता. कधी ओळखीच्या लोकांनी, तर कधी पोलिसांनी पकडून परत पाठवलं होतं.

इथपर्यंतची माहिती रमेशने सांगितलेल्या माहितीशी जुळत होती. या खेपेला तो मुंबईला आल्याचं त्याच्या वडिलांना माझ्या पत्रातूनच कळलं होतं, नाहीतर त्याचा काही पत्ता लागेल, ही आशा त्यांनी सोडून दिली होती.

पण रमेशच्या कहाणीतला कोड्यात टाकणारा भाग अजून पुढेच होता. रमेशच्या वडिलांनी पत्रात लिहिलं होतं, की रमेशला चोरून खायची संवय आहे. फक्त खायच्या वस्तूच चोरतो. पैसे वगैरे चोरत नाही. घरातून पळून जाताना सुद्धा त्यानं कधी पैसे किंवा इतर कोणती वस्तू बरोबर नेली नव्हती. पण अन्नाची चोरी तो करायचा. घरातल्या खायच्या वस्तू आईच्या नकळत घेऊन खाणं तर सोडाच. पण गावातल्या देवळातून देवासमोर ठेवलेली केळी, गूळ, खोबरं वगैरे वस्तू चोरतानाही त्याला पुजाऱ्यानं पकडलं होतं. त्याला कितीही समजावले, मारले, तरी त्याच्या या सवयीत फरक पडत नव्हता. एरव्ही तो वागायला गरीब होता. उलट उत्तर करीत नसे. सांगितलेली कामेही करायचा. फारसा बोलत मात्र नसे कुणाशी. हा एक खायच्या वस्तूंचा मोह सोडला, तर त्याचं इतर वागणं ठीक होतं. शाळेत मात्र पुढं पुढं नीट जाईनासा झाला होता. खाण्याबद्दल त्याचं काही विचित्र तंत्र होतं. जेवतांना त्याच्या आईनं त्याला खूप आग्रहानं वाढलं, तरी खायचा नाही. जेवणं आणि झांकपाक झाली, की नंतर आई झोपल्यावर चोरून खायचा. अगदी पोळी–भाकरी सुद्धा अशीच खायचा. नंतरनंतर आई त्याला त्यानं नको म्हटले तरी ताटात वाढायला लागली. तर हा ते पदार्थ पाटाखाली सरकवून ठेवायचा, तेव्हा जेवताना खायचा नाही. जेवणे झाली की नंतर हळूच येऊन घेऊन जायचा. शाळेत वर्गातल्या मुलांच्या डब्यातले चोरायचा.

रमेशला पळून जाण्याची आणि परत आणलं जाण्याची तपशीलवार आणि क्रमवार माहिती त्याच्या वडिलांनी लिहिली होती. आणि शेवटी लिहिलं होतं, की तो असं का करतो, ते समजत नाही. तो जर घरी यायला तयार नसेल तर त्याला एखाद्या संस्थेत ठेवावं. त्याच्या खर्चासाठी थोडेफार पैसे पाठवायला ते तयार आहेत.

पत्र वाचून झाल्यावर त्याची घडी करून पाकिटात ठेवताना मी विचार करीत होते, की त्याच्या वडिलांकडून असं काही पत्र आल्याचं रमेशला सांगावं की नाही ? वडिलांनी काय लिहिलंय ते कळून घेण्याची उत्सुकता त्याला असेल का ? तो घरी न आला तरी चालेल, असं त्यांनी लिहिल्याचं ऐकून त्याला काय वाटेल ?

पण खरं म्हणजे मला विचारात टाकणारा खरा जटिल प्रश्न वेगळाच होता. इतक्या कळकळीनं भरलेलं, व्यवस्थितपणे लिहिलेलं, भाषेवरचं बऱ्यापैकी प्रभुत्व दाखवणारं पत्र लिहिणारे गृहस्थ आपल्या दहा–बारा वर्षांच्या अजाण मुलापासून इतके दूर कसे गेले ? त्याला काय हवंय्, ते त्याला कशा पद्धतीनं द्यायला हवं हे त्यांना कसं कळलं नाही ? रमेश आणि त्याचे आईवडील यांच्यात ही दरी कशी निर्माण झाली ?

आपली आई ठीक होती, वडील मात्र कधी कधी फार मारायचे, असं रमेश मधे बोलता बोलता बोलून गेला होता. पण फार म्हणजे किती ? मारण्याची तक्रार तशी बऱ्याच मुलांची असायची.

पत्रात उमटलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, रमेशच्या मनात असलेल्या त्यांच्याबद्दलच्या ठशांशी मी सांगड घालून पहात होते, ती काही जुळत नव्हती. रमेशच्या दृष्टीनं पहायचं झालं, तर त्यांचं त्याला दिसणारं रूप हेच खरं रूप होतं आणि रमेशची आई कशी होती ? अशक्त, गांजलेली दबलेली, वैतागलेली की आणखी कशी ? घरात काही व्यसनं किंवा इतर तणाव होते ? त्याच्या आई वडिलांना प्रत्यक्ष भेटल्यावरच या परिस्थितीवर काही प्रकाश पडू शकला असता. पण त्यांना मुंबईला बोलावून घेणं ही आमच्या पहाणीच्या क्षेत्राबाहेरची गोष्ट होती. ते पत्र मी माझ्या जवळच्या फाईलमधे लावून ठेवलं. एक दोन दिवसानंतर सहज विचारावं तसं रमेशला विचारलं, "का रे, वडिलांनी परत बोलावलं तर जाशील, का ?"

तो किंचित् मान डोलावून "हो" म्हणाला. पण तसं म्हणताना त्याच्या जिवणीच्या कोपऱ्यात ते वारकंसं मिष्किल कावेबाज हसू चमकल्या-सारखं मला वाटलं. तो "हो"कार उघडउघड औपचारिक होता.

त्यानंतर तीन चार दिवसांनी रमेश ऑफिसात दिसला नाही. त्याच्या ऐवजी दुसराच एक नवा मुलगा यायला लागला होता. प्रोबेशन ऑफिसरकडे चौकशी केल्यावर त्याच्या वडिलांचे पत्र आल्यामुळे त्याला घरी पाठवल्याचं कळलं. हे पत्र त्यांनी रिमांड होमच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या नावाने पाठवलं होतं. अल्पवयीन मुलाचे वडील त्याला घरी न्यायला तयार आहेत म्हटल्यानंतर न पाठवण्याचा प्रश्नच नव्हता. मुलाला त्याच्या वडिलांच्या हवाली केल्यावर रिमांड होमचं काम संपलं होतं.

आणखी अनेक आठवडे गेले, आणि रिमांड होमकडे रमेशच्या वडिलांचे आणखी एक पत्र आलं. रमेश घरातून पुन्हा पळाला होता, आणि आता मात्र ते त्याला परत ठेवून घेणार नव्हते. तो असं का करतो ते समजत नाही, त्याच्याशी कसं वागावं ते समजत नाही, असंही त्यांनी लिहिलं होतं.

बारा वर्षांच्या मुलाच्या मनाचा थांग त्याच्या सख्ख्या आईवडिलांना लागत नव्हता. लौकिक-दृष्टचा त्याची आपली असलेली माणसं त्याला परकी वाटायला लागली होती. थंडी-वारा-पावसात निवारा, अंगात कपडा, पोटात भुकेच्या वेळेवर अन्न अशा सर्व गरजा भागत असताना देखील ८-१० वर्षांच्या एका लहानशा मुलानं जगाच्या अफाट वादळी समुद्रावर आपल्या आयुष्याची छोटीशी तकलादू होडी खुशाल सोडून द्यावी, इतकं त्याचं मन बिघडायला काय कारणं झालं असावं? एकदा घरातून पळालेली मुलं बाहेरच्या जगाचा एक अनुभव घेऊन झाला, आणि घरचे लोक परत घ्यायला तयार असले, तर पुन्हा घर सोडून जात नाहीत. रमेश मात्र एकदा घर सोडल्यानंतर पुन्हा घरात रहायला तयार नव्हता.

आमच्या प्रश्नपत्रिकेमधले आवश्यक ते रकाने मी भरले. पण घर सोडून जाण्याची कारणं लिहायची वेळ आली, तेव्हा मला काहीच लिहिता येईना.


रमेशच्या या गोष्टीला आता विसाहून अधिक वर्षं होऊन गेली आहेत. तो आता जगाच्या पाठीवर कुठे असेल, कसा वाढला असेल, काय करीत असेल, कसा दिसत असेल, याचा विचार अधूनमधून माझ्या मनात येतो. मोठं झाल्यावर त्यानं स्वतःचं-घर-खोपटं का होईना-केलं असेलच. त्यानं संसार मांडला असेल का? त्याला मुलं असतील का? त्याच्या मुलांशी त्याचे संबंध कसे असतील?

घरात रहायचं नाकारणाऱ्या त्या १०-१२ वर्षांच्या मुलानं माझ्या मनातच एक घर केलं आहे. आणि त्या मनातल्या घरात रहाणाऱ्या मुलाचा चेहरा कायम फिकट पांढरा, अशक्त, बापुडवाणा, मात्र मधूनच जिवणीच्या कोपऱ्याशी कावेबाज हसू घोळवणारा आहे. वर्षानुवर्षं मुंबईच्या फूटपाथवरून हिंडणाऱ्या, रहाणाऱ्या, भांडणाऱ्या, भीक मागणाऱ्या, मोटारी पुसणाऱ्या, पत्ते खेळणाऱ्या मुलांत मी तो चेहरा शोधते आहे. तो मला सापडत नाही, आणि माझ्या मनातलं त्याचं घर आणखीनच पक्कं होतं

□ □

चिंतन   बाबा आमटे
शब्दांकन : सुरेश द्वादशीवार

अश्रूंच्या नोंदी



आपण सर्वत्र हजर राहू शकत नाही म्हणून
परमेश्वरानं आई निर्माण केली
आणि फुलवली वात्सल्याची पखरण.
ज्यांच्या पावलांना कुटुंबांची कुंपणं
अडवू शकत नाहीत
अशा घडपडणाऱ्या पोरांच्यासाठी
त्यानं निर्माण केले
मातृहृदयी महापुरुष.
△
साने, पांडुरंग सदाशिव
घडपडणाऱ्या पावलांचा असा वत्सल पथदर्शक.
त्यांच्या संवेदनाचा सल्लागार,
विवेकाचा वाटाड्या
जाणिवांचा जाणकार स्वप्नांचा सहकारी
अन् भविष्यांचा भागीदार.
△
माझ्या स्मरणांच्या गाथेत
त्याच्या अश्रूंच्या नोंदी आहेत.
देह दुखावला पण मन प्रसन्न आहे.
त्याच्यावरल्या श्रद्धेतलं सातत्य कायम आहे.
उगवणाऱ्या प्रत्येक दिवसात तो असणार म्हणून
माझा 'आज' समाधानात संपणार आहे.
△
जमिनीवरच्या फुलांवर अंधाराची
काळी चादर येते तेव्हा,
आकाशात फुलणाऱ्या फुलांना तारे म्हणतात
अन् आकाशातली फुलं उन्हानं कोमेजली की,
जमिनीवर उगवणाऱ्या ताऱ्यांना फुलं म्हणतात.'
मी अनुभवलं तुझं ताऱ्या-फुलांशी असलेलं नातं–
अन् तुझ्या मनाचं गंधजीवी चांदणं–
त्यानं माझी संवेदना प्रकाशमान बनली
अन् क्षीण क्षण निर्मितीक्षम झाले.
△
ज्यांना आयुष्याचं आव्हान स्वीकारता येत नाही
ते उपहासात समाधान मानतात
जे आव्हानाच्या दिशेनंच धाव घेतात–
ते समाधानाचाच उपहास करतात
भलत्याच कोरड्या नजरेनं– जीवन पाहणारे
खूप भेटले बर्फमूत बुद्धिवादी.
दूरस्थ दुःखाच्या नांवानं ते टाकायचे
एखादाच कोरडा उसासा

अपेक्षांच्या कुंपणातल्या व्यथांनी
ते व्याकुळही व्हायचे–
अन् कधी अश्रू ढाळायचे स्वतःसाठी.
ही स्व–गत माणसं तुझ्या अश्रूंचा
उपहास करायची.
त्यांच्या वक्तशीर जाणिवांना कळलेच नाही,
'तुझ्या आसवांना चिरंतनाचा स्पर्श होता.
△
ते तुला रडका म्हणायचे–
अन् तूही सगळ्या युगांची दुःखं जगल्यासारखा
गुडघ्यावर हनुवटी ठेवून बसायचास विषण्ण.
तुझ्या लेखणीनंही दाखवली
तुझ्या सांस्कृतिक श्रीमंतीएवढी
तुझी अश्रूसंपन्नता.
म्हणायचास,
'माझ्या अश्रूंनीच माझं ध्येय मी प्राप्त करीन
त्यात आहे वज्राचं, पाषाणाचं चूर्ण करण्याचं
सामर्थ्य,
अश्रूबिंदूत भरलं आहे, ब्रह्मांड.
जीवन ग्रंथाचा तो आहे मनोहर-पूर्ण-विराम
अश्रू माझा परमेश्वर आहे
माझा अश्रू हिरावून घेऊ नका
डोळ्यांच्या कडा सदैव ओल्या राहू दे.'
△
तुझ्या आसवांनी दाखवलं
माणुसकीचं विवेकी वळण,
कोणत्याही कृतीचा ती स्व-गत माणसं
करतात सौदा
तिची किंमत कानांनी ऐकून.
अन् काही ओळखतात तिचं मूल्य
आपल्या जाणकार नजरांनी.
तुझ्या नम्र नजरेत मी पाहिल्या
मूल्याच्या ओल्या जाणिवा.
△
तुझी समाधी कुणी शोधणार नाही
अन् पूजाही होणार नाही तुझ्या पादुकांची
तुझे पुतळे उभारले जाणार नाहीत.
कदाचित तुझे स्मारकही नसेल सार्वजनिक.
माणुसकीच्या गहिवरातून उमटणाऱ्या
प्रत्येक अश्रूत मात्र
घडेल तुझे व्यक्तिदर्शन.

अन् तू प्रवाहित होशील,
आसवांच्या पारदर्शक कबरीमधून.
△
तुझ्या क्षितिजाच्या परिघावरून
भरारी घेतांना मी अनुभवला
तुझ्या पंखांनी सोसलेला– जीवघेणा ताण.
अन् जाणवलं,
माझ्या पंखांच्या दुबळ्या फडफडीत
बोलकी– झालीय्
तुझ्याच मनाची आकाशभर तळमळ.
माझ्या जखमी पंखांना तेव्हाच जडला आहे
लांब पल्ल्यांचा ध्यास.
शिशिराच्या थंडीत कुडकुडताना,
उबाऱ्याचं आमंत्रण आता आकर्षक वाटत नाही.
त्या गारठ्यात गोठलेली
हिमालयाची अविचल कांचनशिखरं
पहावीशी वाटतात.
△
तुझ्यात ख्रिस्ताची अमर्याद सहनशीलता होती
तुझ्या प्रेमाला क्षितिज नव्हते.
तुझी क्षमाशीलता निःसंकोच होती,
तुझ्या करुणेला सर्वव्यापित्वाचं वरदान होतं–
माझ्या प्रत्येक कामात होती
तुझी अदृश्य उपस्थिती
तिनं माझ्या समजांना प्रतिष्ठा दिली
आकांक्षांना पावित्र्य दिलं–
अन् नात्यांना गोडवा दिला,
आयुष्यातल्या अंधारदऱ्यांचे तिनं बनवले
प्रकाशस्तंभ
आणि दिली माझ्या मनाला देशाच्या
अन् देवतांच्या थोरवीची गाणी.
△
हृदयांचा थरार अन् मनांची स्पंदनं
न टिपणारी तत्त्वज्ञानं–
तत्त्वहीन अन् प्रकाशशून्य होतात.
अन् तुझ्यासारखा आसवांचा ओलावा नसला की,
विचारवंतांचे दगडी पुतळे होतात.
त्यांचं 'मार्गदर्शन'ही मग होतं,
खडबडीत रस्त्यावरच्या उन्हाळी
प्रवासासारखं तापदायक.
त्यांच्या लेखी माणूस 'लक्ष्य' होतो,

तो अंतराचं दुसरं टोक म्हणून.
त्या टोकाला ते भिंती बांधायला निघतात,
अन् कड्यावरला माणूस पडू
न देण्याच्या प्रयत्नांत
ते माणसाला भिंतीच्या आड बंद करतात.
तुझ्या लेखी माणूस अंतराचं टोक नव्हता
अंतरं सांधणारा पूल होता.
ते शब्दबंबाळ विचारवीर,
घटनांच्या दर्शनी तुटकपणावरच
नजर खिळवून बसले.
तुला घटनांच्या परस्पर नात्यावर
आपला प्रकाशस्रोत वळवता आला.
म्हणूनच 'अभाव-बंद' तत्त्ववेत्त्यांच्या खडखडाटी
व्यवहारात चाललेली
'जीव-बंद' प्रवृत्तींची तुझी उपासना
आमच्यातल्या 'माणसा'ला वात्सल्याचा
स्पर्श घडवीत गेली.
△
जिवा-शिवाच्या अद्वैताचे रहस्य
उलगडून दाखवितानाही
ते स्वतःच्या मुक्तीसाठी वापरण्याचा स्वार्थ
तुला शिवला नाही
ती मुक्तीही तू खरी मानली नाहीस
म्हणालास, शिवाशी अद्वैत साधायचे तर
सभोवतीच्या जिवांशी ऐक्य साधायला शिका.
सारेच जीव त्या शिवाचेच आहेत अंश
आणि तो शिव या जीवांहून वेगळा नाही.
△
गवताची लुसलुशीत पाती पाहून द्रवणारा
अन् हातचा कोयता फेकणारा कमाल,
उपाशी कुत्र्यामागून तूप-रोटी-
घेऊन धावणारा नामदेव,
झाड तोडणाऱ्यापुढे मान देणारे
अन् झाड वाचविणारे तुलसीदास
अन् उपाशी वाघिणीच्या तोंडात
मांडी देणारे भगवान बुद्ध
या साऱ्यांत तू पाहिलेस जागलेले अद्वैत.
△
अन्नाचे साठेबाज नुसते धान्याचे साठे
दडवीत नाहीत
गरीब माणसांच्या मरणांचे साठे जमा करतात.
स्वार्थी माणसांच्या हाती जीवन
असे मरण होते
मेघ साऱ्यांसाठी रिते होतात
झाडं माणसांमाणसांत फरक करीत नाहीत
फुलं-श्रीमंतांसाठीच फुलत नाहीत
नद्या सारेच जीवन फुलवत निघतात
सूर्य साऱ्यांनाच प्रकाश अन् चंद्र साऱ्यांनाच
संतोष देतो.
अद्वैत हाच निसर्ग आहे.
त्याग हीच त्याची कसोटी आहे
बिंदु सिंधुसाठी
दगड इमारतीसाठी
अन् पिंड ब्रह्मांडासाठी.
△
मग का हे स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर ?
कशाला धर्मयुद्धे अन् जिहाद ?
'अवघे देखिले जन ब्रह्मरूप' कां नाही ?
या देशातल्या ऋषींनी,
साऱ्यांत पाहिला 'अवघा चैतन्याचा गाभा.'
त्यांनी साऱ्यांना वंदनीय मानले
म्हणाले, 'स्तेनानां पतये नमः'
समभावात सुख अन् ऐक्यभावात परमसुख ना ?
दुजाभाव हेच दुःख ना ?
तर कां हे वेगळेपण ? अन् तेही 'जाणत्या'त ?
△
म्हणालास, समाजवाद हा व्यवहारातला
वेदान्त आहे
सारे जर अमृताचे पुत्र
तर काहींच्या पेल्यांत वीष कसे ?
△
अद्वैताच्या साठेबाज वारसदारांनी मात्र
त्या जिवंत तत्त्वज्ञानाच्या केल्या जीर्ण पोथ्या.
त्यातल्या ओलाव्याचा स्पर्श
कुणाला होणार नाही
यांची खबरदारी त्यांनी घेतलीच
अन् स्वतःलाही त्याचा विटाळ होऊ
दिला नाही
△
इथं ज्ञानदेवाची समाधी त्याच्या
ज्ञानेश्वरीहून पुज्य होते
अन् गांधीचा पुतळा त्याच्या विचाराहून

आकर्षक होतो
सगळ्याच उदात्तांची मंडळींनी अशीच बनविली
अर्थहिन प्रतिके
तू म्हणालास,
जेव्हा अर्थहीन प्रतिके पूजिली जातात
तेव्हा धर्म यंत्रमय होतो
अन् तंत्रावाचून मंत्रांच्या निरर्थक पोथ्या होतात.

△

समुद्र स्वीकारण्याहून आपल्या डबक्यांनाच
समुद्र मानणे
हे अधिक सोपे आहे
खुल्या माणसांनी आपल्या डबक्यांना
समुद्रांची नावे दिली
धर्म, वंश, वर्ण, जाती, पोटजाती, भाषा, प्रांत.
अन् अद्वैतांचा महासागर हरवून टाका
तू म्हणालास, अरे, जरा आठवा
आपल्या संस्कृतीनं नदीतलं, वाहत्या पाण्यातलं
स्नान-पवित्र मानलं
समुद्रस्नान पूज्य मानलं,
डबक्यात काय डुंबता ?

△

तू विसरलास, तूच सांगितलेली
कालडीच्या त्या युवा संन्यस्ताची
दीनवाणी कथा.
चर-अचराचे सारे जग अद्वैताच्या जाणिवेनं
बांधायला निघाला तो
अन् आईचं प्रेत वाहून न्यायला
त्यालाच मिळाली नाहीत चार माणसं
त्या देहाचे तीन तुकडे करून
त्यातला एकेक त्यानंच नेला स्मशानात
स्वतःच्या खांद्यावरून
त्याच्या नावाचा वारसा सांगणारी माणसं,
आता मृतदेहांवर ओढवात तीन रेषा
अन्-पूर्वजांच्या पापांचे घेतात
निरर्थक प्रायश्चित्त.
अद्वैताच्या मंत्रद्रष्टयाला जे जमले नाही
ते करण्याचा अट्टाहास तू धरलास

△

या देशानं ईश्वरच ज्ञानरूप मानला.
अन् ते ज्ञान मानलं अनादि-अनंत.
'सनातनो नित्यनूतनः'
व्यासादिकांच्या लेखणीतून ते प्रकटलं
बुद्ध-गांधींच्या वाणीतून उतरलं,
उद्याच्या पिढ्याही त्या अमरत्वांची
गीतं लिहिणारंच आहेत.
'वेदात आलं ते अखेरचं
कुराणानं सांगितलं ते शेवटचं' असं म्हणणारे
त्या अनादि-अनंताला एकाच पुस्तकाच्या
मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत
बंदिस्त करण्याचा करतात वेडा प्रयत्न
अन् उद्याचा सूर्य नाकारायला घेतात
आजच डोळे बांधून.
इतिहासात थांबलेल्यांना वर्तमान
घडविता येत नाही
भविष्याची स्वप्नं पाहता येत नाहीत
अन् त्यांना इतिहासही कळलेला नसतो.
खिस्ताला सुळावर चढवणारे
शंकराचार्यांना आईच्या देहाचे तुकडे
करायला लावणारे
ज्ञानदेवाला छळणारे अन् तुकारामाची गाथा
बुडवणारे असतात
याच क्षणशब्द, शब्दबद्ध परंपरेचे मानकरी
अरे, त्यांनीच नाही का तुला बसवले
पांडुरंगाच्या दारात
आमरण उपोषणासाठी ?

△

संतत्वाचा पेहराव नव्हता, ती बिरुदं नव्हती-
फक्त त्यातली अथांग माणुसकी होती.
शब्दाशब्दातून पाझरत अन्
कृतीतून झिरपत होती.
पंढरपूरचा बंदिस्त परमेश्वर सोडवायला
प्राणांची बाजी लावलीस तेव्हा
मेणाहून मऊ असणारं संतत्व
आम्ही पाहिलं वज्राहून कठोर झालेलं-
आपल्याच विवेकाच्या स्पंदनांत हरवलेला तू
आपल्या श्रद्धेचा त्या महात्म्याचाही
आवाज ऐकायला तयार नव्हतास,
तेव्हाची तुझी उद्दाम माणुसकी
होती संतांच्या जिद्दीहून दाहक अन्
परमेश्वराच्या कृपेहून मोहक.

△

हसेच्या धगधगत्या मार्गानं जग
बदलायला निघालास
पण त्या धगीनंच क्रांती करपून जाईल म्हणून
मग निघालास करुणेच्या
लुकलुकत्या चांदण्या घेऊन
साऱ्याच सत्प्रवृत्तीच्या विजयाची
वेडी आस धरलीस
अन् स्वत:लाच साऱ्यांचा प्रतिनिधी मानलंस.
विसरलास,
अखंड चालणाऱ्या या लढाईतले आपण साधे
सैनिक असतो
लढणारे, मरणारे, हरणारे.
तुला लढणं जमलं, मरणंही जमलं—
फक्त हरणं जमलं नाही.

△

तुझ्या हृदयाची तार जुळली होती.
तीच घेऊन निघायचंस,
एकतारीच्या संगतीत संचार करणाऱ्या
एकाकी संतासारखं.
सभोवतीच्या वाद्यमेळाच्या घोळात अडकलास
अन् त्यांच्या तारा जुळवण्याच्या हरकतीत
आपल्याच स्वरांचा गळा कापून घेतलास.

△

म्हणालास अंधार असा नसतोच कधी
कमी प्रकाशाला मिळालेलं ते नाव आहे
चूक नावाचं काही अस्तित्वातच नाही—
सारं ज्ञानमय आहे
मग मृत्यू नावाची बाब तरी कशी असेल ?
जीवन हेच सत्यांचं अमृतत्वाचं नाव असल्याचं
तूच तर सांगितलंस
(गीताई–प्रवचनांचा तूच तर होतास
सच्चिदानंद)
मग हे जीवन नाकारून
कशाला कवेत घेतलास अभाव ?

△


ते म्हणतात,
न्यायी माणसासाठी अन्यायी व्यवस्थेत असतात
फक्त दोन जागा,
तुरुंग अन् मृत्यू.
तुला तुरुंग नवा नव्हता
मृत्यू तर यायचाच होता
त्यासाठी प्रयत्न का केलेस ?
करुणा होती, कणव होती, प्रेषितांची प्रज्ञा होती
मग का झाला पराभूत प्रेषित ?
एकाकी होतास, मनस्वी होतास
पण अनासक्तही होतासच
मग जीवनाच्या अनासक्तीत का धरलीस
मृत्यूची आसक्ती

△

(पू. साने गुरुजी यांचेवरील आगामी पुस्तकातील काही अंश साभार)

जगदीश गोडबोले

विश्रामगृहातील टिपणे



कुरूस पालच्या रेस्ट हाऊसच्या आवारात आज फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या जीपगाड्या हारीने उभ्या होत्या. कुरूस पाल हे बाहेरच्या सुसंस्कृत जगाचे शेवटचे ठाणे. मालखंडातील मधुपूर जिल्हा म्हणजे अंदमान. तसे मधुपूरचे अंदमान म्हणजे कुरूस पाल. पण खात्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे. कारण कुरूसपालच्या पलीकडे पसरले होते; सागाचे–सालाचे, साजाचे–बीजाचे–बांबूचे अपार जंगल. अपार धन देणारे. राज्याच्या तिजोरीत आणि इतरत्रही पैशाच्या राशी ओतणारे साहजिकच वेगवेगळ्या विभागीय वन–अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची कार्यालये कुरूस पालला होती. लठ्ठ्यांचे प्रचंड डेपो होते. जंगल ठेकेदारांचे अड्डे होते.

कुरूस पालच्या अनवट जंगलात कोडिया–कुरिया आदिवासीही राहत होते.

कुरूस पालचे फॉरेस्ट खात्याचे रेस्ट हाऊस अतिशय देखणे. नावाजलेले. अगदी गोऱ्या साहेबाच्या जमान्यापासून. गोऱ्या साहेबानेच ते बांधलेले. अस्सल सागवानाच्या लाकडाचे. साहेबाचे सर्वच काम अस्सल होते. साग म्हणजे साग. साहेबाला मिलावट पसंतच नव्हती. आता साहेबालाही जाऊन इतकी वर्षं लोटली, पण सागवानी लाकडावर वा एकूण वातावरणावर काळाचा साधा ओरखडाही उठला नव्हता. सागाचे, शिसवाचे फर्निचर, उंची कटलरी, बैरा–खानसामा–ऑर्डर्ली सर्व काही जसेच्या तसेच होते. उगाच एखादा गावठी साहेब काहीतरी आगंतुकपणा करायचा, पण एरवी सागाची गाठ भक्कम होती, टणक होती.

रेस्ट हाऊसच्या वातावरणात एक हलचल होती. सी. एफ्. साहेबांची व्हिजिट होती. काल संध्याकाळपासूनच सी. एफ्. साहेबांचा इंतजार होता. साहेबांच्या स्वागतासाठी सगळे विभागीय वन–अधिकारी जातीने हजर होते. साहेबांची गाडी आली की तत्परतेने पुढे होऊन दरवाजा उघडण्याची संधी साधायचे प्रत्येकाच्या मनात होते. त्यासाठीच काल रात्री अकरापर्यंत सर्वजण एकेक करून थांबले होते. पण रायसाहेब आले नव्हते. सहसा असे घडायचे नाही. रायसाहेबांचा टाईम कधी चुकायचा नाही, अर्थात चुकला तरी इलाज नव्हता. साहेब तो साहेबच !

रेस्ट हाऊसच्या पोर्चमध्ये सगळचा विभागीय वन–अधिकाऱ्यांची बैठक जमली होती. सगळयांचे अर्धे लक्ष गप्पात आणि अर्धे लक्ष रस्त्याकडे होते. प्रत्येक साहेबाचे दुय्यम–तिय्यम साहेब आपापल्या साहेबाच्या इशाऱ्याकडे लक्ष ठेवून जीपभोवती रेंगाळत होते. साहेबाच्या एका इशाऱ्यानिशी जीप्सची इकडेतिकडे दौडधूप होत होती. कोणाचा पानाचा डबा घरी राहिला होता, तर कोणाची एखादी फाईल घरी विसरली होती. तशी सर्वांचीच घरे रेस्ट हाऊसच्या जवळपासच होती. पण जीप या खात्याचा अनिवार्य भाग, परंपरा होती.

डी. एफ्. ओ. पंतसाहेबांची जीप मात्र या गडवडीत कुठे दिसत नव्हती. स्टाफही नव्हता.

गप्पांचे दळण नेहमीप्रमाणे चालू होते. गप्पांना राजकारणापासून सुरुवात झाली होती. आंतरराष्ट्रीय, मग राष्ट्रीय. हा पक्ष तो पक्ष. हा लीडर तो लीडर. मग नेहमीचेच. मोठयांच्या छोटचा गोष्टी. आणखी मोठयांच्या आणखी छोटचा गोष्टी. 'सब स्साले चोर हैं।' वगैरे...!

गप्पांनी मग आणखी एक नेहमीचेच वळण घेतले. ऑफिसच्या गप्पा. राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय गप्पा केवळ चेंज म्हणून. आपले खाते हे खरे जग, रिॲलिटी, इराण–इराक युद्धापेक्षा सी. एफ्. वलीसाहेब आणि सी. सी. एफ्. हरचंदानी यांची कशी जुंपली यामध्ये सर्वांना रस फार. मग कोण–कोणाची कशी जुंपली, कोणाची वदली कुठे झाली, कोणाची वदली कशी बरोबर मोक्याच्या जागी झाली वा रद्द करवली गेली आदी विषय निघाले. मग आले वळणांवरचे सर्वात जास्त जिव्हाळचाचे वळण. होऊ घातलेल्या वढत्या.

वढतीवद्दल तसा प्रत्येक जणच वेफिकीर होता. आपण, 'इमानाने झटून काम करावं एवढंच जाणत होता. कारण या कलियुगात, इमानदारीचे' चीज होईल याचा कोणालाच भरवसा नव्हता. शिवाय आता कितीही झटून काम केलं तरी सरकारी जावयांचाच घोडा पुढे जाणार याची प्रत्येकाला खात्री होती, बोच होती, म्हणून जो तो झाडूनपाडून डी. एफ. ओ. मेश्रामसाहेबाला चोच मारीत होता. जखम न करता रक्तबंबाळ करीत होता. अर्थात नैतामसाहेबांना हे नवीन नव्हतं. अनुसूचित जमातीमधील नैतामसाहेबांनी 'जावई'-पणाचा उपभोग सर्वार्थाने घेतला होता. भरपूर घेतला होता. पंचपक्वान्नाचे ताट, पण भिकेमध्ये भिरकावल्यासारखे मिळावे तशी प्रत्येक नेमणूक, बढती स्वीकारली होती, सर्व चवी-ढवींची पारख होऊन पक्वान्नाचा स्वाद घ्यायला ते शिकले होते. पिढीजात भरपेट जेवलेल्यांची ही वखवख ते उमजू शकत होते, समजू मात्र शकत नव्हते.

पण ही पोटातील मळमळ फक्त मेश्राम साहेबांपुरतीच मर्यादित नव्हती. पांडेसाहेबांनी जवळजवळ उभी हयात वन-खात्याच्या सेवेमध्ये घालविली होती, खडतर उन्हाळे-पावसाळे अनुभवले होते. जीपचा पत्ताही नव्हता तेव्हा पायी नाहीतर सायकलीने रानोमाळ पालथे घातले होते. तरी अखेर सायकलची धाव डी. एफ. ओ. पदापर्यंतच जेमतेम पोहोचली होती. आणि अजून मिसरुडीचा कोंवही न फुटलेली ही कालची थेट रिक्रूट आज त्यांच्या मांडीला मांडी लावून वसले होते, जीपमधून मिरवीत होते. पांडेसाहेबांचा रोख अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर होता. जुने-जाणते वक्षीसाहेव त्याला सावध दुजोरा देत होते. अर्थात सर्वांनाच या सर्व गोष्टी नेहमीच्या होत्या, माहीत होत्या, पण काही दुःख, काही शल्य उगाळत वसल्याने जखम वरी होत नसली तरी मनाला जरा बरा वाटतं.

"यार, या साहेव लोकांना दुसऱ्यांच्या वेळेची काही पर्वा नाही. साले जेव्हा केव्हा येतात तेव्हा वटवाघळासारखं उलट टांगून रहावं लागतं. नॉन्सेन्स. मी वडा साहेव होईन तेव्हा हा सर्व वकवास बंद करेन." डी एफ. ओ. तलवार अगदी वैतागाने म्हणाला.

एवढचा वेळ शांतपणे पेपर वाचत वसलेल्या पंतसाहेबाने पेपरमधून मान काढून वाहेर खोळंब-लेल्या तलवारच्या स्टाफकडे एकवार वघितले. तलवार जरासा अवस्थ झाला.

पंतचा पेपर वाचून झाला असावा. वा तो या संधीचीच वाट पहात असावा. त्याला नेहमीच अशा या वांझ वाट पहाण्याचा कंटाळा यायचा. एक आळस देऊन तो म्हणाला, "मग कशाला वेळ फालतू दवडायचा ? मेश्रामसाहेव, सी. एफ. साहेब आले की प्लीज लगेच निरोप पाठवा. मी ऑफीस-मधेच आहे." असं वोलून ते वाहेरही पडले.

या सगळ्या घोळक्यातला आपला खरा-खुरा मित्र चालल्याचे पाहून सटकण्याचा विचार मेश्रामच्याही मनात आला होता. मेश्रामच कशाला प्रत्येकाच्याच मनात तो विचार होता. पण नेमका तेवढ्यात साहेब कडमडला तर कालपासूनची सर्व तपश्चर्या वाया जाईल अशी प्रत्येकाला भीती वाटत होती.

सी. एफ्. साहेबांची धूळभरली अॅम्बॅसेडर रेस्ट हाऊसच्या पोर्चमध्ये शिरली तेव्हा प्रत्येकजण आळसाची–कंटाळ्याची राख झटकून धडपडत स्वागताला सामोरा झाला. तेवढ्यात डी. एफ. ओ. तलवारने चपळाई करून गाडीचा दरवाजा उघडला आणि साहेबांना 'गुड मॉर्निंग' करण्याचा पहिला मान पटकावलाच. ऑफिसच्या कामामध्ये जाऊ द्या, पण या अशा कामांमध्ये तलवारसाहेबांचा हात धरणारा कुरूस पालला काय संपूर्ण खात्यात कोणी नव्हता. साहेबांच्या आवडीनिवडी, विशेषतः खाण्यातील आणि पिण्यातील, याची बिनचूक माहिती तलवारकडे होती. नुसते ड्रिंक नाही तर ड्रिंकमधील कोणता ब्रँड साहेबांना कोणत्या वेळी लागतो याचे बारकावे माहीत होते. त्याप्रमाणे चोख तामिली होत असे. मागे सी. सी. एफ. साहेबांच्या दौऱ्याच्या वेळी विचाऱ्या मेश्रामने मोठ्या इतमामानं स्कॉच पुरवली, पण खरा भाव खाऊन गेला अस्सल महुवा पुरवणारा तलवार. वडचा साहेबांना शहरामध्ये स्कॉच कितीही प्यारी असली तरी रानामध्ये रानाची अस्सल महुवाच प्यारी असते ही अंदरकी वात जाणण्याची तकलीफ फक्त तलवारनेच घेतली होती. शिवाय वडचा साहेबांच्या जवानीतील काही इमोशनल अॅटॅचमेंट महुवाशी निगडीत आहेत याचे गुपित फक्त तलवारलाच माहीत होते.

'गुड मॉर्निंग एव्हरीवडी', 'गुड मॉर्निंग सर'ची फैर सहजपणे अंगावर घेत गाडीतून बाहेर पडतापडता रायसाहेब सहजपणे म्हणाले, "आय अॅम सॉरी. तुम्हाला फार वेळ वाट पहायला लावली."

रायसाहेब गाडीबाहेर पडले आणि त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्वानं प्रत्येक जण नव्यानं भारावला. दबला. हे रायसाहेबांचं पहिलं दर्शन नव्हतं. पण उंचनींच, भरदार शरीराचे, ऐटदार मिशा राखलेले रायसाहेब हे व्यक्तिमत्वच असं होतं की दरवेळीच हे असं घडायचं. रायसाहेब कामाला तसेच वागायलाही वाघच होते. कामाचा वा एखाद्याचा फडशा पाडायचा तर चोख काम करीत. पण उगीच भूल नसताना चूष म्हणून कोणाशी झाप घेत नसत. पण कधीमधी वरिष्ठां-समोर ते उगाचच सर्कशीतल्या वाघासारखे वाटत! अर्थात त्यांचाही त्याला नाईलाज होता.

"काल संध्याकाळीच येणार होतो, पण आमच्या वडचा साहेबांना आमगावचे आदिवासी बघायचे होते. म्हणून तिथेच मुक्काम केला. रात्री छानपैकी आदिवासी नृत्यवित्य बघितलं." सलमा-कडे मिस्किलपणे बघत रायसाहेब म्हणाले.

"अरे हो, ओळख करून द्यायचीच राहिली. हे आमचे वरिष्ठ साहेब मिस् सलमा चौधरी. धी रिनाऊंड अँथॉऽऽ काय ते तुमचं."

"अँथ्रॉपॉलॉजी–" सलमानं वाक्य पूर्ण केलं.

"हां तेच ते अँथ्रॉपॉलॉजी उर्फ मानव–वंशशास्त्र, आणि या जगप्रसिद्ध मानववंशविच्छेद शास्त्रज्ञ मिस् सलमा चौधरी–" आपल्या विनोदा-वर गडगडत हसत रायसाहेब म्हणाले.

कोणाला नक्की काय ते नीट समजलं नव्हतं. पण तरीही सगळे हसले. मिस् नक्कीच समंजस होत्या.

–आणि हे डी. एफ्. ओ. तलवारसाहेब, हे मिश्रासाहेब, जोशीसाहेब, हे मिस्टर मेश्राम– रायसाहेबांनी ओळखीची कतार पूर्ण करत आणली.

ऐसपैस बगीच्यातील गुलाबाच्या ताटव्यातील एका मोक्याच्या मोकळ्या जागी वेताच्या कोच–खुर्च्या नेटकेपणा मांडल्या होत्या. रायसाहेब मधल्या प्रशस्त कोचावर विराजमान झाले. बाजूच्या कोचावर सलमा बसली. मग बाकी साहेब लोक उरलेल्या खुर्च्यांवर खूपशा अदबीनं आणि बऱ्याचशा अवघडलेपणानं बसले.

अवघडलेपणा फक्त कॉन्झरवेटर राय-साहेबांच्या उपस्थितीचाच नव्हता तर रायसाहेबांनी आणलेल्या पाहुण्यापासूनच जरा अवघडलेपणाला सुरुवात झाली होती. साहेबांबरोबर कधीकधी बाईसाहेब येत, त्यांची देखणी मुलगीही येत असे. क्वचित देशी–परदेशी पाहुणेही असत. पण हे

गुलवक्षाचे फूल काहीतरी नवीनच दिसत होते. त्यातून वरिष्ठ अधिकारी आणि अँथ्रॉपॉलॉजी की काय ती भानगड ! तलवारसाहेब तर कमालीचे अवघडले होते.

पण रायसाहेबांनी जास्त वेळ सस्पेन्स ठेवला नाही. तेही कधी काळी, कधी काळी कशाला अगदी आत्ताही जवान होते. रानातल्या वैराण जीवनात कधी काळी गवसणारी ही गुलवक्षाची कळी पाहून समोरच्यांचा उडणारा गोंधळ ते समजू शकत होते.

"मिस् सलमा चौधरी मानवशास्त्राच्या–" परत एकदा कोटी करण्याचा अनिवार मोह रायसाहेबांना झाला होता. पण सलमाच्या चेहऱ्यावरची नाराजीची छटा पाहून त्यांनी तो आवरला– "अभ्यासक आहेत." आदिवासी रीतिरिवाजांचा; संस्कृतींचा त्यांचा अभ्यास आहे. आपण आणि आदिवासींमध्ये दुवा जोडण्याचा प्रयत्न त्या करणार आहेत. आपण आदिवासींसाठी इतके प्रयत्न करतो, पण हे इडियट आदिवासी त्याला रिस्पॉन्स का देत नाहीत ते समजून घेण्याचा त्या प्रयत्न करणार आहेत. विशेषत: परवाच्या पारधसंबंधी–"

"समजून काय घ्यायचं साहेब, दीज ब्लडी ट्रायबल्स शुड वी टॉट लेसन्. त्याशिवाय ते ऐकणार नाहीत." तलवारने मध्येच तोंड खुपसलं.

सर्वांनी चमकून मेश्रामकडे पाहिलं. जंगली कुत्र्यांनी घेरलेल्या हरणासारखा तो सर्वांचीच नजर टाळत होता. सर्वांची आणि स्वत:ची पण. अर्थात तलवारला त्याची भीती नव्हती. जंगली कुत्रा हरणाच्या रागा–लोभाची पर्वा करीत नाही.

"व्हॉटेव्हर इट मे बी. लेट हर से सो–" रायसाहेबांनी चर्चा आवरती घेतली. म्हणजे त्यांचाही धडा शिकवण्याला विरोध नव्हता. निदान अलिप्त अभ्यासकाने तरी ! एवढीच त्यांची माफक इच्छा होती.

"साहेब आपला ब्रेकफास्ट तयार आहे." तलवार अदबीने म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर, आवाजात आता हरणाच्या पाडसाचे मार्दव होते.

"ओ. नो. आम्ही आमगावहून निघतानाच ब्रेकफास्ट केला." रायसाहेब.

"पण साहेब. आपल्या आवडीचे खास उडदाचे पकोडे बनवले आहेत–" आणि साहेबाच्या उत्तराची वाट न बघता तलवारने ऑर्डर्लीला गरमागरम पकोडे आणायला फर्मावलेदेखील.

"ओ तलवार यू आर ग्रेट. यू आर सिंपली ग्रेट." रायसाहेब अगदी खुषीत येऊन म्हणाले. ते अगदी रसिक खवय्ये होते.

जोशी, मेश्राम, पांडे. प्रत्येक साहेबाला त्याक्षणी तलवारचा हेवा वाटला, मत्सर वाटला आणि अशा प्रत्येक वेळी तो वाटत आला होता. पण त्या पलीकडे त्यांची काही प्रगती झाली नव्हती.

गरमागरम भजी संपली. चहापान झाले आणि वातावरणाचा पीळ जरा सैल झाला. रायसाहेबांनी सिगरेटचे पाकीट काढले. आपणहून सर्वांना सिगरेट ऑफर केली. एरव्ही वरिष्ठांसमोर सिगरेट न ओढण्याचा संकेत मोडून पांडे सोडून सर्वांनी एकेक सिगरेट घेतली. बराच वेळ हातात घोळवली. हळूच केव्हातरी शिलगावली. साहेबाची नजर टाळत अधूनमधून ओढली आणि अर्धीमुर्धी संपवून टाकली.

कॉन्झर्व्हेटर रायसाहेबांनी सर्वांची आस्थेने विचारपूस केली. घरच्या मंडळींची, अडीअडचणीची आवर्जून माहिती घेतली. बक्षी साहेबांची मुलं आता कॉलेजमध्ये गेली होती. त्यांना मधुपूरला लौकरात लौकर बदली करून पाहिजे होती. रायसाहेबांनी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तलवारला नवीन आलेली जीप पाहिजे होती. त्यालाही विचार करण्याचे आश्वासन दिले आणि दुपारी सर्वांना फायली घेऊन रेस्ट हाऊसवर हजर राहण्याविषयी फर्मावले. एवढ्यात त्यांना आठवण झाली की डी. एफ. ओ. संजय पंत कुठे दिसत नाही.

"मेश्राम, पंतसाहेब कुठे गायब झाले आहेत ?" मेश्रामने काही बोलायच्या आतच तलवारने माहिती पुरविली, "गायब कशाला इथेच तर आहेत."

"मग"

मग अगदी अनिच्छेने बोलावे तशा सुरात तलवार म्हणाला, "सर हा असा फालतू वेळ दवडण्यात पंतसाहेबांचा विश्वास नाही."

"व्हॉट डझ इट मीन–"

" सर हा अशी वाट पाहण्यात वेळ फालतू दवडण्यावर पंतसाहेबांचा विश्वास नाही," तलवारनें पंतची हुबेहूब नक्कल करीत उत्तर दिले.

" पंत, सी. एफ्. साहेब आले आहेत. तुम्ही आठवण काढत आहेत." मेश्राम फोनवरून घाई-घाईत म्हणाला. साहेब आल्याची खबर द्यायचे केव्हापासून त्यांच्या मनात होते. पण सर्वांच्या नजरेसमोरून आतल्या खोलीत जाऊन फोन करण्याचे धैर्य काही मेश्रामसाहेबांना होत नव्हते. नजरांचे बोचकारे सहन करावे लागले असते.

" किती वेळ झाला ?"–पंत

" अर्धा–पाऊण तास झाला " मेश्राम चाचपडत म्हणाला.

"ठीक आहे. येतो मी–" पंतने रिसिव्हर खाली ठेवला.

आपण उशीरा कळवल्याबद्दल पंत नाराज होईल, काहीतरी बोलेल. किमान नाराजी त्याच्या आवाजातून व्यक्त होईल अशी मेश्रामची अटकळ होती, पण ती दूर झाली. पंतचा आवाज नेहमी-सारखाच शांत होता.

संजय पंतने हातातील पुस्तक बाजूला ठेवले, अगदी अनिच्छेनेच. कारण असा वेळ असला, मूड असला की तो व्हेरियर एल्विनचे आदिवासी जीवनावरचे एखादे पुस्तक वाचत वसे. आदिवासी जीवनाची माहिती घेण्यासाठी आणि त्याहीपेक्षा व्हेरियरच्याच जीवनाबद्दल एक सुप्त ओढ मनात होती म्हणून अर्थात व्हेरियरचा सर्वच रोमँटिसिझम त्याला मान्य होता, अथवा त्याचा भावुकपणा भावत होता अशातला भाग नव्हता. पण माणसाने कुठे तरी रोमँटिक असण्यावर संजयचा विश्वास होता. श्रद्धा होती. गंमत अशी की पंतसाहेबाच्या काट-सावरीसारख्या काटेरी व्यक्तिमत्वात अशी टपोरी लाल फुलं लपली असतील याचा गंध कुणालाच नव्हता, स्वत: संजयलाही पुरेसा नसावा. पण एल्विनसारखा एखादा ऋतु–वसंत–सामोरा आला की ती फुलं महकून उठायची ! सर्वांगाने उमला-यची. पंतने पुस्तकात खुणेसाठी मोरपीस ठेवले–ही पण पंतची खासियत होती. आपल्या अशा आव-डीच्या पुस्तकासाठी पंत हमखास खुणेचे मोरपीस ठेवायचा आणि इतर पुस्तकांसाठी सिगरेट, कागद. फायली काखोटीला मारून पंतने रेस्ट–हाऊसचा रस्ता धरला.

" गुड मॉर्निंग सर " वेताच्या खुर्चीवर कसली तरी फाईल चाळत बसलेल्या रायसाहेबांना पंतने विश् केले.

" गुड मॉर्निंग मिस्टर पंत–आय मीन मिस्टर पंतसाहेब." रायसाहेबांनी सलमाकडे बघत जरा मिस्किलपणे म्हटले.

" केव्हा आलात आपण सर ?" पंतने अद-बीने विचारले.

"झाला असेल थोडा वेळ. कदाचित तासभरही."

" आय अॅम सॉरी सर, मला यायला उशीर झाला."

" काही हरकत नाही. वाट पाहण्यात वेळ फालतू दवडण्यात आपला विश्वास नाही असं समजलं आम्हाला."

आता रायसाहेब तलवारची नक्कल करीत म्हणाले, " दॅटस राइट सर–उगाचच सर्वांचा वेळ जातो." पंत सरळपणे म्हणाला. बोलता बोलता त्याची नजर रायसाहेबांच्या तीक्ष्ण नजरेला भिडली तीक्ष्ण नजर. मग त्याला काहीतरी खटकलं. झाली चूक लक्षात आली. जरा ओशाळून तो म्हणाला,

"आय अॅम सॉरी सर. आय डिड नॉट मिन दॅट–"

" ओ. नो. बॉस नेव्हर माइंड. यू डोंट हॅव टू बी सॉरी फॉर दॅट मी जवान होतो. नुकताच सर्व्हिसला लागलो होतो. तेव्हा मलाही असंच वाटायचं, पण माणूस वयाबरोबर खूप काही शिकत जातो. रादर काय विसरायचं ते शिकत जातो."

रायसाहेब उद्वेगाने म्हणाले अणि मग खिन्न-पणे स्वत:शीच हसले. नोकरीत शिरण्यापूर्वी किंवहुना एकूणच जीवनाच्या लढ्यात समजून उतरण्यापूर्वी त्यांच्या जीवनाबद्दल किती साध्या-साध्या रम्य कल्पना होत्या, राग होते, लोभ होते. हेवे–दावे–होते. पण ते तसे सरळ होते. युद्धे होती पण धर्मयुद्ध होती. सरणाऱ्या प्रत्येक रात्री-बरोबर उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाबरोबर जीवनातील एकेक सत्य प्रकाशत गेलं, गवसत गेलं. आई–बाप–भाऊ–बहीण–बायको–वरिष्ठ–कनिष्ठ, ही सर्व नाती असतात. खरी–खुरी नाती असतात

पण त्याही पलीकडे काहीतरी असतं, प्रत्येकजण सावज असतो व प्रत्येकजण शिकारीही. प्रत्येकजण क्षणाची, संधीची वाट पहात असतो. प्रत्येकाचे दात प्रत्येकाची नखे तीक्ष्ण असतात, धारदार असतात, मात्र काहींचे व्रण उमटतात. काहींचे उमटत नाहीत व्यक्त–अव्यक्त प्रेमाइतक्याच संबंधाइतक्याच या जखमा. हे व्रण खरेखुरे असतात.

रायसाहेब पंतला गेली दोन–तीन वर्षे ओळखत होते. एक हुशार, तडफदार अधिकारी म्हणून. राष्ट्रीय स्पर्धात्मक परीक्षेत सर्व पर्याय उपलब्ध असताना वनखात्याची नोकरी आपणहून स्वीकारणारा एक अवलिया म्हणून.अवलिया आणि वेवकूफ. दोन्हीही. त्यामुळेच रायसाहेबांना त्याचे नेहमी कौतुक वाटत असे. शिवाय आपले प्रत्येक विधान, उत्तर चॅलेंज करण्याची कुवत आणि जरब असलेला विद्यार्थी हाडाच्या शिक्षकाला आवडतो. तशीच जरब बाळगणारा, हाताखालचा अधिकारीही जातीच्या वरिष्ठाला आवडतो. आपले एकेकाळचे प्रतिविंव आपले एकेकाळचे स्वप्न ते त्यामध्ये वघत असतात. एकेकाळचे स्वप्न–प्रतिविंव हे माहीत असूनही तलवारही आवडतात. सुखावतात. पण पंत हा पंतच असतो.

"प्लीज सिट डाऊन मि. पंत." भानावर-येऊन रायसाहेब म्हणाले.

"थँक्यू सर." पंत कोपऱ्यातील एका कोचावर वसला.

"तुमच्यासाठी मी एक महत्त्वाची केस आणली आहे." रायसाहेबांनी सलमाकडे हळूच बघितले.

"यस सर, मागच्या वेळी आपण सी–३ डिपार्टमेंटमधल्या सागाच्या रोपांबद्दल वोलला होता–"

"नॉट एक्झॅक्टली–" रायसाहेबांचे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच हातातील फाईल पुढे करत पंत म्हणाला,

"साहेब या वेळी आम्ही रोपांच्या मॉर-टॅलिटीचा रेट खूपच खाली आणला आहे. शिवाय बदली रोपांचे कामही पूर्ण करीत आणले आहे."

"मि. पंत, मी दुसऱ्या एका महत्त्वाच्या केससंबंधी–" गालातल्या गालात हसणाऱ्या सलमाकडे जरा अस्वथेपणे बघत साहेब म्हणाले.

"यस सर, आपण गेल्या वेळेला लाकडाच्या नव्या पद्धतीबद्दल सांगितले होते. आम्ही त्याप्रमाणे सर्व कारवाई पूर्ण करत आणली आहे." हातातील दुसरी फाईल सरसावत पंत म्हणाला.

"मी एका वेगळ्याच महत्त्वाच्या केस-बद्दल" रायसाहेबांनी वाक्य मध्येच तोडले. या भल्या माणसाशी असं आडून वोलणं व्यर्थ आहे त्यांनी मनोमन ताडलं आणि सरळ विषयाला हात घातला.

"या मिस् सलमा चौधरी मानवशास्त्रज्ञ आहेत, हे डी. एफ. ओ. पंतसाहेब कोसलनार यांच्या ज्युरिस्डिक्शनमध्ये येतं. मिस् चौधरी कोसलनारला काही दिवस राहणार आहेत. आता तुम्हाला पुढचा प्रोग्राम ठरवायचा आहे." राय साहेबांनी एका दमात वाक्य पूर्ण केलं.

"ओ ऽ हॅलो." काहीसं गोंधळून पंत म्हणाला. आतापर्यंत त्याला सलमाचे अस्तित्व जाणवलं नव्हतं, अशातला भाग नव्हता. साहेबां-वरोवर कोणीतरी पाहुणा आहे, पाहुणी आहे, चांगली आहे एवढं त्याला नक्कीच जाणवलं होतं. आजुवाजूच्या टेवल–खुर्चीपेक्षा तेच व्यक्तित्व वेगळं होतं, आहे. हेही जाणवत होतं. पण साहे-बांना सांगायच्या महत्त्वाच्या केसेसमध्ये तो इतका गुंतला होता की या वेगळ्या अस्तित्वाची दखल घेण्याचे भानच त्याला राहिलं नव्हतं. कामामध्ये नेहमीच हे असं व्हायचं.

"मिस् चौधरी कोसलनारला काही दिवस–रादर काही महिने राहून आदिवासी जीवनाचा अनुभव घेणार आहेत, अँड शी इज् गोईंग टू टेल अस वॉट दिस इडियट आदिवासीज् रिअली वॉंट–"

रायसाहेबांच्या वोलण्यात परत एकदा उद्वेग उफाळून आला. साहजिकच होतं ते. या भुक्या–कंगाल लोकांना रोजगार पुरवण्यासाठी, सुधारण्यासाठी सरकार इतक्या योजना आखत होतं. त्पण यांचा काय प्रतिसाद मिळेल याचा काहीच भरवसा नव्हता. आजवरचा तसा अनुभव होता. स्वतःच स्वतःचा स्वार्थ ओळखत नाहीत. तिथे सरकार तरी कुठवर पुरे पडणार? राय-साहेबांच्या बोलण्यात आता इडियट आदिवासींबद्दल

उद्वेग होता पण राग नव्हता.

"सर, आपण काही फिकीर करू नका. या गरीब बिचाऱ्या लोकांना विश्वासात घेतलं तर ते समजतात. वुई मस्ट टेल देम कंटिन्युअसली वॉट इज गुड फॉर देम–" पंत अगदी विश्वासाने म्हणाला.

"माय बॉय, हे काळचाचे पांढरे होणाऱ्या वर्षातील किमान निम्मी वर्ष या गरीब बिचाऱ्या लोकांमध्येच गेली–"

"या लोकांमध्ये की निव्वळ जंगलामध्ये–" रायसाहेबांचे वाक्य अर्धवट तोडत पंत मध्येच म्हणाला,

"तेच ते. दोन्ही एकच. पण या बेवकूफ लोकांचे काही समजतच नाही. साले इकडे उपाशी मरतील पण आपली जंगली रोजी सोडून सशामागे नाही पाखरामागे दिवसचे दिवस वाया घालवतील. शिअर वेस्ट ऑफ टाइम अँड एनर्जी."

पंत काहीतरी बोलणार होता, पण आता त्याने वेळीच ओळखलं की ही वेळ आर्ग्युमेंटची नाही. रायसाहेबांचे स्वगत चालू असावे. थोडं सावरून रायसाहेब म्हणाले,

"एनी वे. तुम्ही आणि आमच्या या मानवशास्त्रज्ञ काय तो अभ्यास करा. नाहीतर त्यांची समजूत विमजूत काढा. पण आय डोंट वॉंट एनी हेडेक इन धिस एरिया. अगोदरच काही शहाण्या लोकांनी पारध करून रान उठवले आहे."

"कोण ते पत्रकार का?"–पंत.

"नाही. का?"

"काही नाही साहेब. मागे साप चावून आश्रमशाळेतील तीन मुलं एकदम मेली होती. त्याची चौकशी करायला नॅशनल प्रेसचे पत्रकार आले होते. त्यांना चौकशीपेक्षा आदिवासी नाचात जास्त रस होता, आणि महुवामध्ये पण. सारखे मागे लागले होते. म्हटलं वाटलीतून महुवाऐवजी नाग घालून देतो. ढोसा पोटभर, तर माझ्यावर जाम उखडले. हू केअर्स–"

पंतचा राग पाहून सलमाला मजा वाटली. रायसाहेबांनाही वाटली. पण ते काही उघडपणे बोलले नाहीत. पत्रकार म्हणजे नागाचीच अवलाद. केव्हा उलटेल भरवसा नाही.

"एनी वे, तुम्हाला केव्हा निघायचं ते तुमचं तुम्ही आता ठरवा. केव्हा निघणार?"–रायसाहेब.

"लौकर. शक्य तो लवकर. अगदी आत्तासुद्धा." सलमा अगदी अधीरपणे म्हणाली. केव्हा एकदा कोसलनार बघते असं तिला झालं होतं.

"आय हॅव नो ऑब्जेक्शन." रायसाहेब म्हणाले.

"पण सर, आपल्या महत्त्वाच्या केसेस." पंत,

"माय डिअर फ्रेंड, धिस इज दी इंम्पॉर्टंट केस अँड यू हॅव टू डिल विथ इट, विथ टॉप प्रायॉरिटी." प्रत्येक शब्दावर जोर देत रायसाहेब म्हणाले आणि निरोप घेण्यासाठी उभे राहिले.

पंत काहीशा नाराजीनेच ऑफिसात परतला. साहेबांशी चर्चा करण्यासाठी त्याने प्रत्येक केस अभ्यासून इतके पॉइंट्स काढले होते. पण आता ही नस्तीच भानगड उपटली. म्हणजे पंतला माणसांचे, पाहुण्यांचे अगदी मुलींचेही वावडे नव्हते. कॉलेजात असताना त्याला मित्र-मैत्रिणीही होत्या पण त्यांच्या एकेक वेळा असतात, असं कामाच्या वा अभ्यासाच्या वेळी कोणी मध्ये तडमडला की त्याला मनस्वी संताप यायचा. आता संताप यायला आणखी एक कारण होतं. ही कोण शहरातील उपटसुंभ मानवशास्त्रज्ञ त्यांना, आदिवासी जीवन, मन समजावून देणार होती. या आदिवासींना रोजी मी पुरवितो, रेशनपाणी मी देतो, सणासुदीला बक्षिसी मी देतो. त्यांचा माझ्यावर विश्वास आहे आणि केवळ म्यूझियममध्ये आदिवासी पाहिलेली ही मानवशास्त्रज्ञ की कोण मला आदिवासी जीवन समजावून सांगणार, माय् फुट्!

("पारध" या आगामी कादंबरीतून साभार...)

□□

अनुक्रमणिका

मनोहर तल्हार

'कॅन्सल्'



१

सकाळी सकाळी घरभर धूर दाटला. चुलीतले लाकूड ओले होते. लाकडाच्या वरखाली गोवऱ्या लावून फुंकणीने फुंकून फुंकून शेवंतीचा जीव कासावीस झाला. धुरामुळे डोळ्यांतून पाणी वाहू लागले. शंकरलाही घरात बसणे मुश्कील झाले.

शेवटी जाळ झाला. चुलीवरला चहा उकळला. शेवंतीने तो गाळला आणि दोन कपात ओतला तसा दरवाज्यातून आवाज आला–

"भाभी, माह्यासाठीय् भरजा एक कप."

शेवंतीने वघितले. रफीक्ला वघून तिच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. शंकर आनंदून म्हणाला–

"अच्छे वक्तपे आया तू रफीक् !"

रफीक् शंकरजवळ बसला. त्याला दोन्ही हाताने मिठी मारून तो म्हणाला–

"शंकर, मेरेकू माफ करना भैय्या, तीन हप्तेसे मैं आ नहीं सका. शंकर, ये होटल का धंदाय् अैसा चिकट है की जरा भी फुरसद नहीं मिलती देख ! रोजाना सोचता था की आज शंकरके घर जाना, मगर आनाही नहीं हुआ. लेकीन रोज अैसा मालूम पडता था की तू होटलपे आयेगा, रिक्षा करके और इसलिये मैं वारवार रस्तेपे देखता था !"

"कल निकला था मैं घुमने को वाहर ! अौर जयस्तंभ तक आया भी था. फिर मेरेकू ईब्राहीमभाई मिला. उसने मेरेकू रिक्षा में विठा के भोत घुमाया." शंकर हसत हसत सांगू लागला.

"तो फिर मेरे होटलपे क्यों नहीं आया तू ? कल रात को ईब्राहीमभाई होटल में चाय पिनेकू आया था उसने बताया की तेरेकू भोत देर तक्के घुमाया करके !"

"और क्या वताया ?" शंकरने साशंक होऊन विचारले.

"और तो कुछ नहीं वताया !"

शंकरने उसासा टाकला. रफीक्ने पुन्हा त्याला विचारले–

"कल क्यों नहीं आया ? मेरेकू कितनी खुषी होती थी शंकर ?"

"मगर मैं नहीं आ सका रफीक् ! निकला था तेरे तरफही."

"फिर ?"

शंकरने आपल्या पायांकडे बघितले. मग हसून तो म्हणाला–

"घर से जयस्तंभ तक पैर घसते आया, अचानक पैरोंपे नजर गयी, देखा तो ओ घुटने तक घिस चुके थे !"

शंकरच्या त्या विनोदाने रफीक् कासावीस झाला. बलदंड शरीराच्या शंकरचे ते रूप जिवघेण्या वेदना देणारे होते. गफ्फारसारख्या पहेलवानाचा माज उतरविणारा शंकर, गणपती-विसर्जनाच्या मिरवणुकीत बेभानपणे नाचणारा शंकर, हा असा अपंग झालेला, ट्रक अपघातात गुडघ्यापर्यंत दोन्ही पाय गमावून बसलेला. शंकर पुन्हा हसला. म्हणाला–

"मैंने सोचा की और पैर घिसते घिसते तेरे होटल तक गये की बाकी है उतने भी पैर घिस जायेंगे. इसलिये मैंने मेरा विचार बदल दिया और मैं सोचही रहा था की ईब्राहीमभाई की रिक्षा मेरे पिछे तैयार."

शेवंतीने दोघांनाही चहा दिला. शंकरने चहा संपवून पेला खाली ठेवला. रफीक्कडे बघितले. रफीक्चा चेहरा उतरला होता. तो पडलेल्या आवाजात म्हणाला–

"शंकर, तू रिक्षा करके मेरे होटल तक क्यों नहीं आता ? पैसे वहाँ भी दे सकते अपन् ।"

"पैसों की बात नहीं रफीक् ?"

"फिर ? फिर क्या बात है ? क्यों नहीं आता ?"

"सच्ची बतावू ? मैं खुदकी रिक्षा चलाता था ना, इसलिये किसी के रिक्षा में बैठ के आना मुझे पसंद नहीं आता ! और दुसरी बात ये है की रिक्षा में बैठ के आये तो मेरेकू अपनी सारी बाते याद आती है ! तू और मैं रिक्षा चलाते थे, घुमते थे, सिनेमा देखते थे, होटल में रसगुल्ले–पापडा खाते थे–चाय, सिग्रेट पिते थे, एक दुसरेकू कुछ पुछते थे, कुछ बोलते थे ! तू तेरे दुखकी बाते बोलता था और मैं मेरे दुखकी ! और फिर अपन् भोत खूप होते थे, एक–दुसरोंकी मजाक करते थे, झगडते थे और फिर भी एक भी दिन अैसा नहीं जाता था की तेरी मेरी मुलाकात नहीं हुयी !" आणि शंकरने एक दीर्घ उसासा टाकून म्हटले–

"और अब, महिना महिना अपना मिलना नहीं होता. होता तो सिर्फ मेरेही दुखकी बाते होती. कबतक अब ये रोना रोना ? इसी लिये दिल को दुख होता है और इसी लियेही रिक्षा में बैठ के कहीं घुमने का दिलही नहीं होता रफीक् –"

शंकर बोलता बोलता भारावून गेला होता. रफीक् काही बोलला नाही. त्याने फक्त शंकरला घट्ट मिठी मारली.

"जरा धीरे रफीक् जरा धीरे ! मैं ठैरा बिमार आदमी और तू अब पहेले जैसा दुबला पतला रफीक् नही रहा...अच्छा तगडा जवान बन गया. मेरा तो दम घूंटे जा रहा भाई !"

शंकरभोवतीची रफीक्ची मिठी ढिली पडली आणि त्याला एकदम दोघांच्या प्रकृतीतला फरक जाणवला. त्याचे डोळे भरून आले. तो भरल्या आवाजात म्हणाला–

"सच्ची बात है शंकर, सच्ची बात है ! मैं भोत दुबलापतला था तब मुझे तेरी बाहोमें तू समेट लेता था तब मेरा भी दम घूटा जाता था अब मैं फूल गया और तू तेरी ये बिमारी–तू कितना दुबला पतला हो गया है शंकर ? तीन हप्ते पैले मैं आया था, उसके बाद आज–अभी तू भोतही दुबला मालूम हो रहा है !" मग तो अगदी कळवळून म्हणाला–

"तू फिझूलकी कुछ बाते सोचता है शंकर ! ये सब बातोंपर सोचना छोड दे, समझा ? बिलकुल सोचनाही छोड दे, क्या ? और मैं–तेरे लिये रोजाना एक पाव दुध सवेरे और एक पाव दुध रातको भेजनेका इंतजाम करता हूं ! तू दुध पीते जा और जल्दी तंदुरुस्त हो जा ! मैंने तेरे लिये पानका ठेला बनानेकू डाला है, ओ ठेला मेरे होटलके बाजूमे रहेगा. तू चलायेगा ! और ओ रिक्षा बेच डाला...अब क्या काम है उसका ? नही ?"

"हां, अब रिक्षा का तेरे लिये–या मेरे लिये कुछ काम नहीं ! एक जमाना था की अपन दोनो खुदकी रिक्षा होना चाहिये इसलिये तरसते थे...कुदरत कैसी है ? तब पैर थे रिक्षा नहीं थी अब रिक्षा है तो पैर नही." शंकर हसऱ्या चेहऱ्याने होता पण त्याच्या बोलण्यातला पीळ रफीक्ला असह्य होत होता.

रफीक्‌ने शेवंतीकडे बघितले. तिने दुसऱ्यांदा चहाचे भांडे चुलीवकर ठेवले होते आणि ती चूल फुंकीत होती.

"भाभी, तुमी आणखीन् चहा करून रायल्या काय ?"

"हौ ! म्या चाहा कुठी घेतला ? तुमी घ्यान् कां जरासा ? टाकू काय एक कप पानी ?"

"टाका ! मले माह्या होटलांतल्या चाहापेक्षा तुमच्या हातचा चाहा दोन सांगून चार सिंगल प्याव् वाट्टे !"

"माझ्या हातचा कितीक् दिवस प्यान् वापा वापूजी तुमी ? माह्या वैनींले कवा आननार हाये तुमी ? काहून माह्या सासूचा म्हतारपनांत जीव घेता वाप्पूजी ?"

"लौकरच आनाचं हाये तुमच्या वैनीले भाभी !"

"मग लौकर लौकर द्या आपल्याले लाडू !"

"मी कादरचीच वाट पाहून रायलो !"

"कायच्यासाठी ?"

"तो लाडू घेऊन येऊन रायला !"

"तुमी तं बाप्या गंमतच करून रायले वाप्पूजी ?"

"गंमत नाई करत भाभी, खरंच !" रफीक्‌ने मनगटावरल्या घड्याळात बघितले. तो स्वत:शीच पुटपुटला, "अभी तक आया नहीं ?"

"कितने बजे रफीक् ?" शंकरने विचारले.

"साडेसात हो गये ना ?"

"क्यों, कही जाना है क्या ?"

"नही तो !"

शेवंतीने चहा गाळला, एक पेला पुन्हा रफीक्‌ला दिला आणि दुसऱ्या पेल्यात चहा ओतून ती पिऊ लागली. रफीक्‌ने आपल्या पेल्यातला अर्धा चहा बशीत ओतला आणि ते बशी शंकरला देत तो म्हणाला—

"ले जरासा।"

"नहीं, अब नहीं होना। ये गरममें जादा च्याय् पिये की पेटमें सब अंगार मालूम होती। तू पीले।"

रफीक्‌ने पुन्हा आग्रह धरला नाही. त्याने मुकाटयाने चहा संपविला तसा हॉटेलचा नोकर दारात उभा असलेला दिसला.

"आ अंदर।"

तो नोकर आत आला. त्याने हातातली थैली व मातीचे भांडे खाली ठेवले.

"कादर नहीं आया ?"

"ओ होटल संभाल रहा है। आप कब तक आवोंगे ?"

"मैं आधे एक घंटे में आता. तू जा अब।"

"हौ"

तो नोकर निघून गेला. थैली आणि मातीचे भांडे हाती घेऊन रफीक् म्हणाला—

"हे घ्या भाभी।"

शेवंती चुलीजवळून उठली. थैली घेऊन सामान काढू लागली. तिने विचारले—"हे काय आन्लं वाप्पूजी ?"

शंकरनेही उत्सुकतेने विचारले— "क्या लाया रफीक् ?"

"हे तं लुगडं हाये !" शेवंतीने लुगडयाची घडी उलगडली.

"हौ ! पसंत नाई काय ?" रफीक्‌ने विचारले तशी ती ते लुगडे निरखून बघू लागली. लुगडयाचे पोत व काठ पाहून ती म्हणाली—

"तशी गोठ नाई ! लुगडं तं चांगलं हाये, तुमच्या लग्नासाठी आनलं काय ?"

शंकर हसून म्हणाला— "त्यायच्यांत अशे लुगडे वापरत नस्तेत् !"

"मग कोनासाठी आन्लं ?" तिने विचारले.

"शंकरसाठी !"

आणि असे बोलून झाल्यावर मात्र आपण भलताच विनोद करण्याचा गुन्हा केला असे रफीक्‌ला वाटू लागले. त्याला स्वत:चीच चीड आली. काहीतरी बोलावे म्हणून तो म्हणाला—

"शंकर, ये शरट पेहेनके देख भला ?"

शंकर हसूनच म्हणाला— "तेरे भाभीको पेहेननेकू बोल ! ओ अच्छी दिखेंगी ये कमीज में !"

शेवंती लाजून चूर झाली. म्हणाली—

"काई तरीच काय बोलता ?"

"मजाक मत कर. पेहेन भला !" रफीक् म्हणाला.

"अरे भाई रफीक्, ये मजाक समझ रहा क्या तू ? दर असल् देखा जाय् तो मैं औरत

बना हूं और मेरी औरत मेरा मरद बनी है" आणि शंकर स्वत:शीच हसू लागला. हसत हसत तो पुढे म्हणाला—

"मैं दिनभर घरपे बैठता हूं औरतके माफिक और—और ये औरत—" आणि तो पुढे बोलू शकला नाही.

"और क्या ?" रफीक्ने विचारले,

"और कुछ नही !" शंकर चाचरतच म्हणाला.

"झूठा मत बोल शंकर, भाभी कामपे जाती है ना ?"

शंकर बोलला नाही. खाली मान घालून नुसता चूप राहिला. मग शेवंतीच उसने हसून म्हणाली—

"गेली म्हनून काय झालं ? बायका का कामावर जात नस्तेत् काय बाप्पूजी ? शिकलेल्या बायकाय् तं नौकरी करतेत्. मग माह्यासांगड्या अडान्यायले काम कराची काय लाज हाये ?"

तिच्या बोलण्यावर रफीक काहीच न बोलल्यामुळे तीच पुढे चेहऱ्यावर उसने हास्य फुलवून म्हणाली—

"जसी येळ आली तसं तं वागाच लागते !"

"भाभी, आजून मी जिंदा हाये ना ! मी मेल्यावर भाभी तू कामावर गेली तं काई दुख नाई" मग रफीक् खणखणीत आवाजात अगदी करारीपणे म्हणाला—

"भाभी, आज पासून तू कामावर नोको जात जाऊ, सांगून ठेवतो भाभी मी, हौ !" मग स्वत:वरच चिडल्यासारखा म्हणाला— "मी जिंदा असून नसून काई फायदाच नाई ?"

रफीक्ने खिशातून दहा दहाच्या पांच नोटा काढल्या व त्या शंकरला देत तो म्हणाला— "ये रखले खर्चेके लिये !"

शंकरने त्याला गंभीर सुरात विचारले—

"मगर ये कितने दिन तक ?"

"मेरे मरने तक !"

"या मेरे मरने तक ?"

"ऐसी बाते मत कर"

"तू कर सकता ?"

"तेरी तबियत अच्छी होने तक ! समझा ? बाद में तू पानका ठेला चला, क्या ? बाद में तू मांगेगा तोभी मैं नहीं दूंगा ! आया ख्याल में ?"

शंकर चूप बसला.

रफीक् विचार करू लागला. मग एकदम अवसान आल्यासारख्या म्हणाला— "शंकर, कल मेरे साथ चल् !"

"कहा ?"

"दवाखाने में ।"

"काहे कू ?"

दवाखान्याचे नाव ऐकल्याबरोबर शंकरचा चेहरा उतरला. मोठ्या विचित्र आवाजात त्याने विचारले आणि केविलवाणेपणे तो रफीक्कडे पाहू लागला. रफीक् शांतपणे म्हणाला—

"तेरी तब्येत बतानेकू । तेरा इलाज करनेकू ।"

शंकर त्याच्या या बोलण्याने हादरला. म्हणाला—

"अब क्या इलाज करना बाकी है ? दो पैर थे ओ टूट गये, अब ये जिन्दगी में जिने जैसा रहाही क्या रफीक् ? कुछ नहीं हुआ मेरे कू, मैं अच्छा हूं और पानका ठेलाभी चलाऊंगा ।"

"ओ सब करेंगे । कल मेरे साथ दवाखाने में चल् । मैं कल सवेरे नऊ बजे आऊंगा, समझा ? अब मैं जाता हूं । भाभी इसमें रसगुल्ले है । शंकर को देना, तुमभी खाना ।"

"तू भी खाना ।"

"नही. तू खाले । मेरा पेट जरा रातके खानेसे बराबर नहीं ।"

"मगर ये सब अभी कायकू लाया ? ये साडी, ये कपडे ?"

"मेरी शादी है ।" रफीक् न हसता म्हणाला.

"कब ?" शंकरने आश्चर्याने विचारले.

"अगले हप्ते में ।"

"मजाक मत कर ।"

"मजाक नहीं सच्ची बता रहा हूं ।

"कोनाशी हाये लग्न ? कुठची हाये पोरगी ?" शेवंतीने जिज्ञासेने विचारले.

"माहा काका हाये बंबईले । त्याची पोरगी. मांगल् दिवसा आमी दोघंय् बंबईले गेल्तो ना, त्याहीच्या इथंच उतरलो होतो भाभी ।"

"क्या ? ओ लडकीसे शादी पक्की हो गई

क्या रफीक् ?" शंकरने विचारले.

"हाँ।"

"और अभीतक बताया नहीं !"

"गये हप्ते में ही तय् हुआ। ओ चाचा आये थे।"

"बडा खूप किस्मतें है यार तू रफीक्। भोत अच्छी लडकी है ओ. और पढी लिखीभी है।" शंकरला त्याच्या ठरलेल्या लग्नाचा खूप आनंद झाला होता. क्षणभर तो सारेच विसरला ...स्वतःची तव्येत...स्वतःचे दुःख...स्वतःचा अपमान...

रफीक् काही बोलला नाही. थोडावेळ नुसती शांतता. ती थोडया वेळाची शांतताही रफीक्ला जिवघेण्या वेदना देण्याइतकी भयंकर वाटली. तो म्हणाला–

"शंकर, दुख इस बातका है की शादी में तू नहीं आ सकेगा, भाभी नहीं आ सकेगी।"

"मगर तू शादीके बाद यहा तो आयेगाही नई दुल्हन लेके। क्या हम तेरी घरवालीको तब नहीं देख सकेंगे ?"

"शादी में तू होना–भाभी होना जरूरी था शंकर।"

शंकर हसला म्हणाला–

"मैं ? मैं और ऐसा लंगडा आदमी ?"

"शंकर, ऐसा हरवक्त लंगडा–लंगडा कहकर मेरे दिलको ज्यादा दुखा मत।" रफीक् शंकरला रागावूनच म्हणाला, शंकर हसतच होता. रफीक् शांत होऊन शंकरला म्हणाला–

"हां एक, बतानेकू भूलही गया शंकर, अगले महिनेकी पंधरा तारीख लगी है केसकी ! पुलीसने कारवाई कर दी है।"

शंकर त्यावर काही बोलला नाही.

"क्यों ? चूप क्यों ?" रफीक्ने विचारले.

"अब ओ ड्रायव्हरको फासीभी हुई तो मेरे पैर थोडेही वापस आयेंगे ?"

"चार–पाच हजार रुपये मिलेंगे। तेरे आगे के जिंदगीके लिये।"

शंकर गालातच हसला. म्हणाला–

"ये मेरी लॉटरी। जब लगेंगी तब लगेंगी। गलती मेरी थी...न जाने उस दिन मुझे क्या हो गया था ? क्यों मेरे दिमाग पे पागलपन सवार हुआ था ? गलती मेरी थी...और मुझेही चार–पाच हजार मिलेंगे ? ये कैसा हो सकता ?"

"ओ सब कोरट में देखेंगे। अब मैं चलता हूं, कल बराबर नऊ बजे आऊंगा...कल दवाखाने में जायेंगे...और ये पैसे रखले। चलता मैं। और भाभी, तू कामपे जाना बंद कर दे आज से...क्या ? तेरेकू मेरी कसम है भाभी–" आणि रफीक् निघून गेला.

त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे शंकर–शेवंती बघू लागले. निश्चलपणे. शेवंतीला कामावर न जाण्याची शपथ घालून तो निघून गेला होता.

काल घडलेल्या प्रसंगाची चाहूल रफीक्ला लागली नव्हती तरी त्याचे बोलणे शंका निर्माण करणारे होते. काल घडलेल्या प्रसंगामुळे शेवंती भेदरली होती–शंकर हादरला होता. कधी नव्हे इतका तो असहाय झाला होता...अंतर्मुख झाला होता. एकेकाळचा बलदंड शंकर केरकचऱ्याइतका क्षुल्लक ठरला होता. त्याच्या प्रिय पत्नीवर–शेवंतीवर–ती भांडी घासायला जिथे गेली होती, त्या घरच्या माणसाने, घरी कुणी नसल्याची संधी साधून तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला होता. तो प्रयत्न शेवंतीने जीवाच्या आकांताने झुंज देऊन विफल ठरविला होता. त्याच्या तावडीतून ती निसटली होती सहीसलामत. घरी आल्यावर तिने झालेला सर्व प्रकार शंकरला सांगितला होता. आणि शंकर जखमी झालेल्या वाघासारखा तडफडला...तुटलेल्या पायामुळे आलेल्या अपंगत्वामुळे...अशक्तपणामुळे लाचार झालेला शंकर विव्हळला होता...यापुढे शेवंतीने कामावर न जाण्याची ताकीद देऊन तो कशाचीही पर्वा न करता–शेवंतीला काही एक न सांगता घराबाहेर पडला होता...अंगात कुठले तरी बळ येऊन तो एका अनामिक तिरीमिरीने अंधारातून, दोन्ही हाताच्या भारावर, धुडाचा भार पुढे फेकीत, निघून गेला होता.

रात्री परत आला तो आगीत होरपळलेल्या वासरासारखा. शेवंतीच्या वक्षावर डोके घासून तो कितीतरी वेळ विव्हळत राहिला...रडत राहिला. आयुष्यात अगदी पहिल्यांदा तो इतका लाचार झाला होता...केरकचऱ्या इतका क्षुल्लक ठरला होता.

२

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ-सव्वा नऊच्या दरम्यान रफीक् रिक्षा घेऊन आला तेव्हा शंकर श्री गजानन महाराजांचे नामस्मरण करीत बसला होता आणि शेवंती चुलीजवळ बसून स्वयंपाक करीत होती. रफीक्‌ला पाहून शेवंती म्हणाली–

"या बाप्पूजी. बसा, मी चाहा मांडतो !"

"चाहागिहाच्या भानगडीत नोका पडू तुमी भाभी ! रिक्षा बरोबर आनली हाये म्या."

"रिक्षा काय थांबनार नाई काय आमा-शिक् ? थांबाले लावा त्याले घडीभर, मी आत्ता चाहा मांडतो."

शेवंतीने लगबगीने वरणाचे भांडे इटोल्यावर ठेवले आणि तिने चहासाठी दुसऱ्या भांड्यात पाणी ओतले.

शंकरने गजानन महाराजांच्या फोटोला नमस्कार केला तो घुसत घुसत सतरंजीवर आला, काहीसा नाखुषीने व काहीसा हसल्यासारखा चेहरा करून तो रफीक्‌ला म्हणाला–

"दवाखाने में जाना जरूरी है क्या रफीक् ?"

"हौ !" रफीक् ठामपणे म्हणाला.

शंकर काहीच बोलला नाही. बराच वेळ.

"चलो बाबूजी. भोत देर हो गयी।" रिक्षावाला घरात डोकावून रफीक्‌ला म्हणाला. रफीक्‌ने चहासाठी म्हणून शेवंतीकडे बघितले. म्हटले–"हो गया ना भाभी ?"

"हो झालाच हाये. उकई फुटली. दुध टाकून गावून देतो."

"जरा ठैर भाई, लगे तो आधा सिंगल तूभी पीले। बैठ जरासा."

रिक्षावाला घरात येऊन दोन पायावर बसला. शेवंतीने चहा आणला. रफीक्‌ने आपल्या कपातला अर्धा चहा रिक्षावाल्याला दिला. शंकर म्हणाला–"इसमेंका जरासा तू लेले।"

"नहीं, मेरा अभी हो गया घर पे।"

"मेरा भी हो गया अभी। लेना जरासा, मेरेकू इतना नहीं होना।"

रफीक्‌ने शंकरच्या पेल्यातला थोडासा चहा घेतला. चहा संपविल्यावर रफीक् म्हणाला–

"चल् । चल् भला जल्दी।"

"हां।" शंकर थंडपणे म्हणाला.

"शरट कहा है तेरा ?"

"है यहा, मैं पेहेन लेता. तू तकलिफ मत ले!"

शंकर ढुंगणावर घुसत घुसत खाटेजवळ गेला. खाटेवर पडलेला शर्ट त्याने अंगात घातला. गुंड्या लावून तो एकटक श्री. गजानन महाराजांच्या फोटोकडे पाहू लागला. नमस्कार करून तोंडातल्या तोंडात काही तरी पुटपुटून त्याने प्रार्थना केली. मग तो रफीक्‌ला अतिशय आर्जवी सुरात म्हणाला–

"मेरा दिल बैठा जा रहा हैं ! दवाखानेमें क्यों कजीने जानेको दिलही नहीं हो रहा रफीक्!"

"क्यों ?"

"उसी दवाखानेमें मेरे दो पैर काटे थे ! और अब क्या ?"

"दवाखाना अच्छा और तंदुरुस्त होने के लिये होता है !"

"ओ मेरे लिये जहन्नूम है !"

"शंकर, ऐसा घबडानेसे काम नहीं होगा ! शंकरको किसी बातका पहेले डर नहीं लगता था, याद है ?"

शंकर गालातच हसला, म्हणाला–

"चल् ! शंकर मौतसे भी डरता नहीं, ये तेरेकू मालूम है ! चल्. अब सब तेरेही दिलसे होने दे !"

"मेरे अच्छे भाई !" रफीक्‌चा स्वर जड झाला होता.

"मी जाऊन येतो दवाखान्यात" शेवंतीला उद्देशून तो म्हणाला.

"जेऊन जाचं असतं बाप्पूजी ?"

"तिकडून आल्यावर जेऊन घेऊ ! आता जाऊं दे भाभी, काम तरी लौकर होईल !"

"जेवनाले पाठ देत नस्तेत् ! आन् तुमी घाईय् तं अशशी केली बाप्पूजी का लगे संगाती रिक्षाय् घेऊन आले !"

"भाभी, सकाई लवकर होते काम ! नाई तं बसा लागते दिवसभर तिथं. बरं तं भाभी चाल्‌तो आमी ! चल् भला शंकर–"

शंकर कसल्या तरी विचारचक्रात गुर-फटला होता.

"चल् ना ?" रफीक् पुन्हा म्हणाला.

"चल् !"

"ठैर, मैं उठाता !"

"नहीं रे, रिक्षा तक चल सकता मैं, घुसते घुसते. अभी तोभी मेरेकू उठाने की जरूरत नहीं ! बादमें पडेगी तो क्या मालूम ?"

रफीक् त्यावर काहीच बोलला नाही.

शंकर, दोन हाताच्या भारावर ढुंगण उचलून थोडा थोडा सरकू लागला. रिक्षाजवळ येताच रफीक्ने शंकरच्या काखेत हात घालून त्याला उचललं आणि रिक्षाच्या सीटवर बसविलं, त्याच्या बाजूला तो स्वत: बसला, शंकरने शेवंतीकडे बघितले. ती दारात, डोळ्याला पदर लावून उभी होती.

"चल् भाई रिक्षावाले !" रफीक् म्हणाला तशी रिक्षा सरकली.

"तेरा वजन कितना कम हो गया शंकर ? कितना हलका हो गया तू ?"

शंकरच्या तोंडून अस्फुटसा हुंकार उमटला. रिक्षा हॉस्पिटलजवळ येईपर्यंत कोणीच कोणाशी बोलले नाही.

हॉस्पिटलच्या आवारात रिक्षा थांबली. रफीक्ने शंकरला खाली उतरवून घेतले व रिक्षा-वाल्याला पैसे देऊन तो शंकरला म्हणाला—

"चल्, मेरे पीठपेसे मैं तेरेकू लि जाता हूं।"

"नही, मैं वैसाही चलता, कुछ ज्यादा दूर थोडी है ?"

"जिद मत कर शंकर ! तेरे में ताकद नहीं और तू ताकदके काम मत कर शंकर, मेरा कहेना मान—"

"कुछ नहीं होता !" शंकर दोन हाताच्या भारावर सरकू लागला. रफीक् त्याच्या सोबत सोबत चालू लागला. निमूटपणे.

प्राथमिक तपासणीसाठी रोग्यांची खूपच गर्दी जमली होती. त्यातले बरेच जण धडधाकट होते आणि मोजकेच अशक्त व आजारी वाटत होते. काही जण धाप लागल्यागत बसले होते तर काहीजण केविलवाणेपणे येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे बघत होते. आणि काही रोगी स्वत:चा रोग विसरून दुसऱ्याची कींव करीत होते.

"लाईनमें बैठ जा !" रफीक् शंकरला म्हणाला.

"हां !" शंकर केविलवाणा चेहरा करून रांगेत बसला. त्याच्या समोर असलेला रोगी ? त्याच्या तुटलेल्या पायाकडे व क्षिण प्रकृतीकडे पाहू लागला.

शंकरला तसे बसणे आवडले नाही. त्याला वाटले, काही तपासू वगैरे नये. रफीक्ला सांगावे आणि घरी निघून जावे, मग तिकड जिवाचे वाटेल ते झाले तरी हरकत नाही, परंतु रफीक्ला तसे बोलण्याची त्याला हिंमत झाली नाही. नुसता खचल्यासारखा तो रांगेत बसून राहिला व थोडा थोडा पुढे सरकू लागला...अगतिकपणे... असहाय्यपणे !

जसजसा डॉक्टरांकडे जाण्याचा त्याचा क्रमांक जवळ येऊ लागला तसतसा तो अस्वस्थ होऊ लागला, त्याची छाती धडधडू लागली. धाप लागल्यासारखे त्याला वाटू लागले. तो मनातल्या मनात देवाची प्रार्थना करू लागला...नवस बोलू लागला.

दुसरा क्रमांक असताना तर त्याला अगदी रडे कोसळेल की काय असे वाटले. पहिल्या क्रमांकावरल्या रोग्याचे तपासणे झाले आणि मग शंकरला बोलविण्यात आले.

शंकरने असहाय्यपणे रफीक्कडे बघितले. रफीक् धीर देणारे हसला. शंकरही हसण्याचा प्रयत्न करू लागला. परंतु अनिच्छेने कां होईना शंकरच्या डोळ्यात टचकन् पाणी आले.

"घबराओ मत, सबकुछ ठीक हो जायेंगा। अल्लामियाँकी मेहरबानी है शंकर।" रफीक्ने शंकरच्या खांद्यावर थोपटले. त्याला धीर दिला.

"चलो जल्दी !" दवाखान्यातला नोकर खेकसल्यागत म्हणाला. रफीक् शंकरसोबत जाऊ लागला तसे दरवाज्यावरच्या चपराश्याने हटकले—

"तुम ठैर जाओ।"

रफीक्चा नाईलाज झाला. शंकर पुढे सरकला. यांत्रिकपणे !

डॉक्टरांनी शंकरला बराच वेळ तपासले. पोटात गाठ असल्याचे आढळल्यावरून बराच वेळ दाबून वगैरे खात्री केली. तपासता तपासता काही प्रश्न विचारले.

"पोटात कधी दुखते का ?"

"फार नाही पण पोटात कधीकधी दाबून 'पायल्यावर गांट असल्यासारखी वाटते !"

"अस्सं !" डॉक्टरांनी विचार केला. मग विचारले–

"सिगारेट ओढत असता का ?"

"ओढीत होतो. आता बंद केली !"

"फार ओढीत होता काय ?"

"जास्त नाही !"

"दिवसातून किती ?"

"एक दीड पाकीट !"

"अस्सं !" डॉक्टर शंकरच्या पाठीवर थोपटून म्हणाले– "घाबरायचं काही कारण नाही. तुमच्याबरोबर कोणी आहे का ?"

"माझा एक मित्र आहे. रफीक् !"

डॉक्टरांनी चपराशाला तसे सांगितले, चपराशाने रफीक्च्या नावाने हाक मारली तसा रफीक् लगबगीने आत आला. डॉक्टरांना नमस्कार करून उभा राहिला.

"इकडे या !"

डॉक्टरांनी रफीक्ला एकीकडे नेऊन हलक्या आवाजात काही सांगितले–

"क्या हो गया ?" रफीक्ने काळजीच्या सुरात डॉक्टरांना विचारले.

"अभी कुछ बोल नही सकते। एक्सरे निकालनेके बाद कुछ मालूम पडेगा और भी बारीकी जाँच की जरूरत है।"

"अच्छा।"

"अभी एक्सरे के लिये लिख देता हूं। एक्सरे निकालने के बाद मुझे मिलो।"

"जी।"

डॉक्टरांनी लगेच एका कागदावर काही लिहिले, तो कागद रफीक्च्या हातात दिला.

शंकर चिमणी एवढे तोंड करून सारे बघत होता. डॉक्टर रफीक्ला म्हणाले–

"अब आप जा सकते।"

"आदाब !" रफीक्ने मुसलमानी पद्धती-प्रमाणे झुकून नमस्कार केला.

"नेक्स्ट प्लीज् !"

रफीक् शंकरला म्हणाला–"चलो !"

"कहाँ ?" शंकरने मोठ्या आतुरतेने विचारले.

"फोटो निकालना है।" रफीक् कोरड्या आवाजात उत्तरला.

"क्यों फोटो निकालना है ? क्या हो गया ? डॉक्टर क्या बोल रहे थे ?"

"कुछ नही, फोटो बारेमेंही बोल रहे थे।"

"ऐसा !"

"चल् !"

शंकर हाताच्या भारावर सरकून रफीकच्या मागोमाग चालू लागला.

एक्सरे थिएटरजवळ आल्यावर रफीक्ने डॉक्टरांनी दिलेला कागद तेथील डॉक्टरांना दाखविला.

"थोडी देर ठैरो। अभी दो फोटो लेनेके है।" तिथला डॉक्टर चिठ्ठी न वाचताच रफीक्ला म्हणाला.

रफीक् काही न बोलता बाकड्यावर बसला. शंकरही त्याच्या बाजूला बसला. दोघेही एक-मेकांशी काही बोलले नाहीत.

जवळजवळ अर्ध्या तासाने एक कर्मचारी त्यांच्याजवळ आला आणि त्याने रफीक्कडे पाहून विचारले–"किसका एक्सरे लेना है ? शंकर किसका नाम है ?"

"ये है।" रफीकने शंकरकडे बोट दाखवून, म्हटले.

"चलो!" तो कर्मचारी शंकरला म्हणाला. शंकरने रफीक्कडे बघितले, रफीक् म्हणाला–

"जाना तू। मैं बैठता यहा पे।"

"तुम भी चलो।"

"शंकरसोबत रफीक्ही आत गेला.

"शर्ट काढा !" डॉक्टर शंकरला म्हणाले.

रफीक्ने शंकरच्या अंगातला शर्ट काढला. डॉक्टरांनी मशिनवर फोटोसाठी 'प्लेट' लावली. शंकरची छाती प्लेटवर बरोबर येईलशी व्यवस्था केली आणि मग अंधार करून, यंत्राचे बटन दाबून फोटो घेतला. फोटो घेतानाचा कुर्रर्रर्र खटक् खुटुक् असा होणारा आवाज ऐकून शंकर पुरता घाबरून गेला.

नोकराने दिवा लावला.

"आता पायाचा एक्सरे घ्यायचा आहे. यांना या मशिनवर चढवा !"

रफीक्‌ने शंकरला उचलून मशिनवर बसविले.

"धोतराच्या आत चड्डी आहे ना ?"

"आहे !"

"धोतर सोडा !"

शंकरने कमरेभोवती गुंडाळलेले धोतर फर्-फर् ओढून रफीक्‌जवळ दिले. डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणे तो यंत्रावर झोपला. डॉक्टरांनी पुन्हा फोटोची व्यवस्था केली. पुन्हा अंधार झाला. पुन्हा तसाच आवाज. पुन्हा प्रकाश.

"झालं तुमचं काम ! उतरा खाली !" तिथल्या कर्मचाऱ्याने सांगितले.

"रिपोर्ट नंतर मिळेल !" डॉक्टर म्हणाले.

शंकरला हायसे वाटले. परंतु त्याला वाटणारी धाकधूक कायमच होती.

डॉक्टरांनी त्यांना दिलेल्या कागदावर काही लिहिले आणि तो कागद रफीक्‌ला दिला. रफीक्‌ने डॉक्टरांना नमस्कार केला.

शंकरने कमरेभोवती धोतर गुंडाळले. शर्ट अंगात घालून तो डॉक्टरांना नमस्कार करून रफीक्‌ला म्हणाला—

"अब कहा जाना है ?"

"चल् !" रफीक् म्हणाला.

"कहा ?"

"मेरे साथ !"

शंकर घुसत घुसत त्याच्यासोबत चालू लागला. पहिल्या ठिकाणी आल्यावर रफीक् शंकरला म्हणाला—

"तू यहाँ ठैर। मैं ये चिठ्ठी बताके आता !"

"अच्छा !"

रफीक् पहिल्या डॉक्टरांजवळ आला आणि नमस्कार करून म्हणाला—

"ये चिठ्ठी।"

डॉक्टरांनी तो कागद बघितला. मग डोळ्यावरचा चष्मा कपाळावर चढवून, डोळ्यात काहीसे गेल्यासारखे वाटले म्हणून रुमालाने डोळे स्वच्छ केले. मग कपाळावरचा चष्मा डोळ्यावर चढवून डॉक्टर म्हणाले—

"इनको दवाखाने में भरती करना पडेगा।"

"हां, करेंगे। लेकीन शंकरकी बिमारी क्या है डॉक्टर साहाब ?"

"अभी कुछ बताने नहीं आता। एक्स रे जांच करने के बाद कुछ मालूम पडेगा।" मग डॉक्टर तेथील कर्मचाऱ्याला म्हणाले—

"वासुदेव, यांच्यासोबतच्या रोग्याला भरती करण्यासाठी न्या।"

"होय साहेब !" नंतर तो रफीक्‌ला म्हणाला— "चला साहेब !"

हातातला कागद निरखून बघून झाल्यावर त्याने विचारले—

"शंकर कोण आहे ?"

"माझा दोस्त हाये."

"त्यांना घेऊन चला. वार्ड नं. पाच. मी थांबतो तिथे."

"आनतो !"

रफीक् शंकरजवळ आला. कोरड्या आवाजात म्हणाला—

"चल्."

"कहाँ ?"

"दवाखाने में।"

"अपन् जहाँ है ओ क्या है ?" शंकरने त्राग्याने विचारले.

"येभी दवाखाना है। मगर अब उधर जाना है।" मग थोडासा थांबून रफीक् म्हणाला, "डॉक्टरने बोला है भरती करनेकू।"

"मैं नहीं होता भर्ती-गिर्ती। मैं वैसा घरकू मरूंगा, लेकीन यहाँ भर्ती नहीं होता रफीक्।"

"ऐसा हठ मत कर शंकर, बच्चे जैसा। चल् भला, सब ठिक होंगा। घबराये मत। तू भरती हो जा, मैं हूंना, तू जल्दी अच्छा हो जायेंगा।"

"मैं नहीं आता। घरपे चल् पैले।"

तसा रफीक् चिडला. चिडून म्हणाला—

"चूपचाप चल् भला।"

शंकरच्या डोळ्यात पाणी आले. डोळ्यातली आसवे त्याच्या गालांवरून ओघळू लागली. रफीक्‌ने त्याचे डोळे पुसले. त्याच्या पाठीवर थोपटले. क्षणार्धातच शंकरचा चेहरा उजळला. तो सारेसारे दुःख गिळून हसू लागला. हसत हसत म्हणाला—

"चल्."

आणि तो दोन हाताच्या भारावर भराभर

अनुक्रमणिका

चालू लागला. रफीक्च्याही पुढे !

३

वरच्या मजल्यावरील वॉर्ड नं. ५ मधील तिसऱ्या क्रमांकाची खाट शंकरला मिळाली. कारकूनाने दिलेली चिठ्ठी रफीक्ने हाती घेतली आणि त्याने नमस्कार केला. म्हणाला–

"अच्छा बाबूजी, शुक्रिया !"

रफीक् कार्यालयाबाहेर आला.

शंकर सिमेंटाच्या मोठ्या गोल खांबाला टेकून बसला होता आणि तो रफीक् येण्याची वाट बघत होता. रफीक् त्याच्याजवळ येताच त्याने अधीरतेने विचारले–"क्या हुआ ?"

"भरतीका नंबर मिल गया। तू यहाँ पे ठैर जरा, मैं स्ट्रेचर मिलता क्या ओ देखके आता।"

"जल्दी आना।"

"हौ।"

रफीक् स्ट्रेचरसाठी इकडे तिकडे भटकला. स्ट्रेचर अर्ध्या पाऊण तासानंतर मिळेल असे कळताच तितका वेळ थांबणे शक्य नाहीसे वाटून तो एका कर्मचाऱ्याला म्हणाला–

"कॉट बिलकूल खाली है ना ?"

"चलो, मैं तुम्हारे साथ आता !" तो कर्मचारी नंतर लगेच म्हणाला–

"ठैरो, मैं जरा देखके आता" आणि तो लगेच जिन्याच्या पायऱ्या भराभर चढून गेला आणि पाच मिनिटातच परत आला.

"चलो !"

रफीक्ने इकडे तिकडे बघितले. मग तो शंकरला म्हणाला–

"चल...मेरे पिठपे लेता मैं तेरेकू।"

"क्यों, स्ट्रेचर नहीं मिला क्या ?"

"ये सरकारी दवाखाना है।"

"ओ अपने पहेचानकी सिस्टर है ना, उससे मिलना था।"

"देखा उसको. उसकी यहाँसे बदली हो गयी बोलते।"

"कहाँपे ?"

"ओ नहीं मालूम।"

शंकरने एक दीर्घ सुस्कारा सोडला. रफीक् म्हणाला–

"आ, बैठ भला पिठपे जल्दी।"

"तेरा ये सिल्कका शरट खराब हो जायेगा ना ?"

"होने दे। आ–"

रफीक्ने पोते पाठीवर घ्यावे तसे शंकरचे दोन्ही हात धरून त्याला आपल्या पाठीवर घेतले. म्हणाला–

"मेरेकू बराबर पकड।"

"हौ।"

रफीक्ने आपला हात आधारासाठी, त्याच्या ढुंगणाखाली, स्वतःच्या पाठीला दाबून धरला आणि तो भराभर पायऱ्या चढू लागला. वॉर्ड नं. ५ पाशी तो थांबला व त्याने दारातून डोकातून बघितले. तो कर्मचारी हाताने इशारा करून रफीक्ला बोलावीत होता. रफीक् तिकडे गेला.

नंबर तीनवरचा रोगी, रोगी वाटत नव्हता. तो नवे कपडे घालून जाण्याच्या तयारीत होता आणि त्याच्याबरोबर असलेली तरुणी पाठमोरी उभी होती.

रफीक्ने शंकरला खाली बसविले. तिथला एक कर्मचारी ती कॉट साफसूफ करू लागला.

ती तरुणी त्या बऱ्या झालेल्या रोग्याला म्हणाली–

"अजून कसा आला नाही तो ?"

"येईल इतक्यात।"

शंकर त्या रोग्याकडे व त्या तरुणीकडे बारकाईने पाहू लागला. मग त्याला, त्या दोघांना कुठेतरी बघितल्यासारखे वाटू लागले. क्षणार्धातच त्याला त्यांची ओळख पटली. ती तरुणी सौ. सरिता देशपांडे व तो तिचा पती प्रा. श्रीधर देशपांडे होता. सरिता देशपांडेने एकदा शंकरकडे तिऱ्हाईतासारखे बघितले. तिने त्याला न ओळखल्यामुळे काहीच न घडल्यासारखी ती आपल्या नवऱ्याजवळची पिशवी हातात घेत म्हणाली–

"मी तर खूपच घाबरल्ये होते तुझ्या दुखण्याने."

"निभावलं." सूटकेचा श्वास टाकून तो म्हणाला. मग त्यांना हवा तो माणूस आल्यावर सौ. देशपांडेने विचारले–

"आणली रिक्षा ?"

"हो ! चला ! ताई, तू फक्त श्रीधर-रावांना धरून चल् ! मी सगळं सामान सोबत आणतो !"

"बरं."

आणि ती तिघेही निघालीत.

त्यांनी आपणाला ओळखले नाही म्हणून शंकरला हायसे वाटले. रफीक् त्या तिघांकडे निरखून बघत होता.

"हां, अब ये कॉटपे बिमार आदमी को रख दो। मैं चलता हूं–"

"अच्छा !"

कर्मचारी निघून गेला. रफीक्ने शंकरच्या दोन्ही बगलेत हात घालून शंकरला उचलले आणि पलंगावर बसविले.

"लेट जा अब।" लाल उनी ब्लँकेट त्याच्या कमरेपर्यंत ओढून रफीक् म्हणाला.

शंकर पडल्या पडल्या इकडे तिकडे न्याहाळू लागला. मग तो रफीक्ला म्हणाला–"रफीक्, मेरेकू किनी भल्ली भूक लग गई देख।"

"अच्छा तो मैं अभी चाय लाता। चाय पियेंगे और फिर थोडीही देर में मैं भाभीको बताके आता, क्या ? नहीं तो मैं खूदही खानेका डब्बा लेके आता।"

"तेरेकू भी भूक लगी होंगी ?"

"नहीं, अभी नहीं लगी।"

"काय झालं यायले ?" शेजारच्या पलंगा-वरील उजवा हात पोळलेल्या रोग्याने रफीक्ला विचारले.

"काई नाई।" शंकरनेच उत्तर दिले.

कोणतीही बिमारी नसताना एखादा बिमार दवाखान्यात भरती होऊ शकतो, याचे त्या रोग्याला खूपच आश्चर्य वाटले. तरी त्याची जिज्ञासा त्याला चैन पडू देत नव्हती. त्याने पुन्हा विचारले–

"खोटं सांगता तुमी ! खरं सांगाना काय झालं ते ?"

शंकरला काय सांगावे ते सुचले नाही. पाया-वरले ब्लँकेट बाजूला करून तो म्हणाला– "माहे हे पाय तुटले हायेत ना, त्याले नकली लाकडी पाय जोडा लागतेत्."

"तरीच तं म्या म्हनलं." त्या रोग्याला ते पटले. मग त्याने आपणहून शंकरला सांगितले, "माह्या हात जयला. गरम गरम तेल सांडलं हातावर !"

"अस्सं ! आता बरा हाये हात ?"

"हौ !"

"अच्छा तो मैं चलता शंकर, क्या ? और जल्दी लौटता चाय लेके।" आणि रफीक् निघून गेला.

शंकर संपूर्ण वॉर्ड न्याहाळू लागला. काही रोगी झोपले होते अन् काही कण्हत होते. काही उठून बसले होते. काही मोसंबी–मुरमुरे खात होते तर काही जेवत होते किंवा कडू कडू औषध तोंडात टाकून तोंड वेडेवाकडे करीत होते...औषध बन-विणाऱ्यांना शिव्याशाप देत होते.

त्या हात पोळलेल्या रोग्याने पुन्हा एकदा शंकरकडे बघितले. मग रहावले नाही म्हणून विचारले–"तुमी काय काम करीत होते ?"

"रिक्षा चालवत होतो ! ट्रकखाली चेंदलो म्हनून पाय कापा लागले !"

"अरे अरे अरे !" तो रोगी केविलवाणा चेहरा करून हळहळला. मग म्हणाला, "मी एका होटलात माल काढाले होतो ! भजे काहाढता काहाढता तेलच हातावर सांडलं !"

"अस्सं ! कोन्ता इलाज केला मंग ?"

"हाताले लेप लावनं चालू हाये रोज, आणखीन् काय ?"

शंकर त्यावर काही बोलला नाही.

टप्टप् बूट वाजवित एक नर्स आली. शंकर तिला बघून सावरून बसला. ती त्याच्याजवळ आली. खिशातून थर्मामिटर काढून तिने ते झटकले व शंकरला ते तोंडात ठेवायला सांगितले. घड्याळाकडे बघून तिने ते काढून घेतले. डोळ्यासमोर थर्मामिटर आडवे धरून ती बघू लागली. मग चार्टवर तापाची नोंद घेऊन तिने प्रेमळपणाने विचारले–

"तुमच्या सोबत कोणी माणूस नाही काय ?"

"आहे ना, चहा आणायला बाहेर गेला !"

"आला म्हणजे भेटायला सांगा !"

"तुमचं नाव काय सांगू ?"

"सिस्टर शानू !"

"सिस्टर, एक विचारू ?"

"बिचारा!"

"इथे मिस् शर्मा सिस्टर होती ना?"

"तिची बदली झाली नागपुरास! तिला तुम्ही ओळखता?"

"मी तुम्हालाही ओळखतो! पण नाव एकदम आठवलं नाही मला!"

"मला ओळखता?" तिने अतिशय आश्चर्याने विचारले आणि ती शंकरकडे बारकाईने बघू लागली.

"ओळखलं मला?" शंकरने हसून विचारले.

"नाही. मला माफ करा, खरंच मला तुम्हाला कुठे बघितल्याचं आठवत नाहीय्!"

शंकर उसने हसला. काही न बोलता त्याने आपल्या तुटलेल्या पायावरले ब्लँकेट बाजूला केले. विचारले–

"आता आठवते?"

"तुम्ही शंकर रिक्षावाला का?"

"हो!" चेहरा हसरा करून शंकर म्हणाला.

"काय झालं तुम्हाला?" तिने मोठ्या काळजीच्या सुरात विचारले.

"तुम्ही ओळखले नाही ना मला?"

"हो, खरेच मी तुम्हाला ओळखू शकले नाही! फार अशक्त झालात तुम्ही पूर्वीपेक्षा!"

शंकर कारण नसता हसला. ती त्याचे समाधान करू लागली. म्हणाली–

"ठीक होईल सर्व काही! घाबरू नका, हिंमतीनं घ्या! मी इथे आहे तुमची काळजी घ्यायला, का?"

"हो!" तिने दिलेल्या दिलाशाने शंकरला फार बरे वाटले. त्याचे हृदय भरून आले. दोन्ही ओठ दाबून तो तिच्याकडे बघू लागला. तिने त्याला थोपटले. म्हटले, "मी चलते! मिसेस् देसाई यांना मी पत्र लिहिणार आहे. त्यात तुमच्याबद्दल लिहीन! मिस् शर्माचं डॉक्टर देसाई बरोबर लग्न झाल्याचं तुम्हाला माहित असेलच?"

"नाही. प्रथमच ऐकतो! त्यांना माझा नमस्कार अवश्य लिहा आणि लग्नाबद्दल अभिनंदन केलं म्हणून कळवा!"

एक रिक्षावाला इतके चांगले बोलतो, याचे तिला कौतुक वाटले.

"बरं!" ती गोड हसली. म्हणाली, "चलते मी!"

आणि ती टप्टप् बूट वाजवीत निघून गेली.

थोड्या वेळाने रफीक् आला. त्याच्या मागोमाग चहाचे पेले व किटली घेऊन हॉटेलचा पोऱ्या बयराम आला. बयरामने शंकरकडे बघितले आणि रडवलेल्या चेहऱ्याने विचारले–

"काय झालं शंकर भाऊ?"

"काई नाई!" मग त्याच्याकडे हसून बघितल्यावर म्हणाला, "आजून तं काई झालं नाई!"

रफीक् बयरामला म्हणाला–"चाय् भर बयराम!"

"हौ!" बयरामने दोन पेल्यात चहा ओतला. एक पेला शंकरला दिला आणि दुसरा रफीक्‌ला. चहा पिता पिता रफीक्‌ने शंकरला विचारले–

"अभी ये कॉटपेका पेशंट गया ना, उसको और उसके साथ जो बाई थी उसको भी, कहीं देखे जैसा मालूम होता शंकर, मगर जबसे मैं सोच रहा हूं, लेकीन ठीक याद नहीं आ रहा!"

शंकर हसून म्हणाला–

"तुझे याद है, तेरेकू प्राईझ बाँड के पैसे मिलनेके बाद अपन नयेनये कपडे पहेनकर सिनेमा गये थे, तू–मैं–और शेवंती–"

"हां अभी याद आया। अपन 'जिस देशमें गंगा बहेती है' ये सिनेमा देखने के लिये 'चित्रा' में गये थे, बराबर है–अब याद आया, ये बोही औरत है ना जो तेरी कहानी लिखना चाहती थी?"

"हौ। वही औरत और उसका मरद।"

"लेकीन तू कुछ बोला नहीं उस्से?"

शंकर थोडासा घुटमळला. मग म्हणाला, "नहीं। क्या अपना रोना गाना हरदम। नही? उसको क्या बताऊ? तू और मैं पहिले रिक्षा चलाते थे, बाद में तेरेकू प्राईझ बॉण्ड लगी, तूने होटल डाला, तू सेठ बना और मैं, मैं वोही शंकर रिक्षेवाला, तुम्हारे घरपे भिख मांगने आया था

फटे पँटकी, और उसी दिन मेरा ' अॅक्सिडेंट ' हुआ जिसमे मेरे ये दो पैर कटे और मैं अब दरदरका भिखारी हुआ। क्या बताऊं ?"

आणि बोलता बोलता त्याच्या डोळ्यांतून आसवे ओघळू लागली. रफीक्‌ने त्याची आसवे पुसली. त्याला धीर देत थोपटले. म्हटले—

" शंकर, खूदकू इतना गया गुजरा ना समझ। अल्लामियाँ चाहेंगे तो तूभी पानके ठेलेका मालिक बनेगा।"

" मालिक को शायद ये मंजूर न हो।"

रफीक्‌ने एक उसासा टाकला.

बयरामने रिकाम्या कपबशा उचलल्या आणि तो म्हणाला—

" जातो मी शंकर भाऊ।"

" हाँ ! बच्चूभाईला सांगजो, उद्यागिद्या येजा म्हनून !"

" हाँ !" बयराम मागे वळून बघत बघत निघून गेला.

थोड्या वेळाने रफीक्‌ने आपल्या घड्याळात बघितले. तो शंकरला म्हणाला—

" शंकर, अब एक बज रहा है। मैं जाता और भाभीको इतल्ला कर देता. और मैं चार पाच बजे तक फिर यहाँ आता। तवतक मैं कादरकू नहीं तो एखादे पोट्टेकू यहाँपे भेज देता, क्या ?"

" अच्छा।"

रफीक् हॉस्पिटल बाहेर आला. एक रिक्षा ठरवून तो सरळ शंकरच्या घरी आला. त्याने दारातूनच बघितले—

शेवंतीला ओकाऱ्या येत होत्या आणि गिरजी तिच्या पाठीवरून हात फिरवीत होती.

" क्या हो गया भाभी ?"

गिरजीने मागे वळून बघितले. रफीक्‌ला बघून तिने डोक्यावर शेव् घेतला व ती हसून म्हणाली—

" तुमी काका होनार हायेत् !"

रफीक् एकदम खूष झाला. मोठ्याने हसला. म्हणाला—

" भाभी जिंदाबाद।"

शेवंती लाजून चूर झाली.

४

शेवंतीने गुळणा केला. दोन तीन वेळा चांगले खरवडून तोंड धुतले आणि पदराने ते पुसून ती उभी राहिली. रफीक्‌कडे बघून ती म्हणाली—

" हे नाई आले ?"

" शंकरले दवाखान्यात भरती केलं भाभी !"

" काऊन ? काय झालं ?" तिने काळजीने विचारले.

" काय झालं ते समजाचं हाये. पन् डॉक्टर म्हने भरती करा लागते म्हनून. म्हनून भरती केलं. शंकरचे फोटो काढले, छातीचे आन् पायाचे !"

शेवंती मटकन् खालीच बसली. तिचा चेहरा एकदम उदास झाला. गिरजीही तिच्या बाजूला बसली. कसला तरी विचार करीत.

बऱ्याच वेळापासून रफीक् नुसता उभाच असल्याचे शेवंतीला भान राहिले नाही. मग भानावर आल्यासारखी ती म्हणाली—

" बसाना बाप्पूजी ?"

" हाँ !" रफीक् बसला. मग म्हणाला— " तुमी सयपाक केला असल् तं डब्बा घेऊन जा दवाखान्यात ! थोडासा नरमनरम भात टाका शंकरसाठी !"

" हौ !" शेवंती थंडपणे म्हणाली.

" कोणत्या भागात भरती केलं ?" गिरजीने विचारले.

" बरते ! वॉर्ड नं. ५ ! तिसरी खाट हाये !"

" अस्सं !"

शेवंतीने दीर्घ सुस्कारा टाकला. मग ती स्वत:शीच म्हणाली—

" आता आणखीन् काय काय पाहा लागते देवा ?"

" काई नाई पाहागिहा लागत्—" गिरजी समजावणीच्या सुरात शेवंतीला म्हणाली, " सर्व चांगलं होत अस्ते ! त्या देवावर भरोसा असू दे, सर्व ठीक होईन् !"

रफीक् म्हणाला, " अच्छा भाभी, मी चलतो. काय ? और तू घबराये मत भाभी, मैं हूं ! काई नाई होतगित. शंकरची तब्येत चांगली होईल. मंग तो एखादा धंदागिदा करल् ! पानाचा ठेला लावून

दिन त्याले मस्त. समजली भाभी? अब ज्यादा सोचे मत! मैं जल्दीसेही अस्पताल में आता हूं! जरा घर जाके देखता!" आणि मग अतिशय काळजीने–हळवेपणाने रफीक् म्हणाला, "भाभी, सच पूछो तो मैं क्या करू, मेरे समझ में नहीं आता, मैं क्या करू भाभी?"

"काऊन, काय झालं?" शेवंतीने काळजीच्या सूरात विचारले.

"लग्न पुढच्या हप्त्यात गुरुवारी हाये. आजून फक्त आठदहा दिवसानं. मुझे यहाँसे मंगल को रातको निकलना पडेगा! बंबई जाना है! मिजवान घरपे आ रहे है! आजका मंगल, याने आठ दिनके बाद मुझे जाना है और इधर शंकर को भरती किया है! उधर मेरे शादीकी तैयारी चल रही! क्या करू कुछ सूझ नहीं रहा! ऐसा लग रहा की शादीकी तारीखही बदल देना. शादी महिना दो महिने बाद करना, मैं क्या करू भाभी?"

रफीक् एकाएकी असहाय्यपणे विचारू लागला. काय करावे आणि काय करू नये या सर्व विचारांचा त्याच्या डोक्यात घोळ सुरू झाला. काय करावे हे त्याला अजूनही नीटसे कळले नाही. काय करावे याचा तो निश्चितपणे निर्णय घेऊ शकला नाही.

"काई इचारगिचार नोका करू बाप्पूजी. तुमी माह्या वडलाले एक पत्र टाकून द्या आजच्या आज. आन् तुमी जा लग्नाले, काई होत नाई. माहे वडिल येतील लौकर, तेवढाच मले एकटीले आश्रो राहील. तुमी तेथून कधी वापस याल?"

"शनिवारी येईन इथं."

"तसं पायलं तं तुमच्या लग्नाची यायले केवढी हौस? पन् ऐन लग्नाच्याच वक्ती असं झालं पाहा. तकदीरापुढं सारे इलाज खतम होतेत. मलेतं काय करावं काई सूचत नाई, मी पडली बाई-मानूस."

"मी हाओना, तुमी एकटचा कावून हा?" रफीक् दिलासा देत म्हणाला.

"तुमी व्हा म्हनून तं एवढं करून रायले बाप्पूजी. दुसरा एखादा अस्ता तं तो आपल्या होटलात आन् पैशात खूस अस्ता बाप्पूजी."

"खरं हाये माय शेवंते. यायनं शंकर बाप्पूजीचा जेवढा आट काढला असन् तेवढा तं तुयाय् काढला नाई. कोन करते ओ कोनासाठी या जमान्यात? यायच्या सारखे जिवाले जीव देणारे दोस्त पायले म्हनजे वाट्टे का आजून या जगात मानूसकी हाये म्हनून." शेवंतीला गिरजीने समजावले. चोपकारले.

शेवंती समाधानाने म्हणाली, "बाप्पूजी, तुमी विनधोक जा लग्नाले. माहे वडिल येतील आन् माही सखूवहिन हाये हे गिरजी. तुमी ये पावतर आमी निभोतोच कसं तरी. काई कायजी करू नोका बाप्पूजी. काय?"

"बरं!" मग तो थोडा थांबून म्हणाला,

"भामी मी येतो आमासाक् घरी जाऊन. बुढी तक्तक् वाट पाहात असन्. घरी आनखीन् लग्नाचं सामायन आनाचं हायेच. मी दवाखान्यात येतोच पाच वाजे पावतर. पन् तुमी आता लौकर जा. शंकर म्हने का भूक लागली म्हनून."

"हौ. आत्ता भात टाकतो. तो झाल्यावरोबर जातो. गिरजे, तू चालशीन् काय माह्या वरोबर ?"

"हौ."

"अच्छा भाभी, जातो मी."

"वरं."

रफीक् निघून गेला.

तो निघून गेल्यावर शेवंती गिरजीला म्हणाली—

"गिरजे, रफीक् वाप्पूजी वंवईले लग्नाले चाल्ले. मले कानी कसं एकटं एकटं वाटून रायलं. रफीक् वाप्पूजी असले म्हंजे मले यायची विल्कूल कायजी वाटत नाई. कसं हुईल ओ यायचं ?"

"काई नाई होत्. तू कायले कायजी करतं ? कायजी करनेवाला तो इस्वर हाये, समजली ?"

शेवंतीला थोडे समाधान वाटले.

मुलाचे रडणे गिरजीच्या कानावर पडले तशी ती म्हणाली—

"मी पाहून येतो जरा पोराले, त्यानं काय दिवे लावले तं ?" आणि ती उठून निघून गेली.

घरात आल्यावर तिने वघितले. तिच्या विनायकने तीनचार ठिकाणी घाण केली होती आणि तो रडत होता. तिने त्याच्या पाठकाडांत एक धपाटा दिला. म्हणाली—

"वुहाऱ्या तोंडाच्या, कसा काजनं पैदा झाला इदूरवटक्या ? आत्ताच्या आत्ता तीनचार येळा हागला. जशी त्याच्या गांडीले धार लागली. शीन आनून टाकला या पोट्टचानं तं."

तिने त्याला वकोटीला धरून उचलले तसा तो आणखीन् तोंड वासवून रडू लागला. निर-निराळे आवाज काढून सूर धरू लागला. तिने त्याचे ढुंगण धुतले आणि ते पदराने पुसून आणखीन् मार देण्याचा ती धाक घालू लागली. त्याने दम चोरला आणि रडे फुटणार नाही असा फुसांडू लागला. तिने त्याला कडेवर घेतले. दाराला कडी घातली आणि ती शेवंतीकडे आली. वघितले.

शेवंती दोन्ही गुडघ्यात मान घालून मुस-मुसत होती.

"काऊन ओ, काय झालं माय् तुले लडाले ?" आणि शेवंतीने एकाएकी हंवरडा फोडला.

"कसं होईन ओ माह्यं गिरजे ?"

पोराला जमिनीवर वसवून गिरजी तिच्या पाठीवरून हात फिरवून चोपकारू लागली. म्हणाली—

"असा धीर नोको सोडू वाई शेवंते ! सव्र्यालेच भोगा लागते. तुह्या एकटीच्याच थोडी नशिवात हाये ? उगी–उगी माय् शेवंते !"

शेवंतीला आणखीन्च भरून आले. ती हुमसून हुमसून रडू लागली. आकाश फाटल्या-सारखी !

५

सायंकाळी पाच वाजता रफीक् आला त्यावेळी शंकर पाठीमागे उशा ठेवून पलंगाला टेकून वसला होता आणि शेवती-गिरजी खाली फरशीवर नुसत्या वसून होत्या. रफीक्ला वघून शंकरला आनंद झाला. त्याचा चेहरा उजळला. तो जवळ येताच शंकर म्हणाला—

"आ रफीक् !"

"या वाप्पूजी !" शेवंतीने हसून म्हटले. रफीक् एका स्टूलावर वसला. त्याने विचारले—

"कोई डॉक्टर–गिक्तर आया था क्या ?"

"नहीं तो ! तू जाने के वाद एक नर्स आई थी ! उसने मिलनेकू वोला।"

"क्या नाम है उस सिस्टर का ?"

"शानू !"

"अच्छा तो मैं अभी आता उसको मिलके !"

"अच्छा।"

रफीक्ने मिस् शानूची चौकशी केली. ती दुपारी चारलाच 'ड्यूटी' संपवून गेल्याचे कळले. मग तो त्या डॉक्टरकडे आला. डॉक्टरांना दोन्ही हात जोडून लाचारीने म्हणाला—

"नमस्ते डॉक्टरसाहाव !"

"नमस्ते !" कामाने त्रस्त झालेल्या डॉक्ट-रांनी जवळ नाखूषीनेच नमस्कार केला. डॉक्टरांचा त्रासिक चेहरा वघून त्यांना विचारावे की विचारू नये याचा रफीक्ने विचार केला. मग थोडेसे

संकोचून त्याने विचारले—" शंकरका क्या हो गया फिर डॉक्टरसाहाब ?"

" कौन शंकर ?" न आठवून डॉक्टरने विचारले.

" ओ मेरा दोस्त । लंगडा है दो पैरसे; ओ । सवेरे फोटो निकाला था उसके ?"

" हां । याद आया । फोटो और केस पेपर सिव्हील सर्जन के पास भेज दिये है !" डॉक्टर एवढे सांगून पुन्हा आपल्या कामात गुंतला. पुन्हा काही तरी विचारावे म्हणून रफीक्चे ओठ हलले परंतु तो काही बोलू शकला नाही. डॉक्टराने, तो तिथे तसाच उभा असलेला बघून, कामातून आपले लक्ष काढले व रफीक्कडे काहीशा चिडक्या नजरेने बघितले. म्हटले—

" अभी सिव्हील सर्जन बहोत बडे काम में है ! कल सवेरे आजाना !"

" अच्छा !" रफीक् हात जोडून म्हणाला.

डॉक्टर काहीच बोलला नाही.

रफीक् निघाला. तो सिव्हील सर्जनच्या ऑफिसजवळ आला. दरवाज्यावर पहारेकरी उभा होता, त्याला रफीक्ने विचारले—

" बडे डॉक्टर साहाब है क्या ?"

" हां । क्यों ?"

" उनको मिलना है ।"

त्या कर्मचाऱ्याने एक छोटा कागद देऊन म्हटले—

" अपना नाम और काम लिखो !"

रफीक्ने त्यावर लिहिले व तो कागद त्या कर्मचाऱ्याला दिला. कर्मचाऱ्याने तो कागद आत नेला व थोडचा वेळातच तो परत येऊन म्हणाला— ' बैठो नंबर लगाके !"

रफीक्, पाच सात लोक बाकडचावर बसले होते, त्यांच्या बाजूला बसला.

एकेकजण करून एकेकजण आत जाऊन येऊ लागला. कुणी हसऱ्या चेहऱ्याने तर कुणी अतिशय उतरलेल्या चेहऱ्याने ! मग त्याचा क्रमांक आला.

" रफीक्मियाँ " कर्मचाऱ्याने त्याला आवाज दिला.

" हां !"

" चलो, बडे डॉक्टरसाहाब बुला रहे है ।"

रफीक्च्या अंगातून शक्ती निघून गेल्यासारखे झाले. तो थंडपणाने व काहीशा जड पावलाने आत गेला. मोठचा डॉक्टरांनी त्याला बघून स्मित केले. हुबेहूब डेव्हीड या नटासारख्या दिसणाऱ्या सिव्हिल

सर्जनला त्याने संकोचून नमस्कार केला.

"बसा !" डॉक्टर म्हणाले.

खुर्चीवर बसताना आपले हातपाय किंचित् थरथर कापू लागल्याचे रफीक्‌ला जाणवले.

डॉक्टरांनी पुन्हा एकदा शंकरचे काढलेले फोटो एकेक करून प्रकाशचौकटीवर लावून काळजीपूर्वक न्याहाळून बघितले, अगदी बारकाईने ! रफीक्‌नेही बघितले. एक्सरे अतिशय स्पष्ट होते. छातीतल्या बरगड्या स्पष्ट दिसत होत्या आणि पोटांतल्या भागात एक काळसर गोलवट डाग दिसत होता. दोन्ही पायाच्या फोटोत मोठे हाड वटवटीतपणे दिसत होते. डॉक्टरांनी ते एक्सरे फोटो न्याहाळून झाल्यावर चौकटीवरून काढून पिवळ्या लिफाफ्यांत ठेवले. एक दीर्घश्वास सोडून त्यांनी रिपोर्टाचा कागद एकदा वाचला. थोडावेळ ते निमूटपणे बसून राहिले.

"क्या हो गया डॉक्टरसाहाब ?"

डॉक्टर चेहरा निर्विकार ठेवून म्हणाले, "कॅन्सर है !"

आपला लोळागोळा झाला आहे असे रफीक्‌ला वाटले. हॉस्पिटलची संपूर्ण इमारत आपल्यावर कोसळली आहे असे त्याला वाटले. खुर्चीतून उठण्याची शक्ती आपणात नसल्याची त्याला जाणिव झाली. त्याने तुटक आवाजात विचारले—

"क्या करना पडेगा ?"

"ऑपरेशन !"

"कब ?"

"ओ अभी इसी वक्त नही बता सकते. बिमार आदमीको पूरा जाँचना होगा. शायद इलाजके लिये उन्हे बंबई भेजना पडेगा !"

रफीक् अवाक् झाला.

"दो दिन बाद मिलो।" डॉक्टर म्हणाले.

"अच्छा !" रफीक्‌ने दोन्ही हात जोडून नमस्कार केला. म्हणाला—

"आपकी बडी मेहरबानी !"

—आणि रफीक् शंकरकडे न जाता दवाखान्याच्या मोठ्या फाटकातून बाहेर पडला. कोलमडल्यासारखा.

६

सायंकाळी पाचला आलेला रफीक् सिस्टरला भेटायला गेला तो दोन तास झाले तरी अद्याप का परतला नाही याची शंकरला काळजी वाटू लागली. तो आल्यानंतर पाचही मिनिट न थांबता निघाला होता. शंकर अतिशय अस्वस्थ झाला. पाच पाच मिनिटाने अधिकाधिक निराश होऊ लागला. गिरजी अंधार पडण्यापूर्वीच निघून गेली होती, पुन्हा उद्या सकाळी आपल्या नवऱ्याला घेऊन येण्याचे कबूल करून ! ती गेल्यावर शेवंतीला एकटे एकटे वाटू लागले. शंकर जवळ असताना तिला यापूर्वी असे कधीच वाटले नव्हते. ती सारखा विचार करू लागली. शंकरसारखीच तीही रफीक्‌ची वाट बघू लागली. मिनिटामिनिटाने ती दोघेही दरवाज्याकडे बघू लागली. मग दोघांची नजरानजर होताच न बोलता निराश होऊ लागली परंतु कुणीच काही न बोलता पुन्हा दरवाज्याकडे पाहू लागली. न राहवून शेवंती खोली बाहेर आली. कॉरिडॉरमधून खाली शोधक नजरेने पाहू लागली. दवाखान्यातले कर्मचारी इकडून तिकडे आणि तिकडून इकडे काही कामानिमित्त ये—जा करीत होते आणि अगदी कोपऱ्यात इमारतीलगत पाचसात माणसे आणि दोन तीन बायका कपाळावर हात देऊन बसल्या होत्या. रात्रपाळीचे काही डॉक्टर्स—नर्सेस येऊ लागले होते तर काही आपली ड्यूटी संपवून मोठ्या उत्साहाने परतू लागले होते. बाहेर सर्वत्र दिवे लागले होते आणि त्यांचा ओका ओका पिवळसर प्रकाश सर्वत्र पडला होता. झाडाच्या पलिकडे असलेल्या विद्युत्‌दीपाच्या प्रकाशामुळे डेरेदार सावली समोर पडली होती आणि झाडाखालून येणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या अगोदर त्याची सावली पुढे येई आणि नंतर ती व्यक्ती ! अशा दोन चार सावल्या इकडे तिकडे पांगल्या.

कठड्याला टेकून वाट पाहून शेवंती थकली. ती परतण्यासाठी सरकली. परंतु, एक व्यक्ती झप्‌झप् येताना पाहून तो रफीक्‌च असावा असे तिला वाटले म्हणून ती थबकली. परंतु ती व्यक्ती त्या कोपऱ्यात डोक्यावर हात ठेवून बसलेल्या माणसाकडे वळली तशी शेवंती निराश झाली. परतली. वॉर्डमध्ये येऊन ती शंकरच्या खाटेजवळ बसली. दीर्घ उसासा टाकून. शंकरने तिला तसे मटकन् बसताना बघितले आणि विचारले—

"आजून नाई आला रफीक् ?"

"नाई !"

"कुठी गेला काजनं ? अजब मानूस हाये ? मंघा आला, जरासाक् थांवला आन् जो गेला तं आजून त्याचा पत्ता नाई...कोनत्या कामात गुतला काजनं ?" शंकर चिडलेल्या आवाजातच म्हणाला.

"येतीन् इतक्यात ! काई काम असल जरुरीचं म्हनून तं येळ लागून राह्यला, नाही तं इतका येळ कायले थांवले अस्ते ?"

"त्याच्या मांगय् घोर झाला माह्या बेमारीचा ! थो आपला धंदा करल् का आपल्या लग्नाकडे पाहिल् का माह्याकडे पाहिल् ? त्यानय् काय काय कराव् ?" मग शंकर स्वतःवरच चिडल्यासारखा चेहरा करून दरवाज्याकडे पाहू लागला.

थोडचा वेळातच एक डॉक्टर आणि एक नर्स त्याच्याजवळ आली. डॉक्टरांनी त्याला हसून विचारले–

"तुम्हीच ना शंकरराव ?"

"हो !"

"काय होतंय् तुम्हाला ?"

"काही कळलं नाही !"

"तुम्हाला काय जाणवतं ? काय दुखतं तुमचं ?"

"तसं काही दुखत नाही, पण अशक्तपणा खूप वाटतो !"

"परसाकडे झाली का ?"

"नाही !"

"कधी झाली होती ?"

"आज सकाळी !"

"तुमच्या बरोबर इथे ही बाई आहे काय ?"

"हो ! माझी पत्नी आहे !"

त्याला डॉक्टराच्या प्रश्नांना उत्तरे देताना धाप लागल्यासारखे वाटू लागले. डॉक्टरांनी शेवंतीला सारे समजावून सांगितले. लघवी, परसाकडे, थुंकी तपासण्यासाठी हवी म्हणून दोन तीन छोटचा काचेच्या बाटल्या तिच्याजवळ दिल्यात आणि नंतर ते नर्सला म्हणाले–

"सिस्टर, यांचं रक्त काढायचं आहे थोडं!"

नर्सने आपल्या हातातील आवश्यक असणाऱ्या बॉक्समधील साहित्य डॉक्टरांना दिले. डॉक्टरांच्या हातातली इंजेक्शनची सुई बघून शंकरला शहारल्यासारखे झाले.

डॉक्टर शंकरजवळ बसले. त्यांनी औषधीचा फाया शंकरच्या उजव्या हाताच्या जोडातल्या नसे-वर चोळला. नंतर ते म्हणाले–

"तिकडे बघा, काही होत नाही."

हातात सुई खुपसल्या गेली. तो थोडा चित्कारला. सुई काढून डॉक्टर म्हणाले–"काय होतंय् एवढयाशा सुईने ? लहान मुले हसता हसता टोचून घेतात, काय ?"

शंकर उसने हसू लागला. त्याला तसे हसताना बघून डॉक्टर म्हणाले–

"दॅटस् गुड !"

मग काढलेल्या रक्ताची बाटली नर्सजवळ देऊन डॉक्टर शंकरला थोपटू लागले. त्याला धीर देत म्हणाले–

"काही काळजी करू नका. घाबरायचं काही कारण नाही. उद्याला खुद्द सिव्हील सर्जन तुमची तपासणी करतील. नंतर तुमच्यावर योग्य तो उपचार करतील. चांगलं भरपूर जेवण करता ना ?"

"हो !"

"दॅटस् गुड ! बराय् !"

डॉक्टर आणि नर्स निघून गेले.

शंकर आणि शेवंती त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहू लागले. वॉर्डातून ते बाहेर पडल्या-वर दोघांनी एकमेकांकडे बघितले आणि कारण नसताना एकमेकांच्या नजरा टाळून खाली बघू लागले. मग आपोआपच दोघांच्याही नजरा दर-वाज्याकडे गेल्या. परंतु दरवाज्यात कुणीच नसल्याचे पाहून शंकर–शेवंती पुन्हा निराश झाले. पडल्या आवाजात शंकर म्हणाला–

"आज येत नाई वाट्टे रफीक् ?"

"येतीन !" शेवंती उठली. तिने इकडे तिकडे शोधक नजरेने बघितले. मग ती अस्वस्थ होऊन म्हणाली–

"मी पायतो इथून बरतूनच. रस्त्यावरून कोनी आलं तं नेमचंच दिस्ते."

" पाय वरं." शंकर घाईस आल्यासारखा म्हणाला.

ती पुन्हा 'कॉरिडॉर'मध्ये आली. कठडचाला टेकून ती रस्त्यावर शोधक नजरेने बघू लागली.

तिला एकाएकी रडण्याचा आवाज ऐकू आला. तिने बघितले. इमारती लगत कोपऱ्यात दहा पधरा माणसांची गर्दी होती. एक टॅक्सी जवळच उभी होती. दोघा जणांनी कापडात गुंडाळलेले माणसाचे बोचके त्या गाडीत ठेवले. आणि थोडचा वेळातच ती टॅक्सी सरकली. तसा रडण्याचा आवाज अधिकच वाढला. एक मध्यमवयीन स्त्री ऊर बडवीत होती आणि दोन छोटी मुले तिला बिलगून रडू लागली होती.

धीरे धीरे गर्दी पांगू लागली.

ते सारे पाहून शेवंतीला आपल्या अंगातली शक्ती पायातून निघून जात आहे असे वाटले. तिने आपले तोंड फिरविले आणि ती शंकरच्या खाटेजवळ येऊन बसली. शंकरला एकटक न्याहाळू लागली तसे शंकरने तिला विचारले--

"काय झालं ? काहून पायतं अशी ?"

तिने डोळ्याला पदर लावला.

"रडू नोको ! रडू नोको शेवंते !" शंकरलाही हृदय भरून आल्यासारखे झाले. त्याने आपल्या शर्टच्या समोरच्या भागाने डोळे पुसले. हसण्याचा प्रयत्न करून तो म्हणाला--

"रडतं काहून ? मी मरतो थोडी काई ?"

तिने शंकरच्या तोंडावर आपला हात दावला आणि ती पुन्हा रडू लागली. अगदी गदगदून !

७

दुसऱ्या दिवशी पाच वाजता रफीक् शंकरला भेटायला आला. शंकर पलंगाला टेकून बसला होता आणि शेवंती फरशीवर बसली होती. गुडघ्यात मान घालून.

रफीक् आल्याचे बघून तिने मान वर केली आणि आपले डोळे पुसले. शेवंती रडत होती हे बघून रफीक्ला गलबलून आले. तशाही स्थितीत शंकर हसून म्हणाला--

"रफीक् मैंने गये जलम में कौनसा पाप किया था की मुझे ये जलम में भुगतना पड रहा ?"

रफीक् काही बोलला नाही. मग एकदम अंगात संचारल्यासारखा म्हणाला--"शंकर, मैं शादी बाद में करूंगा। मैं लिखके भेज देता हूं आजही. तेरे बिमारीका इलाज पहिले करूंगा, बाद में मेरी शादी होंगी।"

"पागल मत बन रफीक्। आठ-दस दिनका ही सवाल है। अगले शनिचर--इतवार तक तू बंबईसे वापस लौट आयेगाही। तेरे शादीके बादही जो कुछ सोचना है सोचेंगे। क्या ? अब तू ओ विचार दिमाग से बिल्कूल निकाल डाल और बडी खुशीसे शादीकू जा।"

"खूशीसे ?" रफीक्ने तळमळून विचारले.

"हां, खूशीसेही। खुशीही है। शादीकी खूशी कुछ और रहती है ? समझा ? जो मुझे हो रही है !"

"शंकर, शंकर, मुझे नही खुशी इस शादीकी ! तेरे बिमारीके आगे मुझे कुछ नही सूझ रहा ! तू अच्छा हो जा... फिर मेरेकू खूषी होंगी !"

"पगला है तू, रफीक् सचमुच पगला है तू! शादीके मौके बारबार नहीं आते पगले ! ऐसा मत कर, शादीको टालना अच्छी बात नहीं !"

"अच्छी हो या बुरी. मुझे तेरी बिमारी पैले देखना है, तेरेकू नहीं मालूम।" 'शंकर हसला. हसतहसत म्हणाला--

"मेरेकू सब मालूम हो गया है रफीक्, सब सब मालूम हो गया है !"

"क्या मालूम हो गया है ?" रफीक्ने मोठ्या आश्चर्याने विचारले. शंकरने क्षणभर शून्यात बघितले. मग तो हसला. म्हणाला--

"मेरेकू कॅन्सर हो गया है ! कॅन्सर बोलेतो 'कॅन्सल् !' मैं 'कॅन्सल्' हो गया हूं ! मगर मैं तेरे शादीके बादही मरुंगा, पहिले नहीं ! चाहे तू दो साल बाद शादी कर !"

रफीक्ला, हे सारे सांगत असलेल्या शंकरला बघून आपण पागल होतो की काय असे वाटू लागले. हसणाऱ्या शंकरकडे बघण्याचे देखील त्याला धैर्य झाले नाही. तो कुठे तरी बघत म्हणाला--

"शंकर, मैं तेरेकू बंबई ले जाऊंगा, इलाज के लिये ! सिव्हील सर्जन साहाबसे मैं कल मिला था, उन्होनेही बताया बंबई ले जाना पडेगा करके ! तू बिल्कूल फिकर मत कर शंकर--" रफीक्चा रडका स्वर ऐकून शंकर म्हणाला--

"फिकर तो तू खुदही कर रहा ! मेरी बात मान. कॅन्सरका बिमार इतने जल्दी मरता नहीं ! तू बंबई जा, शादी करके आ ! शादीसे आनेके बाद अपन सोचेंगे ! इलाजके लिये बंबईभी जायेंगे, समझा ?"'

रफीक् काही बोलला नाही. नुसता खाली मान घालून बसला.

शंकरला राहावले नाही. त्याने विचारले--

"बोलता क्यों नही ?"

"बोलता ना !"

"मेरे तरफ देखके बोल !"

रफीक्ने शंकरकडे बघितले. त्याच्या डोळ्यांत आसू होते. रफीक्च्या डोळ्यांत अश्रू बघून शंकरला गलबलून आले. म्हणाला–

"ऐसे खुषीके मौकेपर रोया नही करते रफीक् ? तू बडा समझदार है ! रो मत रफीक्, रो मत ! मैं इतने जल्दी मर रहा क्या ? तू शादीकू जा, मैं–मैं नही आ सकता, इस बातका मुझे भोत दुख है रफीक् ! मैं बिमारभी नही होता, तोभी नही आ सकता था... मैं लंगडा हूं लेकीन मैं–मैं रफीक् तेरे साथ हूं–ऐसा समझ और जा–"

रफीक्ने डोळे पुसले. त्याने खिशातून एक पत्रिका काढली आणि ती शंकरला दिली. म्हणाला-

"मेरे शादीकी पत्रिका !"

शंकरने ती आमंत्रण पत्रिका हाती घेतली व तो त्या पत्रिकेकडे डोळे भरून बघू लागला.

त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले !

८

सोमवारी सकाळीच शंकरला भेटून मग इतर कामाला लागावे अशी रफीकची इच्छा होती परंतु कामे अशी निघत गेली केली की रफिकला एका क्षणाचीही उसंत मिळाली नाही. घरी आलेले पाहुणे– त्यांची सरबराई, त्यांना हवे नको ते विचारणे यासाठी हॉटेलातला एक नोकर सतत घरी ठेवूनही रफीकला जातीने विचारपूस करणे शिष्टाचाराला धरून होते. आणि शंकरच्या वाढत्या आजाराने रफीकवर बराच ताण पडल्यामुळे तो लहानसहान गोष्टीही विसरू लागला. विचारा-विचारांत तो एकच गोष्ट सतरांदा विचारू लागला आणि पाहुणे काही बोलू-सांगू लागले की नुसते "ऐसा ?" "अच्छा !" या जुजबी अभिप्राया-शिवाय तो काहीच बोलत नसल्याचे बघून पाहुण्यां-नादेखील ते खटकू लागले. म्हातारीकडून जेव्हा त्या गोष्टीचा खुलासा झाला तेव्हा पाहुणे हळहळले.

शंकरच्या भेटीला म्हातारीला एका नोकरा-सोबत पाठवून रफीक् महत्त्वाच्या खरेदीत गुंतला. खरेदी आटोपल्यावर त्याला एकाएकी आठवण झाली. त्याने आटोपते घेतले आणि तार ऑफिसात जाऊन त्याने शंकरच्या सासऱ्याला तार केली तेव्हा दुपारचे साडेचार वाजले होते. पाचला सिव्हिल-सर्जननी त्याला भेटायला सांगितले होते. घाईघाईने रफीक् दवाखान्याकडे निघाला. सिव्हील सर्जनच्या कार्यालयापाशी आला तेव्हा कार्यालय बंद असल्याचे बघून त्याने तेथील कर्मचाऱ्याजवळ चौकशी केली. त्याला कळले की डॉक्टर काही महत्त्वाच्या कामानिमित्त नागपूरास गेले आहेत आणि ते कदाचित् उद्या रात्रीपर्यंत परततील. तो शंकरकडे आला. शंकर उशाशी टेकून बसला होता आणि बसल्या बसल्या तो धानाच्या लाह्या खात होता. रफीक्ला बघून तो खूप आनंदीत झाला.

"आ रफीक् मैं सबेरेसे तेरी राह देख रहा हूं।"

"भाभी कहा है ?"

"गिरजाभाभी और सदाशिराव आये थे उसके साथ फाटक तक गयी होंगी। सबेरे बच्चू-भाई आये थे। ये मोसंबी और अंगूर लाये है मेरे लिये ! तू थोडे अंगूर खाना–"

"नहीं, तू खाले ! तेरेकू अब कैसा मालूम होता है ? तबियत कैसी है ?"

"अच्छा हूं ! सबेरे सिव्हील सर्जन साहाबने पूरी जाँच किया मेरी।"

"क्या बोले ?" रफीक्ने उत्सुकतेने आणि काळजीने विचारले.

"घबरानेकी कोई बात नहीं बोले ! पेट में एक गोला है उसका ऑप्रेशन करना पडेगा ऐसा कह रहे थे। ऑप्रेशन में डॉक्टर भोत हुशार है और एक बडे डॉक्टर करके उन्हे सब पहचानते ! सब झन बोलते की डॉक्टर के हाथ को यश है ! डॉक्टर खुद बोले की जरुरत पडी तो ओ खुदही ऑप्रेशन करेंगे । मेरी तो सारी घबराहट दूर हो गयी रफीक्। मैं अब खुप हूं। मुझे अब कोई चिंता नहीं। तू शादी बनाके आजा. बाद में मेरा ऑप्रेशन भी हो जायेंगा. क्या ?"

शंकरला खुश बघून रफीक् उल्हसित झाला. त्यावर तो नुसता गालातल्या गालात हसला. त्याच्या मनावरले दडपण एकदम कमी झाल्या-सारखे त्याला वाटू लागले. मन मोरपीसासारखे हलकेहलके झाले आहे असे त्याला वाटले.

"ऑप्रेशन मैं आनेके बादमेंही करेंगे शंकर,

क्या ?"

"हां।"

"मैं अभी वडे डॉक्टर को मिलने गया था तो मालूम हुआ ओ नागपूर गये करके !"

"हां, ओ दुपेरकोही नागपूर चले गये। एक वहुत वडा ऑप्रेशन करना था इसलिये !"

"ऐसा ?"

"हां."

शेवंती लगवगीने आता आली. तिने रफीक्‌ला विचारले—

"कवा आले वापूजी ?"

"आत्ताच आलो !"

"माझ्या वडलाले तार केली काय ?"

"हौ ! तार करूनच इकडे आलो !"

शेवंती खूप उल्हसित वाटू लागली. तिची प्रत्येक हालचाल त्याची साक्ष होती.

"भाभी, शंकरके तरफ ख्याल देना. कल तक तुम्हारे पिताजी भी आयेंगे. अव वैसी मेरेकू कोई चिंता नहीं, फिरभी दिल मानता नहीं."

"काई कायजी करू नोका वाप्पूजी तुमी, काई होत नाई !"

शंकर मग रफीक्‌ला म्हणाला—

"अपने शादीसे लौटेंगा तो मेरे लिये लड्डू लाना।"

"हां, जरूर लाऊंगा। और वंवईसे तेरे लिये क्या लावुं ?"

"वहू !"

"ओ तो लावूंगाही ! और क्या लावू वोल ?"

"वोलूं ?"

"वोल !"

"रसगुल्ले और मिरची फाफडा लेके आना. वडी इच्छा हो रही खानेकी !"

"ओ तो यहासे भी ला सकते। कल लावूंगा." आणि विचार करून तो म्हणाला. "मगर ये सव खानेको कोई हर्ज नहीं ना ?"

"हर्ज काये की ? कुछ परेज थोडीही है ? अच्छा अच्छा खाये तो तवियत तंदुरुस्त होंगी. नहीं ?"

"हां।"

"अव तू जा. माँ आई थी. भोत देर तके बैठी. मेरेकू देखके रो रही थी वैचारी. मैंने समझाया. वुढ्ढी—अव भोत थक गई रफीक् !"

रफीक् हसन म्हणाला—

"इसलिये तो शादी कर रहा हूं। और तू भी वारवार खोसता था, वुढ्ढी थक गई, उसके लिये वहू ला करके ..."

"हाँ...सच् है !"

"अच्छा मैं चलता शंकर, भाभी, मैं चलता, क्या ?"

"हौ !"

रफीक् हॉस्पिटलवाहेर पडला. त्याला डोक्यावरले आकाशाएवढे ओझे उतरल्यासारखे वाटले. तो शिळ वाजवीत चालू लागला. कारण नसतांना मनातल्या मनात हसू लागला.

९

दुसऱ्या दिवशी सायंकाळी सहापर्यंत सामानाची बांधबुंध पुरली. आठवून आठवून प्रत्येक वस्तु घेतली आहे किंवा नाही याची रफीक्‌ने खात्री करून घेतली. घरात मुलांचा आणि स्त्रियांचा नुसता गोंगाट सुरू होता. रफीक्‌ने सोवत घ्यायचे सर्व सामान व्यवस्थित बांधून लावून ठेवले आणि तो रिक्षा करून आपल्या हॉटेलात आला. घाईघाईने कादरला म्हणाला—

"कादर, एक वर्तन में थोडेसे रसगुल्ले और कागज में मिरची फाफडा वांध दे जल्दी।"

"हां ! अस्पताल में जा रहे क्या ?"

"हां, जल्दी दे दे !"

"अभी देता हूं !" कादरने एका डब्यात रसगुल्ले आणि कागदात मिरची-फाफडा बांधून दिला. ते सामान हाती घेतच रफीक्‌ने त्याला विचारले—"आज का गल्ला कितना है ?"

"सौ ऐक रुपये होंगे !"

"दे भला !"

कादरने गल्ल्यांतून दहा दहा व पाच पाचच्या नोटा मोजून दिल्या.

"एकसौ दस है. और कुछ चिल्हर होगी."

"ओ रहने दे."

"अच्छा !"

रफीक्‌ने ते पैसे खिशात कोंवले व एक रिक्षा करून तो तडक हॉस्पिटलमध्ये आला.

रिक्षातून तो उतरला व झप्‌झप् चालू लागला. शंकरजवळ आला तेव्हा शंकरच्या चेहऱ्यात त्याला किंचित् का-होईना, पण फरक जाणवला. आजारी असूनही तो उल्हसित दिसू लागला. चेहऱ्यावर एक प्रकारचा टवटवीतपणा दिसू लागला. शेवंतीही खुशीत दिसू लागली. न विचारताच ती म्हणाली–

"माझे वडील आलेत आज दुपारी."

"अच्छा हुआ। कहाँ गये ओ ?"

"बाहर गये मोसंबी लानेकू !" शंकरने सांगितले.

"ये देख तेरे लिये मैंने क्या लाया ?"

"रसगुल्ले होंगे ?"

"हां।"

"ला यार। बडे खुशीकी बात है ! आज मैं भोत खुश हूं रफीक्।"

रफीक्चा चेहरा उजळला. हसूनच तो म्हणाला–

"ये तो बडी अच्छी बात है !"

"हां, अब मैं भोत जल्दी अच्छा हो जाऊंगा रफीक्। तू आनेके बाद में ऑप्रेशन हो गया की दोएक महिने में मैं अच्छा हो जाऊंगा, फिर मैं पानका ठेला चलावूंगा, तेरे होटलकेही बाजू में ! तूने पानका ठेला बनानेकू डाला है ना ?"

"हां।"

"फिर अपन पैले जैसे एक साथ रहेंगे. जब अपन रिक्षा चलाते थे तब रोज एक दुसरे को मिलते थे. अब भी वैसाही होंगा ! रोजाना मुलाकाते होंगी–रोजाना अपनी बाते होंगी–"

"और रोजाना झगडा भी।"

दोघेही मनमोकळेपणाने हसले. शेवंतीलाही हसू आले.

"मुझे भोत खुशी हो रही शंकर. तू अच्छा हो जायेंगा. अपना होटल और पानका ठेला रहेंगा...मस्त मजा आयेगी, नहीं भाभी ?"

"हो." शेवंती हुरळून म्हणाली.

रफीक् थोडा वेळ थांबला, म्हणाला–

"शंकर, रसगुल्ले खाना ?"

"हां...ला यार।"

रफीक्ने शंकरला रसगुल्ल्याचे भांडे दिले. त्याने त्यातला एक रसगुल्ला तोंडात टाकला. तो खावून शंकर म्हणाला–

"तू भी खाना !"

"मेरेकू मत पूछ, भाभीको पूछ, क्यों भाभी, मिरची–फाफडा खायेंगी ना ?"

"हेत् माय्, हे काय बाप्पूजी ?" आणि शेवंती लाजून खूप चूर झाली. शंकरने आश्चर्याने विचारले–

"क्यों, क्या बात है रफीक् ?"

रफीक् हसला. त्याने हसतच शेवंतीला विचारले–

"बता दूं भाभी ?"

"मले नोका इचारू." ती लटक्या रागाने म्हणाली.

"आखिर बात क्या है, रफीक्, कुछ बोलेगा भी ?"

"बात बडे खुशीकी है शंकर, भाभीने कुछभी बताया नहीं क्या ?"

"नहीं तो !"

"तू फिरसे बाप बननेवाला है !"

शंकरच्या तोंडातला रसगुल्ला तोंडात फिरू लागला. तो इतका आनंदीत झाला की त्यावर काय बोलावे हेच कळले नाही. तो वेड्यागत नुसता पाहू लागला. शेवंतीकडे ! ती पुन्हा लाजली तसा तो तिला म्हणाला–" पन् तुह्या मले आता-पावतर सांगतलं नाई ?"

"काय सांगू ? मी आपल्याच घोरात..."

"मैं भोत खुश हो गया रफीक् ! अब मेरा कोई दुख दर्द नहीं रहा !"

शंकरचा चेहरा असीम समाधानाने उजळला.

थोडा वेळ तिघेही काही बोलले नाहीत.

बऱ्याच वेळाने शंकरने विचारले–

"कब जा रहे बंबई ?"

"आज रातको एक बजे !"

"अब मुलाकात ?"

"शनिचरको !"

आणखी काही वेळ दोघे एकमेकांशी बोलले नाहीत.

"अच्छा, तू जा अब, भोत देर हो गयी ! सब झन् रहा देखते होंगे !"

रफीक् उठला नाही.

त्याला तसाच बसलेला बघून शंकरने विचारले–

"क्यों, क्या बात है ?"

"कुछ नहीं. मेरा यहा से जानेका दिलही नहीं होता शंकर ! मेरा दिल जैसा बैठा जा रहा है। क्यों कजीने तेरेकू छोडनेकू दिलही नहीं मानता !" आणि तो डबडबल्या डोळ्याने शंकरकडे पाहू लागला. त्याच्या डोळ्यातली आसवे गालावर ओघळलीत ती न पुसता तो शंकरकडे बघू लागला.

"तू पागल हो गया रफीक्, सचमूच तू पागल हो गया. क्यों बच्चे जैसी बाते करता ? शादीकी पूरी तैयारी हो गई और बोल रहा की जानेका दिल नहीं हो रहा ? बारे आदमी ?"

रफीक्ने डोळे पुसले. तो शंकरजवळ बसला आणि त्याला मिठीत घेऊन म्हणाला–" चलता मैं शंकर ! तेरी दुवा होना !"

रफीक्ला थोपटून शंकर म्हणाला–

"सच्ची तू बच्चा है रफीक् ! सिर्फ बच्चाही नहीं भोत बडा भी, मेरे से भी ! मेरी दुवाएँ है !"

रफीक्ला एकदम दाटून आले. तो गदगदून म्हणाला–

"अपना ख्याल रख !"

शंकरच्या डोळ्यात अश्रु आले ते त्याने पुसले. पुन्हा थोपटून तो म्हणाला–" जा अब तू !"

"हां !" तो शंकरच्या जवळून उठला. त्याने खिशातून नोटा काढल्या व शेवंतीजवळ देऊन तो म्हणाला–

"भाभी, ये खर्चे के लिय रख !"

"पैसे हायेत् बापूजी, तुमी कायजी नोका करू पैशाची !"

"भाभी, फिरभी रखलो !" त्याने त्या नोटा शेवंतीच्या हातात कोंबल्या. मग तो शंकरच्या पाया पडला.

"ये क्या लगाया रफीक् ?"

"कुछ नहीं !" नंतर तो शेवंतीला– म्हणाला–" भाभी, पैर पडने दे !"

"हे काय लावलं बाप्पूजी ? पाया पडत अस्तेत् काय ?"

"लग्नाले जाताना मोठ्या मानसायच्या पाया पडत अस्तेत भाभी !"

त्याने तिच्या पायांना हात लावला. मग शंकरचे दोन्ही हात हातात घेऊन तो म्हणाला–

"अच्छा शंकर चलता मैं !"

"अच्छा !"

"चलतो भाभी !"

"बरं !"

रफीक्ने शंकर–शेवंतीकडे बघितले आणि तो निघाला.

१०

रफीक् मुंबईला गेला त्याच्या दुसऱ्या दिवसापासून शंकरच्या पोटात एकाएकी वेदना होऊ लागल्या. प्रथम प्रथम तितकासा त्रास झाला झाला नाही. परंतु दुपारी बारा नंतर तो त्रास सतत वाढू लागला. शंकरने त्या वेदना साऱ्या शक्ती एकवटून सहन केल्या. परंतु दुखणे खूपच असह्य झाले. त्या जिवघेण्या वेदनामुळे आपले

संपूर्ण शरीर फाटून जाते की काय असे त्याला वाटू लागले. शेवंतीकडून शंकरच्या त्या वेदना बघवत नव्हत्या. ती धावपळ करू लागली. तिच्या डोळ्यात पाणी आले. तिच्या वडिलांनी तिला धीर दिला. ते म्हणाले–

"घाबरू नोको. तू थांव शंकररावजवळ. मी येतो डॉक्टरले सांगून." आणि तिचे वडील डॉक्टरांना सांगायला निघून गेले.

पंधरा वीस मिनिटांनी सिव्हिल सर्जन दोन तीन डॉक्टर्स बरोबर आलेत. सोबत नर्सेसही होत्या. डॉक्टरांना बघून शंकर केविलवाणा विव्हळला–

"डॉक्टरसाहेब, डॉक्टरसाहेब-" पुढे त्याच्याने बोलवले नाही. मोठ्या डॉक्टरांनी त्याला थोपटले. धीर देत ते म्हणाले–

"घाबरू नका. मी इलाज करतो."

मोठ्या डॉक्टरांनी त्याला तपासले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या एका डॉक्टराने शंकरला एक इंजेक्शन दिले. मोठे डॉक्टर शंकरला म्हणाले–

"उद्या सकाळी ऑपरेशन करावे लागेल ! आता थोडा आराम पडेल. घाबरू नका. सारे व्यवस्थित होईल !"

सर्वजण निघून गेले.

शंकरच्या वेदना धीरेधीरे कमी झाल्या. तो ग्लानी आल्यामुळे निपचित पडून राहिला.

त्या दिवसभऱ्यात त्याच्या प्रकृतीकडे विशेष लक्ष देण्यात आले. वेळच्या वेळी तापाची नोंद–कॅप्सूलस् आणि सूचना–विचारणा सुरू झाली. दुखण्याचा त्रास कमी जास्त होऊ लागला. तसा शंकर दिवसभर अतिशय अस्वस्थ झाला होता. दुखण्याने वैतागून गेला होता आणि डोळ्यात नाना विचारांनी थैमान मांडले होते. रात्रभर त्याच्या डोळ्याला डोळा नव्हता. सकाळी चार वाजताच एक डॉक्टर व एक नर्स आली. त्यांनी त्याला पुन्हा तपासले. वेदनांबद्दल विचारले व नंतर एक इंजेक्शन देऊन निघून गेले. सकाळी सहा वाजता शंकरला स्ट्रेचरवरून ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. शेवंती व तिचे वडील त्याच्या मागोमाग गेले.

शंकरला आत नेले. शेवंती व तिचे वडील थिएटरपाशी थांबले. शेवंतीच्या अंगातली शक्तीच नाष्ट झाली. ती मटकन् खाली बसली. आणि गाडघ्यात मान घालून हुमसू लागली. तिच्या वडिलांनी तिला समजावले. तिच्या पाठीवरून हात फिरविला.

बऱ्याच वेळानंतर एक डॉक्टर व एक नर्स आली. ती नर्स शेवंतीला म्हणाली–

"तुम्ही शंकररावच्या पत्नी आहात ना ?"

"हो !"

"यावर सही करा !"

"कायच्यावर सही करा लागते ?"

"या कागदावर ! ऑपरेशन करण्यापूर्वी असं लिहून घेत असतात !" डॉक्टर तिला सांगू लागले.

शेवंतीने त्या कागदावर सही केली. डॉक्टर व नर्स निघून गेले.

सात वाजता सिव्हील सर्जन आपल्या ताफ्यासह ऑपरेशन थिएटरमध्ये आले. दरवाजा बंद करण्यात आला.

शेवंती रडू लागली. स्फुंदून म्हणाली–

"कसं झालं हो बाबाऽऽऽ"

"काई होत नाई बेटा. अशी घबराऊ नोको ! सर्व ठीक होईल. त्या गजाननबाबाची कृपा हाये शंकररावांवर ! बेटा लडू नोको !" आणि तिचे वडील स्वत:शीच पुटपुटून म्हणाले, "शेगाच्या बाबा, शंकररावले आराम पडू दे ! माह्या शेवंतीचं कुंकू शाबूत राहू दे गजाननबाबा !"

दोन तासानंतर ऑपरेशन आटोपले. शंकरला एका ढकलगाडीवरून थिएटरच्या बाहेर आणले व जवळच्या वॉर्डातल्या एका पलंगावर त्याला नीट ठेवण्यात आले. दोन डॉक्टर्स बोलत आले. एक दुसऱ्याला म्हणाला–

"सो रिस्की ! परंतु निभावलं ! थँक्स् गॉड !"

दुसरा शेवंती व तिच्या वडिलांजवळ आला. म्हणाला–

"ऑपरेशन चांगलं झालं आहे. घाबरण्याचं काही कारण नाही. शंकरराव आता या वॉर्डातच राहातील !"

शेवंतीचा चेहरा उजळून निघाला. तिने मनातल्या मनात गजानन महाराजांना दर्शनाला येण्याचे कबूल केले.

तिच्या वडिलांनी पूर्वीच्या जागेवरील आपले सर्व सामान खाली आणले.

शंकर ग्लानीतच होता. त्याच्या अंगावर

लाल ब्लँकेट टाकलेले होते.

शेवंती खाली फरशीवर बसली होती. तिच्या वडिलांनी आणलेले सामान शेवंतीने काही कपाटात व काही कपाटाच्यावर ठेवले.

डॉक्टर निघून गेले होते. वॉर्डात एक नर्स होती. ती त्या वॉर्डातल्या मोजक्याच पेशंटस्‌कडे काळजीने बघत होती.

दिवसभर शंकर ग्लानीतच होता. मधूनच एखादा हुंकार देत होता. त्याची कुठलीच हालचाल नव्हती. तो निश्चेष्ट पडला होता. परंतु शेवंती एकटक त्याच्याकडे बघत बसली होती.

संध्याकाळी साडे सातला त्याने थोडी हालचाल केली. डोळे किलकिले करून त्याने इकडेतिकडे बघितले. शेवंतीला बघून त्याचा चेहरा किंचित् हसरा झाला. परंतु पुन्हा डोळे मिटून तो पडून राहिला. शेवंतीने त्याला काही विचारले परंतु शंकरने त्यावर काहीच उत्तर दिले नाही. तो काहीच बोलू शकला नाही.

रात्री दहाला ड्यूटीवर असलेल्या नर्सने रिलीव्ह करायला आलेल्या नर्सला साऱ्या पेशंटस्‌बद्दल समजावून सांगितले. शंकरबद्दल तिने ड्यूटीवर आलेल्या नर्सला सांगितले—

"या पेशंटचे ऑपरेशन झाले आहे सकाळी! अद्याप पूर्ण शुद्धीवर आला नाही पेशंट! शुद्धीवर आला की डॉक्टरांना तसं कळव! डॉक्टर गोडबोले ड्यूटीवर आहेत! काय?"

"बरं!"

"मी चलते!"

"ठीक आहे!"

ती नर्स निघून गेली.

रात्री अकरा-साडेअकराच्या दरम्यान शंकरने हुंकार द्यायला सुरुवात केली. शेवंती त्याच्याजवळ बसून त्याच्या डोक्यावरून हात फिरवू लागली. थोड्यावेळातच शंकरने डोळे उघडून तिच्याकडे बघितले.

"आता कसं वाट्टे तुमाले?" शेवंतीने विचारले.

त्याने हसण्याचा प्रयत्न केला. क्षीण आवाजात तो एक एक शब्द उच्चारू लागला—

"र—फी—क् आ—ला का—य?"

"नाई!"

शंकरने एकटक तिच्याकडे बघितले आणि त्याचे डोळे झर्‌झर् झरू लागले. शेवंतीने त्याचे आसू पुसले, म्हणाली—

"लडू नोका. आता चांगले दुरुस्त व्हाल तुमी! आप्रेशन चांगलं झालं! काई कायजी करू नोका!"

शेवंतीचे वडील धीर देत म्हणाले—

"बुवा काई कायची करू नोका! गजानन बाबाची कृपा हाये!"

शंकरने हलकेच दोन्ही हात जुळवले व डोळे मिटून नमस्कार केला. मग थोड्यावेळाने त्याने पुन्हा डोळे उघडले व शेवंतीला तो म्हणाला—

"आपल्याले बाबू होनार हाये ना?"

"हौ!" शेवंती त्याच्या केसावरून हात फिरवीत म्हणाली.

"त्याचं नाव गजानन ठेवजो!"

"हौ! तुमी झोपून राहा! भलतेसलते इचार नोका करू!"

"हौ! मी झोपून जातो. रफीक् राती येनार हाये...तो आल्यावर मले उठोजो!"

शंकरचे किंचित् विसंगत बोलणे ऐकून शेवंतीला ढवळून आले. तिने पदराने आपले डोळे पुसले. ती म्हणाली—

"उगेमुगे झोपून राहा. जास्त बोलू नोका!"

"ना—ई. मी झो—पू—न जा—तो!"

एक एक शब्द उच्चारून त्याने डोळे मिटले.

नर्सने डॉक्टरांना बोलावून आणले. त्यांनी शंकरला तपासले. नंतर नर्सला सूचना देऊन ते निघून गेले.

नर्सने शंकरला औषधी दिली. नंतर ती म्हणाली—

"आता आराम करा!"

"हौ! मी आता झोपतो!" मग शेवंतीकडे बघून त्याने क्षीण आवाजात विचारले—

"रफीक् आला काय?"

"नाई!"

"थो आला म्हंजे मले उठोजो!"

"हौ!" ती त्याला थोपटू लागली, हलके हलके,

नर्स बुटांचा टाप् टाप् आवाज करीत कुठे तरी निघून गेली.

बाकीचे सारे पेशंटस् झोपी गेले होते. बसल्या बसल्या तिचे वडील पेंगू लागले. शेवंतीच्या डोळ्यांत झोप नव्हती. तिचे डोळे ताठरले होते. ती मान ताठ ठेवून जागत बसली होती. सारे वातावरण निःस्तब्ध व भयाण होते.

बऱ्याच वेळाने ती नर्स आली. तिने घड्याळात बघितले. रात्रीचा एक वाजला होता. तिने थर्मामिटर झटकले व ती शंकरच्या खाटेजवळ आली तशी शेवंती सावरून वसली.

नर्सने गोड हसून म्हटले– "किती वेळ जागत बसणार ?"

"झोपच येत नाई !"

"अस्सं ! शंकररावांचा ताप मोजून घेते !"

नर्सने थर्मामिटर शंकरच्या तोंडात ठेवताच शंकरचे डोके शक्ती नसल्यासारखे एकीकडे झुकले आणि त्याच्या तोंडात ठेवलेले थर्मामिटर खाली पडले. नर्स एकदम चरकली. तिने शंकरच्या गालांना स्पर्श केला आणि चटका बसावा तसा हात झटकला.

"माय गॉड ! डॉक्टर—" ती ओरडलीच आणि मग तडक वॉर्डबाहेर निघून गेली.

"काय झालं ?" शेवंतीच्या वडिलांना जाग येऊन त्यांनी विचारले. शेवंतीने शंकरला चाफलून बघितले.

शंकर शून्यात दृष्टी रोवून एकटक पहात होता...

थिजलेल्या नजरेने... दरवाज्याकडे !

□ □


लेखनसहाय्य हवे . . .

युगवाणीला दर्जेदार लेखनाची फार आवश्यकता आहे. एखादा जबरदस्त आशय तेवढयाच जबरदस्त अभिव्यक्तीने साकार का होऊ नये ?
आशय–अभिव्यक्तीचे नवे महत्त्वपूर्ण प्रयोग युगवाणीला हवे आहेत.
शिवाय ललितबंध, संशोधन, कला व सांस्कृतिक टिपणे यांनाही युगवाणीत स्थान आहे.
समांतर कथा–कवितांचीही उणीव का भासत आहे ? युगवाणीसाठी लिहावे.

–संपादक
युगवाणी, वि. सा. संघ, नागपूर

किशोर पाठक

एका रात्रीच्या बुबुळांमधले अर्थ



आदिम गर्भाच्या संजीवक स्पर्शाची
उदयोन्मुख हालचाल उदरात होतांना
ती बिथरली...
आणि दिशांचे हिरवे कळप मनावरून
घरंगळत गेले
रानात संथ अनिच्छेने सरकणाऱ्या गुरांच्या
पायांसारखे !

पाखरांचे पंख लखलखले, तशी पोटऱ्यांमधून
जिवंत फडफडीची कळादालनं उलगडत गेली
तिच्या आश्वासक हालचालींचे निरभ्र आकाश
अगोचर गुरगुरले एकांताच्या भूतकालीन
पारदर्शक आरशांवर
आणि फुटणाऱ्या काचांचा ध्वनी
मांसल गोळ्याच्या श्वासांमधून घुमत राहिला.

अशी पांखरांची जन्मखूण जपण्याची स्वप्ने
तिने कधीच कर्दळीच्या तळात गाडली होती
आणि सूर्यमान कांतीचे अनवड वस्त्र
मनस्वी पांघरून
ती अमोघ स्वप्नगंधेची वाटचाल करीत होती
कोणतेही जैविक सुख ओरबाडून मिळविण्याइतका
तिचा देह अनावर भुकेला नव्हता
किंवा अहेव लावळ्याची अखंड आग धुमसविणारी
स्पर्शाची अतृप्त वीज लवलवत नव्हती
ओटीपोटात.

केवळ दिशांचे चेहरे सकाळी दिसतात
म्हणून तांबड्या तोंडावर हसण्याइतकी ती
दुबळी नव्हती
किंवा पांढर सावळ्या पहाटेच्या विणलेल्या
कुसुंबी जाळ्यांमधून अडकलेल्या धुक्यांचे
अगणित सर ओलावून गुंफण्याचे अट्टाहासही तिने
मिरवले नव्हते.

डोळे रुंदावून स्वप्ने भरण्याची
अनैसर्गिक सवय जडवतांना पोटाच्या
परवलीची जागा
पाकळ्यांनी भरवायची नसते असे
संदेशही तिने हसतहसत उधळून लावले होते.

शब्दांना हळुवार टिचकी मारून
त्यांचे अर्थ सैल करण्याचे दिवस
तळहातावर रेघा मारूनच
आयुष्याने घडवायचे असतात
हे ती समजली तसे बोटांच्या फटींचे
सांकेतिक पोकळ अर्थ तिने ग्रहांवर वाटून दिले
ताऱ्यांची गुणगुण अखंड रात्रभर सतावणार
ह्याची चंदेरी जाणीव आभाळात जडावतांना
तिने चंद्राच्या दृश्यकोरीची कारणमीमांसा
रातकिडयांवर किरटया अक्षरात कोरली
आणि पानांमधून वारा बांधून घातला तशी
सळसळीची अनावर उबळ एका लयीत देहापासून
गदगदत राहिली.

पहारेकऱ्यांचे अणकुचीदार भाले शमीवर
परजत होते
कुणी काही म्हणो !
परंतु तिला उमजलेले एका रात्रीच्या
बुबुळामधले अर्थ
कुणा अनाहुतासाठीच पापण्यांआड बंद केले
आहेत हे
पापणीच्या दाट केसांनाही माहीत नव्हते.
सर्वच अनादी भावना अनैसर्गिक नसतात
अशा समजुतीचे आवंढ गिळतांना
अवघड शब्दांच्या होडयाही डगमगत
आत जात आहेत
हेही तिला कळले नाही.

आतून फुटलेला पहिला श्वास
रक्ताच्या थंड नदीला अगम्य प्रवाहित करतो
हुंकाराच्या बोचऱ्या लहरी निनादत राहतात
मनाच्या काठावर आयुष्य अनावर होऊन
आवळते
आणि देहाचे बांध फुटून सीमारेषा
गच्च तांबडया गुलालाने भरून जातात
तेव्हा तिच्या उदराला अशी पूर्वेची स्वप्ने पडतात.

कुठलेसे अनोळखी गहिवर तिच्याशी किलबिलतात
आणि पक्ष्यांची घरटी रानोमाळ बेवारशी
अनौरस होतात.

तिला कळले काही
उगाच अस्वस्थ... असेही
उद्धट कळांची दुखरी सई
घुमत राहिली कशी सांगून सवरून
दरी दरीतून... रस्त्यावस्तीतून !
कुठेही दिवा दिसला नाही
फक्त एकच अनाम धिंगाणा
तिच्या बेशुद्ध जाणिवांचे क्रौर्य क्रंदन !
बुबुळे बघतात ती एक क्रिया अहेतुपणी
स्वीकारण्याची
खरं तर फक्त असणेच ज्यांच्या हातात
अश्रयांची ती बदिवान धडपड.

मिटलेल्या कवाडांच्या आत अंधार
चविष्टच असतो
कसाही मिटक्या मारीत चावणारा
त्याला उजेडाची धार असावी म्हणजे
सणसणीत वेदना उराशी बांधून गप्पसण्ण
निपचित होता येते.
चितांचे अनुभव सजग होत जातात.

कसे न्हावेत हे पाहुण्यांचे सोहळे देठादेठातून
सर्वत्र उखडलेली माती ! अस्ताव्यस्त आभाळ
आणि गिळगिळीत स्पर्शांची दिशांध चेतना.

किती प्रयासाने उलगडतात काळोखाच्या पुड्या
कुणी अखंड रचली ही अंधाराची पाने
ह्या काळ्या लयीत अवघे तारूण्य भरून घ्यावे.

ती निपचित... सर्वंकष
आवर्त... प्रचंड ! पावसाच्या मुसळधार
अद्वातद्वा सरींमधून
झोडपून काढलेली स्वस्थ काळी कातडी
अंधारावर उमटलेली अस्फुटशी आरोळी
अनंग आत्म्याची.

म्हणजे हे सारे अवकाशी विस्मरण
की अवसानातून निर्मिलेले भाग्यवंताचे सरण
तिने कुणाचे बाहुले उराशी पकडावे.
जिवंत कुळाची शपथ घ्यायला तिला पदर नाही
अवघ्या शक्तिमान कारुण्याची कात टाकून
तिने तरुण होण्याचे दान स्वीकारावे.
नाहीतर दिशांचे बोचकारे अनंत सोशीत
शरीरात गोठलेल्या रक्तांचे किल्ले बांधावेत
रखवालदारांनीच भिंती फोडून गुदमरून टाकावा
स्वच्छ पिवळा प्रकाश
तसे स्वातंत्र्यही कोठडीच्या गजांवर घट्ट चिकटून
बसलेले असते.

तिने अवघड होत राहण्याचे डोहाळे
रस्त्यांवर शिंपून टाकले
आता फिक्या प्रकाशावर रात्रीचे डागही
पडणार नाहीत
कोणतेही ऐहिक दर्शन स्वच्छ काचेसारखे
आरपार घुसून जाईल
तिला कातडीचे आरसे हवे आहेत
आणि ओरडण्यासाठी मस्तवाल गळा.

डोळ्यात हिरवे ओले गिळगिळीत शेवाळ साचले
म्हणजे ओठांवरून लिंगाची लाळ टपकते
असे कसेही आयुष्य पुकारतच नाही तर
ही जात केवढी सार्वभौम ठरते
तिचे जागरूक लक्षण आवश्यकतेच्या पल्याड
पोहोचल्यावर निरतिशयाच्या एकांताशी
अडखळणारच !

आता खडकांचीही फुले होतात हा युक्तिवाद
तिला मान्य आहे.
बगळ्यांचे डोळे गहिवरून येतात तिचे
अवयवांचे अवघडणे अशक्य नसते
तसे अतर्क्यही !

पाहुण्यांचे पाय ओसरीवर येण्यापूर्वीच
तिने प्रकाशाच्या सायंकालीन तिरीपी
छाटून टाकल्या आहेत.
दिवा मालवणारच नाही असे नाही.
तरीही अंधारात अडखळणाऱ्यांचे आवाज
अलीकडे तिला खूप आवडू लागलेत
अस्वस्थ आकाशाची आसक्ती अनावरलीय
उदरातून
एकेक श्वासाचा तांबडा गर्द गुलमोहर होतो
घराच्या भिंती हुंदक्यांनी सारवल्यावर
टाहोंच्या उकळ्या फुटत राहतात
आयुष्य नावाचा फोड जपताजपता
भिंती धूसर होतात.

ती उगाचच दार उघडते
खोळंबलेला प्रकाश बाहेर ओतीत राहते.

□ □

ना. वा. ठेंगडी

गाईड

तरुण वयात असलं काही ऐकलं की, कशी हुरहूर लागून जाते. राजा कसा कर्तव्यदक्ष होता, हे सांगण्यासाठी, खरं म्हणजे, गाईडनं ते ठिकाण आम्हाला दाखवलं. एक उथळसा वर्तुळाकार खड्डा. त्या खड्डयात उभं राहून टाळी वाजविली की, तिचा प्रतिध्वनी नेमका राजाच्या शयनगृहात उमटायचा. हा एक वास्तुशास्त्राचा चमत्कार होता. ती खड्डयातली जागा आणि राजाचं शयनगृह यांना जोडणारं कोणतंही दृश्यसाधन नव्हतं. खड्डयात उभं राहून टाळी वाजविली की, हवेची जी स्पंदनं निर्माण होतं, ती स्वीकारण्याची कुठली तरी व्यवस्था राजाच्या शयनगृहात केली होती. रात्री–अपरात्री एखादा प्रजाजन एखादी तक्रार घेऊन आला, तर झोपेतल्या राजाला उठवून त्याला ती सांगता यावी म्हणून ही खास यंत्रणा. म्हणजे प्रत्यक्ष राजमहालापासून दूर उभं राहूनच राजाला उठवता येत असे.

गाईडनं हे सारं सांगितलं. तो उथळसा खड्डा अजूनही आहे. त्या खड्डयात एकेकाला उभं करून गाईडनं प्रत्येकाला टाळी वाजवायला लावली अन् त्या स्पंदनांचा अनुभव दिला. खड्डा होता, पण राजमहाल उस्कटलेला होता. पडलेल्या भिंती, तरीही दुरून खोल्यांचा अंदाज घेता येत होता. राजमहाल म्हणजे अशी मोकळ्या हवेतली मोठी वास्तू नव्हती. एका किल्ल्याच्या मोठ्या परिघात बंदिस्त अशी ती छोटी वास्तू होती. मुसलमान राजाचा किल्ला अन् त्याचाच तो राजमहाल.

मुसलमान राजाच्या शृंगाराबद्दल आपल्या मनात किती रोमांचकारी कल्पना असतात ? राजा मुळातच विलासी वृत्तीचा. प्रत्यक्ष लढाईवर असताना देखील ज्याने आपल्या अल्पकाळ विश्रांतीच्या तंबूत शृंगार–विलासाची सारी साधने आणून ठेवलेली असतात, तो राजा लढाईपासून दूर असलेल्या या किल्ल्यातल्या महालात, एका मर्यादितलेच का होईना, पण रसरसलेले प्रणय-जीवन जगत असला पाहिजे. तो तरुण राजा रात्री आपल्या सुंदर बेगमबरोबर प्रणयाची नाना विलसिते आकंठ भोगत असताना मध्येच त्या शयनगृहात बाहेरच्या टाळीचा प्रतिध्वनी उमटावा...

तरुण वय असलं की, आपण राजाच्या कर्तव्यदक्षतेला अन् न्यायप्रियतेला तितकीशी दाद देत नाही. आपल्याला राग येतो, त्याच्या शृंगार-समाधीचा भंग करणाऱ्या त्या तक्रारखोराचा. राज-महालाच्या पडझड झालेल्या वास्तूत आपल्याला नकळत आपली नजर राजाच्या संभाव्य शयन-गृहाला शोधीत असते.

आपल्याला उगाचच हुरहूर लागून जाते. गाईड आपल्याला तेथून दुसरीकडे नेतो.

ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तू पाह-ण्याच्या साऱ्या प्रक्रियेचा प्राण असतो गाईड. त्याला ,त्या वास्तूविषयी परंपरेने जी माहिती मिळाली असते, तिच्याशी तो प्रामाणिक असतो. प्रत्यक्ष घडलेल्या घटना या माहितीशी कितपत सुसंगत किंवा विसंगत असतात, याची त्याला पर्वा नसते. तशी पर्वा आपणही करू नये. म्हणजे मग तो आपल्या नवरसात्मक वर्णनांनी त्या वास्तूत जसजसा प्राण भरत जातो, तसतशी आपल्या प्राणातली ऊब वाढत जाते.

गोवळकोंड्याच्या किल्ल्यात आम्ही फिरत होतो. गाईड शिरा ताणताणून तोंड फाटेपर्यंत एकेका प्रसंगाचं वर्णन करीत चालला होता. नुकताच 'गोवलकुंडा का कैदी' नावाचा हिंदी चित्रपट गाजून गेला होता. त्याच्या शूटिंगचा बराचसा भाग या किल्ल्यात पार पडलेला. दूरच्या एका जागेकडे बोट दाखवून गाईड म्हणाला, "ती...ती जागा दिसते ना, तिथून बीना रॉयला प्रेमनाथनं उचललं. तिला घेऊन तो जो सूं पळत सुटला तो या पायऱ्यांवरून वर चढला. शेवटच्या पायरीवर लढाई...

मग त्यानं एक खास बात सांगितली. बीना रॉयला पळवून घेऊन जाणाऱ्या प्रेमनाथचा पाठ-लाग करणारे जे सैनिक होते, त्यात हा एक होता. त्यानं आम्हाला 'गोवलकुंडा का कैदी' नीट आठवायला सांगितलं. वर लढाई सुरू असताना पायऱ्यांवर तलवारी उगारून उभ्या असलेल्या सैनिकात वरून अमक्या नंबरवर अशा प्रकारचा पोशाख असलेले आपण!

या चित्रपटातला अशा वर्णनाचा तो नेमका आठवणं कठीण होतं. तरी आम्ही सारेजण 'हो-हो' म्हणालो. त्या रोडक्याशा गाईडची छाती फुगून आली.

आपण गाईडला, पाहिजे तर, प्रश्न विचारावे, पण फार खोलातली चिकित्सा करू नये. त्याच्या निवेदनातला रोमांच आपण जपला पाहिजे. त्या घटना इतिहासात अगर पुराणात प्रत्यक्ष घडलेल्या असोत वा नसोत, पण त्याच्या सांगण्यातून आणि आपल्या ऐकण्यातून आपल्या मनात जे घटनाविश्व निर्माण होते, त्याचे आपल्या रक्ताशी एक जिव्हाळ्याचे नाते असते. त्यातून निर्माण होणाऱ्या भावविश्वाशी संपूर्ण मानव-जातीची एक बांधिलकी असते. त्या घटनेच्या सत्यासत्यतेचा विचार या बांधिलकीपुढे गौण ठरतो.

गोवळकोंड्याच्या किल्ल्याच्या परिसरात मध्यभागी म्हणे एक उंच बुरुजासारखी रचना होती. या रचनेच्या उंच टोकावर रात्रीचा पहारे-करी उभा रहायचा आणि टाळी (पुन्हा टाळी ?) वाजवायचा. या परिसराची त्रिज्या, जवळजवळ अर्धा मैल आहे. परिघावर ठराविक अंतराने इतर पहारेकरी ठेवलेले असायचे. या टोकावरच्या पहारे-कऱ्याने वाजविलेली टाळी परिघावरच्या पहारे-कऱ्यांना ऐकायला जायची. मग ते उलट टाळ्या वाजवून प्रतिसाद द्यायचे. त्या टाळ्या या पहारे-कऱ्याला ऐकायला यायच्या. पहाऱ्याचा बंदोबस्त चोख आहे किंवा नाही, हे पाहण्याचा हा प्रकार. त्या टाळ्या इतक्या दूरदूर कशा ऐकायला जायच्या ? पुन्हा वास्तुशास्त्रातलाच चमत्कार!

गाईड हे सांगत असताना याच्याही खोलात आपण जायचे नाही. आपण फक्त कल्पना करायची. एकाने टाळी वाजविणे आणि त्याला अनेकांनी प्रतिसाद देणे, ही तर रोजचीच घटना. पण एखाद्या दिवशी वेगळेही काही घडू शकते. समजा, या टोकावरच्या पहारेकऱ्याला प्रतिसादच मिळाला नाही. म्हणजे, त्याच्या छातीत एकदम धस्स होईल, नाही ? या सर्व पहारेकऱ्यांनी मिळून काही दगा-फटका तर केला नसेल ना ? अशा वेळी हा टोका-वरचा पहारेकरी खाली येत असेल. खालच्या बाजूला बांधून ठेवलेल्या एका दमदार घोड्यावर अलगद उडी घेत असेल. घोडा परिघाच्या दिशेने वळवीत असेल. घोड्याला टाच मारीत असेल.

अनुक्रमणिका

अन् घोडा टाप्टाप् करीत वेगानं परिघाकडे सरकत असेल. रात्रीच्या पातळ चंद्रप्रकाशात हे दृश्य कसं दिसत असेल ?

अन् समजा, टोकावरच्या पहारेकऱ्याकडून टाळीच आली नाही ! परिघावरच्या पहारेकऱ्यांनी खूप वेळ वाट पाहिली असेल. मग एकाच्या मनात भलतीच शंका आली असेल. तो आगल्या घोड्यावर टांग मारून दुसऱ्या पहारेकऱ्याकडे गेला असेल. दुसऱ्याही पहारेकऱ्याला नेमकी तीच शंका आली असेल. तिसऱ्या, चवथ्या पहारेकऱ्यांनाही तीच शंका.

टोकावरच्या पहारेकऱ्याचा खून आला असावा !

मग परिघावरच्या पहारेकऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ माजली असेल. रात्रीच्या पातळ चंद्रप्रकाशात हे दृश्य कसं दिसत असेल ?

ऐतिहासिक वास्तूच्या गाईडला जिवंत मन असावं लागतं.

तसं ते असतंही.

पन्हाळगडच्या गाईडनं संभाजीनं खालच्या दरीत जिथून उडी टाकली ती खिडकी दाखवली आणि खिडकी ते दरी हे अंतर पाहून आमचे डोळे फाटून गेले. पोलादी छातीच्या संभाजीला लाभलेली सिंहाची हिंमत. छत्रपती शिवाजी महाराजांनी संभाजी पन्हाळगडच्या किल्ल्याच्या त्या विशिष्ट खोलीत खरोखरच कैद करून ठेवले होते काय, हा प्रश्न इतिहासातल्या सत्यासत्यतेचा प्रश्न. हा प्रश्न रूक्ष आहे. उरस्फोड करणाऱ्या चर्चेतून उत्तर मिळविण्याचा आहे. कागदपत्रांच्या वर्षानुवर्षाच्या छाननीतून उत्तर सिद्ध होण्याचा आहे. आपल्याला त्याच्याशी काहीच कर्तव्य नाही. आपल्याला कर्तव्य आहे ते त्या गाईडच्या आवेशाशी—आवेगाशी.

मानवी जीवनातल्या एका जीवघेण्या भावनिक आंदोलनाशी आपल्याला कर्तव्य आहे. पितापुत्राचा संघर्ष. एक पराक्रमी बाप आणि त्याच्याहून काकणभर जास्तच पराक्रमी असलेला त्याचा मुलगा या दोघातील मतभेद. न्यायनीतीनं चालणारा राजा आणि न्यायनीतीचं बंधन न मानणारा त्याचा मुलगा यांच्यातील बेबनाव. एक व्रतस्थ बाप आणि त्याचा बेछुट मुलगा यांच्यातील वैदिली.

प्रत्यक्ष पोराला कैदेची सजा फर्मावताना राजांना काय वाटले असेल. हा मानवी प्रश्न आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. हा निर्णय घेताना राजांना छातीवर दगड ठेवावा लागला असेल. पण राजकर्तव्यापुढे माया—ममता झूट. राज्यकर्त्याला नाती नसतात.

हा संघर्ष आपलं मन हेलावून टाकतो. प्रत्यक्ष बापानं कैदेची शिक्षा दिलेली ऐकून संभाजीराजांना काय वाटलं असेल ? गाईड आपल्याला अशा कितीतरी प्रश्नांमध्ये नेऊन सोडतो. संभाजी म्हटलं की डोळयापुढे येतात तुळसा अन् कलुषा कबजी. तुळसा हे संभाजीच्या जीवनातलं रोमांचकारी पान.

आणि संभाजीचा मृत्यू फार फार उदात्त होता, हेही आपल्याला आठवतं. 'इथे ओशाळला मृत्यू.' त्यातील औरंगजेबाच्या मनाचे हेलकावे.

गाईड फक्त सांगतो की, त्या खिडकीतून संभाजीराजांनी उडी घेतली. संभाजीराजांनी खिडकीतून उडी घेण्याचा बेत मनाशी नेमका केव्हा आखला असेल ? त्यांना खूप हिंमत बांधावी लागली असेल काय ? की, सहज करावं तसं त्यांनी हे काम केलं ? गाईड यातलं काहीच सांगत नाही. त्या घटनेच्या वेळी गडावरचे पहारेकरी सावध होते की, बेसावध होते, हेही तो सांगत नाही. एका रोमांचकारी घटनेचं तो एका वाक्यात वर्णन करून टाकतो.

हा गाईड महाराजांच्या शस्त्रागारापाशी थांबतो. पाठीमागे वळतो आणि त्याच्या मागेमागे गेलेल्या लोकांना एक महत्त्वाची माहिती सांगतो— "रणजित देसाई जेव्हा ऐतिहासिक कादंबरी लिहितात, तेव्हा त्यांचं हस्तलिखित सर्वप्रथम ते इथं येऊन मला वाचून दाखवितात."

यावर कोणाचाच विश्वास बसत नाही. त्याला त्याची पर्वा नसते.

पन्हाळगडावर गावच्या नगरपरिषदेचं की पंचायतसमितीचं कार्यालय दिसतं. हे म्हणजे जुन्यावर नव्याचं कलम केल्यासारखं वाटलं. नगर परिषद काय किंवा पंचायत समिती काय—तिथल्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या राजकारणाबद्दल आता

अनुक्रमणिका

कोणाला नव्यानं काही सांगायला नको. स्वराज्या-साठी जीवन वेचणाऱ्या आणि शत्रूंशी लढणाऱ्या महाराजांच्या परिसरात स्वार्थासाठी एकमेकांचे गळे कापणाऱ्या बाजारबुणग्यांचे कलह घडत असतील. तसं तिथं प्रत्यक्षात घडत नसेलही, परंतु कल्पनासाहचर्यामुळं काही अंदाज मनात ठाम ठाण मांडून बसतात.

पण काही हरकत नाही. नव्याला जुन्याशी सहज जोडणारा गाईड बरोबर असताना हे कलम सहज खपवून घेता येईल.

गाईड म्हटलं की, आठवतो हैद्राबादचा सालारजंग म्युझियम. तिथली मोठमोठाली चिलखतं आणि शिरस्त्राणं. ही चिलखतं आणि शिरस्त्राणं घालणारी माणसं कशी विशालकाय असतील नाही ? शस्त्रांचे कितीतरी नमुने सालारजंग म्युझियममध्ये आहेत. कुराणाच्या कितीतरी प्रती. अक्षरांचे किती नमुने. मनगटावरच्या घड्याळात सहज मावू शकेल, एवढ्या आकाराचेही कुराण तेथे आहे. या कुराणाची अक्षरे किती बारीक असतील, याची कल्पनाच केलेली बरी. सालारजंग हा हौशी तसाच जिद्दीचाही माणूस असला पाहिजे. संपूर्ण म्युझियम काळजीपूर्वक पहायला पूर्ण सात दिवस लागतात असं काही लोक सांगतात. काही तीनच दिवस सांगतात. काही तर पंधराही दिवस सांगून मोकळे होतात. आम्हाला अर्ध्या दिवसावर भागवणं भाग होतं.

सालारजंग म्युझियमचं घड्याळ हा कुतूहलाचा विषय. पूर्ण वाजले की, घड्याळाच्या तबकडीवरचे एक दार उघडले जाते. एक यंत्र–माणूस बाहेर पडतो. तो तितक्या वाजण्याचे ठोके देतो आणि आला तसाच शिस्तीत परत मागच्या दरवाजातून आत शिरतो. अशा प्रकारच्या चमत्कारिक यंत्र–मानवाचे घड्याळ आणखी दुसरीकडे कुठे असल्याचे ऐकिवात नाही.

लखनौच्या भूलभुलैय्यात फिरताना गाईड हवाच. कोणती वाट कुठे नेईल, ते सांगता येत नाही. आपण एका दालनातून निघून दुसऱ्या दालनात जातो, दुसऱ्यातून तिसऱ्या दालनात जाण्याकरिता बाहेर पडतो, तर पुन्हा पहिल्या दालनात. भूलभुलैय्यामध्ये गाईडची कामं दोन असतात. एकतर बरोबर आणलेल्या प्रवाशांना, त्यांची फसगत होणार नाही. याची काळजी घेत, नीट फिरवून आणणं आणि दुसरं म्हणजे त्यातील एकेका दालनाचं एकेक महत्त्व विशद करणं. एकाच वेळी अनेक गट भूलभुलैय्या पहात असतात, त्यामुळे आपण चुकून आपला गट सोडून दुसऱ्या गटात सामील होण्याचा धोका असतो. कित्येकदा भलत्याच गाईडला आपण आपला गाईड मानून बसतो. गाईड आपल्या गटातला प्रवासी अचूक ओळखतो प्रवाशांची पंचाईत होते. सर्व गाईड सारखेच दिसतात. भूलभुलैय्याच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराशीच गाईडचे टोळके उभे असते. त्यातला एखादा आपण आपल्याबरोबर घ्यायचा. एकदा पैशाचा ठराव होऊन तो तुमच्याशी बांधला गेला की, पुढे तुम्ही त्याला सोडेपर्यंत त्याचे इमान चोख असते. कित्येकदा तुम्ही कंटाळता, पण तो कंटाळत नाही. नवं काहीतरी दाखविण्याची त्याची हौस सारखी उफाळून येत असते.

या भूलभुलैय्यात एखादा खरोखरच भुलला तर ? नुसती कल्पना केली, तरी आपल्याला भोवळ येते. ही इमारत कधीकाळी एक राजमहाल होता. या राजमहालात राहणाऱ्या राजकुटुंबातला प्रत्येक जण आयुष्यभर या फसव्या वाटांवरून चालला असेल, ही कल्पना मनात येऊन गंमत वाटली. एका मोठ्या दालनात एका बाजूला एका ओळीत भव्य आरसे मांडून ठेवलेले दिसतात. गाईड म्हणाला की, या राजघराण्यातल्या एकेका राजाने आपल्या नावाचा एकेक आरसा तेथे मांडून ठेवला आहे. हे राजे मुसलमान. सहज डोक्यात विचार आला. मुसलमान राजांचा इतिहास जरा विचित्रच आहे. बहुधा आपल्या बापाचा खून करून मुलगा गादीवर बसतो. या राजघराण्यातही असेच झाले असेल. पण एका पिढीतल्या राजाने आधीच्या पिढीतल्या राजाचा आरसा मात्र कायम ठेवला असावा. आरशांवरून या राजघराण्यात एकूण किती राजे झाले असतील, याचा अंदाज करता येत होता. पण हे आरसे राजांचेच होते की, त्यांच्या राण्यांचे ? कदाचित् असेही झाले असेल, एकाच राजाच्या दहाबारा राण्यांपैकी प्रत्येकीने आपला एकेक आरसा मांडून ठेवला असेल. त्या

आरशासमोर ती प्रसाधन करीत असेल. राणीचं प्रसाधन ! राणी अत्यंत देखणी असणार. एकेकीला सजवायला किती किती दासी लागत असतील ? दासीही चोखंदळ असतील. प्रत्येकीला सौंदर्यदृष्टी असेल.

— आणि एखाद्या राणीची नुकतीच वयात येत असलेली सुकुमार कन्याही कधी आरशासमोर उभी राहून गेली असेल. स्वप्न उमलू लागलेले तिचे डोळे तिने आरशात रोवले असतील. स्वप्नात एखादा दूरचा राजपुत्र असेल. कदाचित् पाहिलेला— कदाचित् न पाहिलेलाही. न पाहिलेल्या त्या राजपुत्राचं कल्पनेनंच एखादं चित्र तिनं आपल्या मनाशी रेखाटलं असेल. कल्पनेत दिसणारा तो राजपुत्र हमखास आरशात तरळून जात असेल. अशा वेळी ती लाजून चूर होऊन जात असेल. तिच्या सख्यांच्या नजरा हा मोहोरलेला क्षण अचूक टिपत असतील. सख्या गोड थट्टा करीत असतील. "कोण ग तो ? कोण ? सांग ना–!" ती कदाचित् हळूच सांगत असेल. कदाचित् सांगत नसेलही.

एखादे वेळी ती अशी आरशासमोर उभी असतानाच खरोखरीच तो राजपुत्र प्रत्यक्षात त्या दालनात शिरला असेल. तिनं आरशातच त्याला शिरताना पाहिलं असेल. ती केवढ्यांदा दचकली असेल ! तिच्या सर्वांगातून एक गोड शिरशिरी उमटून गेली असेल. तिने झटक्यात मागे पाहिले असेल. दोघांची दृष्टादृष्ट झाली असेल. या आरशांपैकी एखाद्या तरी आरशानं हा सुंदर क्षण निश्चितच टिपलेला आहे.

गाईड हा सारा तपशील तुम्हाला सांगत नाही. तो जे काही सांगत असतो, त्यातला कच्चा माल घेऊन तुमचं मन त्याचा स्वतःचा एक गाईड तयार करतं. तुमच्या मनानं तयार केलेला हा गाईड मग तुम्हाला आतल्या बऱ्याच गोष्टी सांगतो. हे आरसे जर राजांनी आपल्याकरिता घडविले असतील तर त्यापैकी एकेका आरशासमोर उभा राहून आपले प्रतिबिंब न्याहाळणारा एकेक राजा कसा असेल ? एखादा खूप धिप्पाड असेल. सालारजंग म्युझियममध्ये पाहिलेलं भव्य चिलखत ज्याच्या अंगात फिट्ट बसू शकेल, असा. एखादा रोडकासाही असेल. दाढी मात्र प्रत्येकाला असेल. एखाद्याची काळी, तर एखाद्याची पांढरी. कदाचित् एखाद्याची अर्धवट काळी, अर्धवट पांढरी. दाढीवरून रुबाबात हात फिरविण्याची सवय बहुतेक प्रत्येकालाच असेल. असा हात फिरवितांना प्रत्येकाच्या डोळ्यात एकेक वेगळी चमक दाटून येत असेल. एखाद्याची क्रूर, एखाद्याची रंगेल, एखाद्याची गंभीर ! एखादा आरशासमोर असतांना तलवारीच्या मुठीवर हात ठेवत असेल, तर एखादा औरंगजेबासारखा माळ जपत असेल. या आरशांनी कितीतरी गोष्टी पाहिल्या असतील.

गोमती नदीच्या किनाऱ्यावरचा शहीद–स्तंभ दाखवायला नेणारा गाईड पार विसरूनच गेला होता की, या नदीचं नाव मीनाकुमारीच्या नावाशी जोडलेलं आहे. 'गोमती के किनारे' या चित्रपटात मीनाकुमारी आहे. गोमतीच्या पात्राने मीनाकुमारीचे असंख्य चेहरे पाहिले. एकेका चेहऱ्यावर एकेक भाव. शांत...सोशिक...करुण... प्रेमार्त...प्रणयार्त...विरहार्त......खूप समजूतदार... मनात असंख्य वादळे पेलून धरणारा......

पण वेटा गाईड सांगत होता, गोमतीचं पाणी पार दूषित होऊन गेलं आहे...कानपूर शहराला या दूषित पाण्यामुळं फार मोठा धोका निर्माण झाला आहे.

नव्या औद्योगिक संस्कृतीनं निर्माण केलेल्या अनेक समस्यांपैकी एक समस्या.

लखनौचं चर्च ज्या गाईडबरोबर पाहिलं, तो गंभीर होता. चर्च पाहून बाहेर पडल्यानंतर त्यानं ख्रिस्ती धर्माच्या कथापरंपरेतली एक कथा सांगितली. एका विधवा स्त्रीचा एकुलता एक मुलगा मरतो. ती अशाच एका मोठ्या चर्चसमोर आपल्या मुलाचं प्रेत घेऊन येते. प्रेताशेजारी आकांत करीत बसते. एक धर्मगुरू येतो. विचारतो, "बाई, तू का शोक करतेस ? ती आपला एकुलता एक मुलगा मेल्याचं सांगते. ती उलट त्या धर्मगुरूला विचारते, 'तुझा देव मोठा दयाळू आहे ना ? मग तो आता तोंड लपवून का बसला आहे ? माझं हे एवढं प्रचंड दुःख त्याला दिसत नाही का ?' धर्मगुरू शांतपणे उत्तरतो, 'आई, तो देव आहे ना, तो इथंच आहे. जीझसला जिथे क्रूसावर

टांगलं, तिथं तो होता. सॉक्रेटिसाला जिथं विष दिलं तिथं तो होता. आणि आता जिथं तुझा हा मुलगा मरून पडला आहे, तिथंही तो आहे.' "

गाईड फार भाविक दिसला. तो स्वत: ख्रिश्चन होता. चर्चमध्ये शिरताच त्यानं कपाळाला अन् दोन्ही खांद्यांना उजव्या हातानं स्पर्श केला.

हे चर्च नुसतंच भव्य नाही. त्याची विशिष्ट रचना आहे. प्रथम मोकळं मैदान लागतं. नंतर बऱ्याच पायऱ्या चढून वर जायचं. सर्वात वरच्या पायरीवर आपण जाऊन पोचलो की, खिळे ठोकलेल्या ख्रिस्ताचा भव्य पुतळा एकदम आपल्या-समोर येतो. पांढऱ्या शुभ्र पुतळ्यावर ठिकठिकाणी रक्ताचे डाग. आपण एकदम तो पुतळा पाहतो म्हणून आपल्या मनावर एकदम मोठ्ठा आघात होतो. पुढे चर्चच्या आत खाली उतरण्यासाठी वाहेरच्याइतक्याच पायऱ्या आहेत. त्या पायऱ्यांनी खाली उतरलं की, विस्तीर्ण हॉल. हॉलमध्ये पांढऱ्याशुभ्र वेषातले कितीतरी श्रद्धाळू लोक मनोभावे प्रार्थना करीत उभे होते. विजेच्या प्रकाशाचा नुसता उत्सव चालला होता. आमच्या गाईडनंही थोडा वेळ प्रार्थना म्हटली. आम्ही खूप गंभीर होऊन चर्चच्या बाहेर पडलो. मला उगाचच डॉ. मोझेसची आठवण झाली. त्यांच्या घरात शिरल्यावरोवर येशूचं एक मोठं चित्र असंच एकदम समोर यायचं.

लिटरसी हाऊसमध्ये याच गाईडनं नेलं. तिथलं प्रार्थना–घर त्यानं दाखवलं. हे प्रार्थना–घर सर्व धर्मांसाठी आहे. कोणाही एका धर्माचं असं ते नाही. कोणीही यावं आणि कोणाचीही प्रार्थना करावी. त्यामुळे सकाळपासून रात्रीपर्यंत वेगवेगळे लोक येत–जात असतात. प्रार्थना–घर एकमजली षट्कोनी आहे. भिंती काचेच्या. जाड काचा. वर भक्कम छप्पर. दहा–बारा पायऱ्या चढून जायचं अन् प्रार्थना–घरात शिरायचं. सहा बाजूंना प्रत्येकी दहाबारा पायऱ्या. प्रार्थना–घरात एकही मूर्ती नाही किंवा छायाचित्र नाही.

गाईड म्हणाला, "इथं पूर्वी काहीच नव्हतं, नुसतंच शोभेचं घर होतं हे. काही वर्षांपूर्वी इथं एकानं आत्महत्त्या केली अन् तेव्हापासून हे प्रार्थना–घर बनलं."

आत्महत्त्येची हकीकत त्याच्याच मुखातून ऐकावी. लिटरसी हाऊसपासून अर्धा फर्लांगावर एक सैनिकी चौकी आहे. तिथल्या एका तरुण सैनिकानं इथं येऊन आत्महत्त्या केली. दूर त्याच्या गावी राहणारी त्याची प्रेयसी कॅन्सरनं मेली हे त्याला कळलं आणि त्यानं हे जग सोडलं. उत्कट प्रेमाचीही हकीकत सांगताना गाईड भारावून गेला होता. त्या सैनिकानं नेमकी इथंच येऊन का आत्महत्त्या केली ? कोणतंही कारण का असेना, पण त्यानंतर या जागेचं रूपान्तर प्रार्थना–घरात होणं, हे फार औचित्यपूर्ण होतं. गाईडनं पुढे आणखीच हृदयस्पर्शी कहाणी सांगितली. त्या सैनिकाचा एक मित्र हिमालयातल्या एका लष्करी ठाण्यावर असतो. ज्या दिवशी त्या सैनिकानं आत्महत्त्या केली, त्याच्या नेमका आदल्या दिवशी तो इथं येतो. मित्राच्या मृत्यूच्या दिवशी प्रार्थना–घराच्या एका कोपऱ्यात फुलांची ओंजळ ठेवतो आणि पुन्हा आपल्या ठाण्याकडे परततो. या असल्या भावनावश माणसांचं हे जगच नव्हे. सैन्य हे तर त्यांचं नोकरीचं ठिकाण नव्हेच. असली माणसं वेड्या जगातली असतात.

आपल्या प्रेयसीला कॅन्सर झाला आहे, हे प्रथम कळल्यानंतर त्या सैनिकाला काय वाटले असेल ? की तिने कळविलेच नाही ? त्याला ती कॅन्सरनं मेली, हे एकदमच कळलं ? त्यांचा पत्र-व्यवहार तर चालू असलाच पाहिजे. तिला जेव्हा आपल्याला कॅन्सर झाल्याचं कळलं, तेव्हा तिला काय वाटलं असेल ? तिला त्याची जास्त काळजी वाटली असेल. समजा, तिनं त्याला सुरुवातीलाच कळवलं, आपल्याला कॅन्सर झाल्याचं. त्यानंतरचा त्यांचा पत्रव्यवहार कसा असेल ? जीवनाचं तत्त्वज्ञान त्यातून दुथडी भरून वाहत असेल. दोघांच्याही जीवनाला नकळत उदात्तता येऊन गेली असेल. दोघेही एकमेकांना धीर देत असतील. अन् त्याच्या स्मृतिदिनानिमित्त लांबचा प्रवास करून येणारा आणि प्रार्थना–घरात फुलांची ओंजळ ठेवून जाणारा त्याचा मित्र ?

गाईड कोणाच्याच जीवनासंबंधी काहीच सांगत नाही. आपल्या मनाचा गाईड तिघांची कितीतरी चित्रं रंगवीत राहतो. कितीतरी आयाम

अनुक्रमणिका

या कथेला असतात. ही एक उत्तुंग कथा असते. या दोघांच्या प्रेमाला कदाचित् सुरुवातीला झालेला विरोध. कॅन्सर जाहीर झाल्यानंतर एकदम बदललेलं वातावरण. मग या प्रेमाला जपण्याचा सर्वांचाच त्यांच्या परीनं प्रयत्न. तिला वाचविण्यासाठी चाललेली साऱ्यांची धडपड. इकडे दूरवर याच्या मनाची चाललेली तगमग...

माऊंट अवूहून अचलगडला जायला निघालो, तेव्हा बसचा कंडक्टरच गाईड निघाला. तरूण आणि उत्साही पोरगा. त्या भागातल्या प्रत्येक स्थळाबद्दल सविस्तर माहिती असणारा. स्थळं मात्र सारी पौराणिक. प्रत्येक स्थळाला पुराणकथेचा आधार. अचलगड हे शंकराचं स्थान. इथल्या एका विहिरीत एक गाय पडली. ती विहीर अजूनही आहे. गाय पडल्यानंतर तिला काढण्याचा खूप प्रयत्न झाला. ती काही केल्या हाती लागेच ना. शेवटी वसिष्ठ मुनी शंकराच्या तपश्चर्येला बसले. गाईसाठी जीवदान मागू लागले. वसिष्ठांनी हजारो वर्षे तपश्चर्या केली. ऋषिमुनींच्या तपश्चर्या हजारो वर्षांपेक्षा कमी काळाच्या नसायच्याच. इतकी वर्षे ती गाय विहिरीतल्या पाण्यात जीवंत कशी राहिली, हा प्रश्न आपण गाईडला विचारायचा नाही. गाईडचं काहीच खोटं मानायचं नसतं. तर, वसिष्ठांच्या तपश्चर्येला फळ आलं. शंकर प्रसन्न झाले. वर माग म्हणाले. वसिष्ठांनी वर मागितला, गाईला वाचव. शंकरच ते. त्यांनी आपल्या उजव्या पायाचा अंगठा लावून अरवली पर्वत उचलला. सृष्टीमध्ये प्रचंड उलथापालथ झाली. विहिरीचं पाणी जोरात वर उसळलं अन् बाहेर फेकलं गेलं. पाण्यावरोबरच गायही बाहेर आली.

अचलगडच्या महादेव-मंदिरात शंकराच्या उजव्या पायाच्या अंगठ्याची प्रतिकृती आहे. तिची पूजा करतात. एक मोठे शिवलिंगही आहे. अचलगडचा महादेव हे रजपूत राजांचं आराध्य दैवत. या महादेवाच्या रक्षणासाठी रजपूत राजे प्राणपणानं लढले. शत्रू बलाढ्य आहे आणि आपण उघडउघड लढाई करून महादेवाचं रक्षण करू शकणार नाही, असं लक्षात आलं, तेव्हा शत्रूला फसविण्याकरिता या साऱ्या परिसरावर एक विशिष्ट प्रकारचं आच्छादन टाकलं- जेणेकरून इथं काहीच नाही, असं शत्रूला वाटावं व तो दुसरीकडे निघून जावा. कल्पना फार चांगली. पण एवढं मोठं आच्छादन कसं घातलं असेल ? अन् त्या आच्छादनानं शत्रू खरोखरच फसला असेल का ? गाईडला विचारणं म्हणजे रसभंग करणं. हे सारं रोमांचकारी वर्णन त्याला मोकळेपणानं सांगू दिलं पाहिजे, तुम्ही इतिहास जाणून घेण्यासाठी त्याला अडवाल, तर जीवन तुमच्या हातातून निसटून जाईल. तो एका बाजूने पुराणातल्या अन् इतिहासातल्या घटना, त्याला कळल्या तशा, सांगत असतो आणि दुसऱ्या बाजूनं जीवनाचं अनोखं दर्शन घडवीत असतो. हे दर्शन महत्त्वाचं असतं.

"ते दूर त्या उंच टेकडीवर गुहेसारखं दिसतं आहे ना, ती आहे गोरक्षनाथांची गुहा"- तो मध्ये केव्हातरी सांगतो.

एक निराळाच रोमांच साऱ्या अंगभर सरसरून जातो. गोरक्ष म्हणजे गाईच्या शेणाच्या उकिरड्यात जन्मलेला मच्छिंद्रनाथांचा पट्टशिष्य. महान् योगी. पण तो खरा लक्षात राहतो, तो "चलो मच्छिंदर गोरख आया"- या मृदंगामधून निघणाऱ्या बोलांनी. मच्छिंद्र स्त्री-राज्यात गुरफटलेले आहेत आणि त्यांना तेथून बाहेर काढण्यासाठी गोरक्ष आलेला आहे. तो मच्छिंद्राच्या दरबारात नृत्याच्या तालावर मृदंग वाजवितो आणि मृदंगातून बोल उमटतात, "चलो मच्छिंदर..." मच्छिंद्राला स्त्री-राज्याबाहेर काढण्यात अखेर गोरक्षाला यश मिळतं. स्त्री-राज्याच्या राणीला मच्छिंद्रापासून झालेला मुलगाही सोबत घ्यावा लागतो. प्रवासात मच्छिंद्राने मुलाला धुवून आण म्हणून सांगितल्यानंतर गोरक्षांनी मुलाला अक्षरशः खडकावर आपटून धुतले आणि त्याच्या शरीराच्या चिंधड्या वाळत घातल्या. पुढे मच्छिंद्राचा पुत्रशोक. गुरू-शिष्याचं संभाषण. गोरक्षनाथानं मुलाला जिवंत करून परत आणून देणं.

हे सारं क्षणात नजरेसमोरून तरळून जातं. गोरक्षनाथाची गुहा आपल्या मनात घर करून बसते. कित्येक दिवस ती टेकडी आणि ती दुरून पाहिलेली गुहा आठवत राहते.

अनुक्रमणिका

तसंच ते गुरुशिखर. अरवली पर्वतातलं सर्वात उंच शिखर. दत्तात्रेयांनी इथं तपश्चर्या केली आणि अधिकार प्राप्त झाल्यावर देवादिकांना आणि ऋषिमुनींना जमवून पहिला उपदेश दिला. हजारो वर्षापूर्वीची कथा. गाईड जवळच्या एक पठाराकडे बोट दाखवितो आणि अगदी ठासून सांगतो की, याच ठिकाणी दत्ताचा उपदेश ऐकण्याकरिता देव आणि ऋषीमुनी जमले होते. गुरुशिखरावर दत्ताच्या पादुका आहेत. थोड्या खालच्या अंगाला एक मठी आहे. मठीच्या आत दत्ताची उपासना करणारा एक साधू दिसला. जवळच कुंड पेटून शेवटी उरलेली राख. दत्ताने आपल्या तपश्चर्येनंतर जो मोठा यज्ञ केला होता, त्यातलीच ही राख आहे, असं तो साधू सांगतो. आपण प्रश्न विचारीत नाही. एकतर शिखर चढून थकवा आलेला असतो आणि दुसरे म्हणजे माऊंट अबूला लवकर परतायचे असते.

परतताना 'नख्खी तलाव' दिसतो. हा तलाव आधीही पाहिलेला असतो, परंतु गाईड जेव्हा सांगतो, तेव्हा त्याची जन्मकथा पहिल्यांदा कळते. वाल्मिकी नावाचा एक कवी होऊन गेला. रामायण रचणारा वाल्मिकी कवी वेगळा आणि हा कवी वेगळा. त्याचे इथल्या राजाच्या मुलीवर प्रेम असते. तिचेही त्याच्यावर प्रेम असते. कित्येक दिवस दोघांच्या चोरून भेटीगाठी होतात. शेवटी कवी राजाजवळ जातो आणि त्याच्याजवळ राजकन्येची मागणी घालतो. राजाला हा संबंध पसंत नसतो, तो खूप कठीण अट टाकतो. एका रात्रीतून नखांनी तलाव खणून काढायचा. कवी ती अट मान्य करतो. सूर्य बुडाल्यानंतर नखांनी खणायला सुरुवात करतो. रात्रीतून तलाव खणून होतो. सकाळी सूर्योदयापूर्वीच तो राजवाड्यात दाखल होतो. तलाव खणून झाल्याचं सांगतो. राजकन्या आपल्याला मिळणार, या आनंदानं त्याचं मन भरून आलेलं असतं. तो उत्कंठेनं राजाच्या बोलण्याची वाट पहात असतो.

—आणि राजा सांगतो, "हे लग्न होणार नाही."

राजाचा हा ठाम नकार ऐकून कवीला काय वाटलं असेल ?

काय वाटलं असेल ?

—पण ते सांगण्याची जबाबदारी त्या गाईडची नसते. तुमच्या मनातल्या गाईडची असते.

□ □



उद्गार / शरच्चंद्र मुक्तिबोध

आकाशगंगेच्या काठी
तुझ्यातून डहाळीगत मी आलो
म्हणून तुझ्याविना जे जे काही असते
तिथे तिथे मी नसतो.

रस्त्यावर : झगझगीत तावदानांमागे : पॉश
लोक खातात : खपवतात : नाचतात :
झळकतात : तेव्हा मी आपोआप दूर
होतो : भराभर ताऱ्यांखाली चालू लागतो.

दाट पडद्यांआड : टेबलावर : लॅंपखाली
साकळेल्या सोनेरी वर्तुळात : हिशेबाने
मांडतात : मोडतात : पुन्हा लिहितात : आणि
चष्मा खाली ठेवताना सोनकडा चमकतात :
तेव्हा मी भराभर हवेच्या झोतामधून
झुलत जातो.

तुझी रंगक्रीडा पाहायला : लोक :
लांबलांबून येतात : हसतात : खिदळतात
खिदळत खिदळत : उधळत उधळत
निघून जातात : तेव्हा मी आपोआप दूर होतो :
तुझ्याकडे अपारातून चालत येतो.

साधे फूल : किंवा हसणे थेट आदिवासीचे :
किंवा मुले मजेमजेत बोलत जातात । किंवा
मुलीचा निखळ सलज्ज भाव : किंवा कधी
कोणी कोणास 'ओ' देणे : किंवा जनजन लाटांचे
गंभीर तुफान : हे सर्व तुझे : तुझेच असते
म्हणून मी निरंतर तिथे असतो.

तुझ्या मंत्राने : तंत्राने : तंत्रमंत्राने : मंत्रतंत्राने
हाका देत फार कंठशोष झाला : ग्रंथ ग्रंथ झाले :
आणि तरी तुझे स्रोत, तुझे स्रोत प्रत्यक्षच
अनुभवतो : तुझ्या अभावाचे अंधःकार ओळखतो
आणि म्हणून आपोआप जनजन जीवनाजवळ
असतो.

□ □

भरारी /सुरेश भट

पाहिली खोट्या जिव्हाळ्यांची हुशारी,.
भेटती आमंत्रणेही टाळणारी !

ह्या न माझ्या गुंजणाऱ्या दिव्य ओळी..
ही जगाच्या वेदनांची रागदारी !

बोलतो येथेच मी ह्या दुःखितांशी
हिंड तू "काश्मीर ते कन्याकुमारी !"

घाण देवाची जरी झाली नकोशी
त्याहुनी घाणेरडा आहे पुजारी !

तारकांचा डाव तेव्हा हारलो मी..
काय मी साधासुधा होतो जुगारी ?

जीवना रे जीव का घेतोस माझा ?
मी कुठे केली जगायाची तयारी ?

हे उदारा, माग तू सर्वस्व माझे
ये पुढे ये, चक्रवर्ती मी भिकारी !

मी किती तोंडात थुंकू भुंकणाऱ्या
शेपट्या घालून ते होती फरारी !

पंख माझे लावती आता गिधाडे
ही सुरू पंखाविना माझी भरारी !

□ □

वृथा / कृ. व. निकुंब

वृथा लावितोस दोष
सांगूनही पुनःपुन्हा
ठीक ! उडव कोरडे
माझा असो-नसो गुन्हा !

अंग आक्रसून उभा
सज्ज सोसायला वार–
का रे, करिसी निर्दया,
हवेतच फटकार ?

□ □

कविता/अनुराधा पाटील

ओठ जळून गेलेत सुन्या
आभाळाची धगधगती
निळाई पिताना
आणि संपलेले त्राण.
किती वर्षांत मनापासून
स्वत:शीही बोलले नाही,
असे दिवस आले.
कुणाची निकटता लपेटून
असे माझे
कोमेजून गेलेत प्राण...
आज अवतीभोवती
मनात, धूळच धूळ
मला बहकवत नेलेल्या
या वाटेने
काय काय निघून गेलेत...
किती साधा निरागस
या अथांग व्यथांचा
चेहरा...तुझ्यापेक्षाही
न राहवून
त्यांनाच जवळ केले.

□ □

शरीर हे किती कोवळे/
अनंत अमदावादकर

उरात नभ घेऊनी जळ अथांग झाले जसे
अमोघ ऋतुचुंबनातुन तसे जडावे पिसे
निगूढ तरू सावळे क्षितिजपार झाली दिठी
जीवास भिडते अशी विकल वेदनेची मिठी.

अजस्र तम पाहता शरीर हे किती कोवळे
तरी निभवितो सुखे सगुण मुक्तिचे सोहळे
अशेष क्षण भोगता स्थळी न राहिलो फारसा
धुक्यात गवसे मला मलिन दीप्तीचा आरसा.

उदंड जळ देखिले तळ न पाहिला लोचनी
इथे जळत मी असा कवडसा तुझ्या अंगणी
तुला अमिट पाहता भिजत चांदण्याची उटी
जिवास भिडते अशी विकल वेदनेची मिठी.

□ □

अनुक्रमणिका

विश्व आहे केवढे ? / शिरीष गोपाळ देशपांडे

हीच ती जागा म्हणावी...
– काळ गेलेला पुढे
हीच ती तूही म्हणावी...
– वाढले वय एवढे.

हीच ती आहे नवी की
शांत ही आहे यडी
: शेवटी भिरकावलेले
जीव होते कोरडे

जायचे !... जाऊ कसेही !
शेवटी येऊ इथे :
भेटणे होईल केव्हा ?
विश्व आहे वाकडे !!

हीच ती जागा म्हणावी
– काळ गेलेला पुढे
भेटू या काळांतराने :
विश्व आहे केवढे !?!...

□ □

शापित / पुरुषोत्तम पाटील

ग्रीष्माच्या कढत शापात
आटत आलेला मी.
वाफांनी उसासणारी
माझी व्याकुळ सरोवर–साद
काठच्या काटेरी झुडुपांनी चिरफाळली.
आपल्या अटक–मटक चोची वाशीत
झुडुपांवरच्या शिकारपक्ष्यांनीही
एकच गिल्ला केला–
‘चला जाऊ येथून–
याच्यात मिळायचे नाहीत आता मासे.
(मोजू या खाल्ल्या घरचे वासे
माणसांप्रमाणे.)’

माझ्या तळातला कळवळ्याचा गाळ
अधिकच गच्च झाला
एकुलता एक कमळनाळ कवटाळीत.

□ □

हंगाम माणसांचा / कल्याण इनामदार

गावात कावळ्यांच्या झालाच बोलबाला
“हंगाम माणसांचा दारावरून गेला

झाडास काय आता येतील चार पाने
मातीतला उखाणा पारावरून गेला

खोप्यातल्या पिलांच्या होतील बंद चोची
आवाज कुंपणाच्या तारावरून गेला

टाळूनही कुणाला टळली न वेळ आणि
जखमी करून सारे वारा वरून गेला

नांदेल काय कोण्या पंखात सूर्य–गाणे
आत्ताच काळ काटा दारावरून गेला”

□ □

आरसे / गोविंद केळकर

कशाला-स्मृतींनो मला जागवीता
बिलोरी उभे भोवती आरसे
फिरे हात संवेदना खोल जाता
अरूप तले रूप वेडे हसे

माझ्या घरी आज उपरा असे मी
मला उंबरा जाहला पारखा
कुठे सावलीला उभे झाड नाही
सदाचा असे मी इथे पोरका

वृथा वाळवंटातुनी कोरलेली
पुसोनी जशी जायची अक्षरे
जरी अंतराची जुळे आर्त भाषा
उडोनी पहा चालली पाखरे

मनाला कळेना दिशाहीन बोली
तमाला कसे यायचे बाळसे
कशाला स्मृतींनो मला जागवीता
बिलोरी उभे भंगले आरसे

□ □

पावसाच्या कविता /प्रतिमा कामत

१

किती उदासीन हा
रात्रभर रिपरिपणारा पाऊस
माईलच्या वाळवंटात थरकणाऱ्या
तूतनखामेनच्या प्राचीन स्वप्नासारखा;
इतका निर्मम
की आठवावेत ममीजमधल्या
दु:खांचे उजाड चेहरे...
हे कोण मेणबत्ती हातात धरून निघालेय
पावसासाठी...

२

पावसाच्या खोल तळाशी
घर बांधायचे आपण ठरवले
अन् मोरांच्या लाटा उठल्या,
दिशादिशांत...
मोर : किरमिजी...स्वप्नाळू डोळ्यांचे,
अंधारमग्न नाचणारे

३

तुलाही मोर होता येईल
काळोख शहारून उठेल,
जरा पिसारा फुलवून तर पहा.

४

सुन्न कोसळतो पाऊस
तुझ्या शब्दांसारखा अतर्क्य
अंधारून आले पावसाआधी
की मला आठवतात ढग
तुझ्या मनात साचलेले काळेशार

५

पावसाच्या आर्द्र खुणा राहून जातात मनात
तुझ्या जाण्यानंतरही
तू का दिलीस ही फुलाची जखम
की हृदय ओथंबून वाहू लागावे
तुझ्यासाठी...

६

पावसासारखी थरथरू लागतील
आरशात माझी प्रतिबिंबे
तू स्वत:चा चेहरा पुसू शकणार नाहीस.
मध्यरात्रीची एखादी उदास सर
मनावर सरसरून जाते
ऐन आठवणींच्या मध्यांवर
वाटले होते तू डोळ्यात पकडून ठेवशील
की अश्रूंचा ओला गुलमोहोर व्हावा,
रक्ताचे उष्ण प्रवाह घमघमते...

७

या पावसासारखा तू
संतत झिरपत असतोस मनात
दिवसरात्रींच्या सीमारेषेवर
झाड होऊन उभीय् मी
फांद्या झुकवून

□ □

दंश /प्रफुल्ल शिलेदार

अलवार तुझ्या दु:खाला
फुटली मुसमुसती वाचा
मेघात मनोरा फुटला
झडझडल्या काचा काचा.

किती किती दिसांनी आला
रुधिरात उसळता लोळ
डोळ्यात पुन्हा विरलेला
फडफडला हिरवा जाळ

रंगांच्या तिमिरामध्ये
आंधळ हवाला देती.
पापण्यांत कुठले मेघ ?
तेथे तर माती माती !

दंशही असे भोगावे
गात गात झिम्मड गाणी
डोळ्यांच्या कबरीखाली
हलकेच पुरावे पाणी

□ □

फुटेल पालवी.. / सुनील शिनखेडे

एकट्याने आता
गावे कसे गाणे
हे तर गाऱ्हाणे
रोजचेच !

फुटेल पालवी
घुमेलही शीळ
आतड्यांचे पीळ
सुटतील !

वळणावरती
चोरट्या डोळ्यांनी
वळून पाहणे
थांबेच ना !

तसे आता मागे
राहिले ना काही
पुढे दिशा दाही
विस्तारल्या !

तरी मन दूर
गावातला पूर
पाहुनी डोळ्यात
हेलावते !

रोजच कावळा
दारी गातो गाणे
पेरतो उखाणे
ओळखीचे !

उड रे कावळ्या
येई ना पाहुणा
मीच का शहाणा
भेटलो तुवा !

□ □

कळत नाही / श्रीपाद गंगाधर कावळे

दिसत नाहीत समुद्राला
मिठीत घेऊन गोंजारणारे किनारे
काळोखाला दीपदान देत
जळणारे दिवे इथे नाहीत
दिसत नाहीत बेटे
गलबतांनी क्षणभर विसावा घ्यावा
स्वयेच बहर झडवून ओंजळ भरणारे
पारिजात उरले नाहीत

दिसत नाही चिलखती घालून
फुले जोपासणारी कुंपणे
पक्षांनी निवांत मांडावा संसार
अशी झाडेही दिसत नाहीत
जेथे कुंपणेच चरतात तृणावर,
हरिणांनी तरी कुठे जावे
इथे सारेच दगड शेवाळलेले,
कुठे पाय ठेवावा कळत नाही

□ □

प्रगाढ काळोखाच्या कुशीत
प्रकाश खरात

जन्मदत्त भिक्षापात्रात मरण वाढून घेताना
दौतीतल्या अंशतः विषात
बिनदिक्कत लेखणी बुडवून
स्वमाथी तू सैरभैर प्रारब्ध रेखाटतोयस...

मृत्यूचा पेग स्वहस्ते भरायलाही
गट्स लागतात. नाही ?

प्रगाढ काळोखाच्या कुशीत अंतिम पहुडण्यापूर्वी
विस्मरली जाईल तुझी लुतभरली त्वचा,
नि दुर्गंधले श्वास
तू साजरा कर,
जळण्या मरणातल्या दीपोत्सव
नि अविरत गाण्यातून
आळव आत्यंतिक, तुझी पल्लेदार वेदना,

□ □

सर्कस /बाळकृष्ण बन्नोरे

हत्तीचे कळप झुलत झुंजत
एका मस्तीत रानावनांतून...
या डांबरी सडकांनी
फेकले त्यांना रिंगणात
एका स्टुलावर उभे राहण्यासाठी
हे कळपांचे हत्तीही
माजलेल्या गल्ली बोळातून
या बोडल्या मनावर
करतात कवायत.
त्यांनी उडवलेला चिखल
व गाळलेली लीद–
त्या महाकाय लीदीत
माखलेले विदुषकी चाळे
शिपीत दर्शनी परीट घड्यावर
साशंक स्मितांचे चगदळ;
कणातीबाहेर पसरलेला
अमाप काळोख
घघळीत जातो
हे चिमुरडे कवकडे टिंब
एका थरारणाऱ्या
प्रच्छन्न विराट जवनिकेवर...
आणि आत झुलणाऱ्या कलेवरांच्या
विषण्ण तारांचे जाळे
खिजवीत–
त्या पाळीव शूर्प-कर्णाच्या कळपांना
" अजनबी शाम, दूरसे सलाम "

□ □

आता प्रश्न इतकाच /सुलभा हेर्लेकर

हळूहळू एकेक वार करीत
त्याने मला भावनेच्या दरबारी
नि:शस्त्र करून टाकले...
कुणाच्या सरणावर तक्रार करावी
माझ्याच आकांताची होळी
पेटलेली मी निरखतेय्.
आता प्रश्न इतकाच की,
फुललेला गुलमोहर का
पेटलेला पळस, कुणी मला
लुटले होते,
त्याचे हिशेब तेवढे चुकते करायचेय्...

□ □

अवशेष / नीळकंठ गोडे

तळ नाही बिंब
अधांतरी तोल
शहारला लिंब

मागे पुढे पाय
दिशा पेटलेल्या
अंतरात काय ?

डोळीयाचे लेणे
भग्न प्रस्तराचे
अवशेष जीणे

□ □

कशालागी आता ? / लक्ष्मीकांत तांबोळी

कशालागी आता
मांडिला आकांत ।
तुझी देहवात
जळो आली ।।

कशालागी आता
फुलला मोगरा ।
पक्षी दिगंतरा
जात असे ।।

अवघ्या जन्माची
संपली आरती ।
उजळल्या वाती
विझावया ।।


वाटेल गा जेव्हा
तुझी तुला लाज ।
घेऊन ये साज
मरणाचा ! ।।

□ □

अनुक्रमणिका

मनोहर सप्रे

चार विरामचिन्हे



प्रवास

अनपेक्षितपणे काहीतरी आडवे यावे त्याप्रमाणे बस थांबली आणि गुंगीत असलेले प्रवासी जागे झाले व अफुवाल्ल्या नजरेनं परस्परांकडे बघू लागले. कंडक्टरचा जणू कायम उंचावलेला हात अद्यापही दोरीवर होता. ही घंटी आपल्यासाठी नव्हे ही जाण जसजशी येत गेली तसतसा एकेक डोळा पुन्हा मिटू लागला. बसलेल्या धक्क्यामुळे इतरांप्रमाणेच तोही जागा झाला होता. जड डोळ्यांनी सर्वत्र बघत असताना कंडक्टरचे पापणीहिन डोळे आपल्यावरच रोवून आहेत हे लक्षात येताच तो रामपुरी चाकूच्या खटक्यागत उभा झाला. सुरवातीपासून त्याच्याजवळ स्वत:खेरीज कुठलेही सामान नव्हते तरी केवळ संवयीमुळे त्याने आजुबाजूला बघून घेतले. बसच्या दाराशी पोचताच बाहेर पडणारे त्याचे पाऊल काहीतरी आठवल्यासारखे थबकले व त्याने मानेनेच आत वळून सर्वत्र एकदा ओल्या नजरेने बघून घेतले.. आतले सगळे गॅसचेंबरमध्ये नकळत मृत्यू यावा तसे झोपलेले होते. त्याचे स्थिरावलेले पाऊल बाहेर पडले तसे दार बंद झाले व बस मुळीही आवाज न करता पुढे सरकली. एक डोळा गमावलेल्या एखाद्या हिंस्र श्वापदाने दबत मागे सरकावे त्याप्रमाणे बसचा लाल दिवा अंधाराच्या दिशेने खोल जात नाहीसा झाला. बसमध्ये त्याचे कुणीच नव्हते तरी या क्षणी त्याला अत्यंत एकटे वाटले.

हेडलाईन्स

कुठलेही वृत्तपत्र मी अगत्याने नजरेखालून घालतो याचे खरे कारण मला वृत्तपत्र–स्वातंत्र्याचे खूप आकर्षण आहे, हे जसे नाही तसे मला ती भंपक वाटतात हेही नाही. एक वास्तव म्हणून मी त्यांचा स्वीकार करतो. समोर आले म्हणून त्याच्यावर प्रेम केले या पलिकडे माझी निष्ठा नाही. मला छोटे–मोठे, ताजे–शिळे कुठलेही वृत्तपत्र चालते कारण मला त्यातल्या बातम्या वाचायच्याच नसतात तर नुसतीच शीर्षके नजरेखालून घालायची असतात. आत्ताही माझ्या हाती वृत्तपत्राचे एक पान आहे आणि मजकुराबाबत अधु असलेल्या माझ्या नजरेला त्यातल्या शीर्षकांचा एक क्रम जाणवतो आहे.

"अफवांवर विश्वास ठेवू का —पोलीस आयुक्तांचे आवाहन. जेल भरो आंदोलन शांततामय असेल —बडवाडकर"

मुंबईनामक यातनानगरीत कामगार नावाच्या प्राण्यांचा जीवन—मरणाचा लढा चालू असल्याचे सांगणाऱ्या या शीर्षकाखालीच इतर मुंबईकरांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे एक शीर्षक आहे.

"मंगळ व बुधवारी तीस टक्के पाणी—कपात." केवळ पाचच महिन्यापूर्वी कॉंग्रेस (अर्स) मधून इंदिरा कॉंग्रेसमध्ये दाखल झालेले आमदार अजीज सेठ यांनी विधानसभा सदस्यत्वाचा व पक्षाचा राजीनामा दिल्याचे एक भडक शीर्षक आहे. शीर्षकाखाली या अजीज सेठना एकाएकी ध्येयाचा साक्षात्कार झाल्याची आणि ते जनतेच्या कल्याणाबाबत अतीव चिंताग्रस्त असल्याची बातमी बहुधा असणार.

याच क्षणी "मिरजेत दहा अटकेत" असल्याचे एक शीर्षक आहे. आपण जे काही केले ते का व कशासाठी याची बहुधा त्यांना कल्पना नसणार. कुणालातरी अटक व्हावी ही काळाची गरज असावी आणि या मंडळींनी ती पूर्ण केली असावी. पोलिसांनाही एका संख्येला अटक करायची होती त्यात व्यक्ती कोण हे नगण्य होते. ज्यांच्या कारणाने इतरांना अटक झाली ते पुढारी या अटकेबाबत निषेध नोंदवीत असून अटक झालेल्यांच्या सुटकेची मागणी करीत आहेत असला काहीतरी मजकूर शीर्षकाखाली असावा.

या वृत्तपत्रात सगळ्यात मोठे व वरचे शीर्षक आहे "नामवंत संसदपटु व जनतापक्ष—नेते हरि विष्णू कामत यांचे हृदय—विकाराने निधन." वृत्तपत्रात मध्येच असे एखादे वजावाकीवजा शीर्षक येऊन जाते व त्याखालच्या बातमीचा सांचाही ठरलेला असतो. त्यात नाव—गाव व थोडासा इतर तपशील टाकला की पुरेसे असते. 'ते' कुठे जन्मले, विवाहित की अविवाहित, शिक्षण कुठे व किती, कुणाचे ते अनुयायी होते, त्यांनी आयुष्यभर खपून केलेल्या चार ठळक गोष्टी, मरण्याचे निमित्त आणि ठिकाण, अंत्ययात्रा कोठून निघणार वा निघाली, एका थोराच्या निधनाबद्दल इतर थोरांचे संदेश, त्यांच्या निधनाने देशाचे किती नुकसान झाले याचा एक ढोबळ अंदाज वगैरे. सुदैवाने थोरांचे जन्म आधी ज्ञात नसतात अन्यथा त्यांचीही बातमी आली असती व असल्या बातम्यांची शीर्षकेही बेसुमार राहिली असती.

शीर्षके देशात काय चालले आहे याचा एक ताजा सारांश असतो. जे चालले आहे ते चालू राहावे यासाठी केल्या जाणाऱ्या धडपडी जाहीर करणारीही काही शीर्षके असतात. "भारताच्या संरक्षणासाठी चाळीस मिराज विमानांची खरेदी" हे मी सगळचात शेवटी टिपलेले यातलेच एक शीर्षक.

मधु कुळकर्णी

खूप म्हणजे अक्षरशः अठ्ठावीस—तीस वर्षांनी मधु कुळकर्णी गाडीत भेटला. तो मधु कुळकर्णी असायला आवश्यक असणाऱ्या सगळ्या खुणा त्याच्यातून पार पुसून गेलेल्या असल्यानं एरव्ही समोर तो असता तरी मी त्याला ओळखले नसते. निरोपादाखल स्टेशनवर आलेल्या माझ्या धाकटचा भावाने 'आपल्या गावचे म्हणून' ओळख करून दिल्यावरोवर स्मृतीला परंपरा आली. प्रथमदर्शनीच त्याच्यातल्या उरलेल्या अवशेषातून त्याची एकेकाळची पूर्णाकृती नजरेसमोर आली. मी माझ्या एकेकाळच्या गावी नुकताच रहायला गेलो होतो. त्याच्या कितीतरी आधी मधु मिलिट्रीत गेलेला होता. केवळ ऐकीव माहितीवरून त्याचे खाकी गणवेषातले एक विनचेहऱ्याचे रूप माझ्या डोळ्यासमोर होते. त्याचे माझ्या बरोबरीचे लहान भाऊ रंगीत चकचकीत मण्यांसारख्या पेपरमिंटाच्या गोळचा व कॅरमच्या स्ट्राईकरसारख्या पातळ बिस्कीट—चकत्या आभूषणांप्रमाणे वर्गात आणायचे तेव्हा मधु रजेवर आलेला असे किंवा येऊन गेलेला असे. पुढे युद्ध संपले व मरू न शकलेले घरी परतले त्यात मधु होता. नंतर माजी सैनिक म्हणून भारत-सरकारच्या कुठल्याशा खात्यात त्याला नोकरी मिळाली एवढेच कानावर आले. भराभर वाढून मीही पुढे गाव सोडले. सरकारी पै परस्त्री—समान समजणाऱ्या त्या काळात मधुने काहीतरी लफडे केल्याने नोकरी गमावल्याचे उडत कळले. त्या काळी मीही सरकारी नोकरीचे पातिव्रत्य

स्वीकारलेले असल्याने माझ्यापुरता तरी संपलेला मधु आताच्या क्षणी उत्खननातल्या मूर्तीसारखा अचानक गवसला होता. प्रथमदर्शनीच आम्ही परस्परात आमचे जुने रूप शोधू लागलो. पूर्व-संदर्भाच्या फेरतपासणीत आठवणींना उजाळा आला -आणि परस्परांच्या आयुष्याचा अर्थ शोधण्याचे प्रयत्न झाले. सुरवातीच्या काही क्षणातच मधुने 'आपण सुखी असल्याचे' जाहीर केले. सेवानिवृत्तीनंतर आता 'एक्स्टेंशन' मिळालेले असल्याने व आता नोकरीची तशी गरज नसल्याने ती 'स्वाभिमानाने' कशी करता येते हे त्याने मला उत्साहाने समजावून सांगितले. मुले-चांगली निघालीत म्हणजे वन्शापैकी पगार मिळवताहेत, प्रत्येकाचा मुंबईला स्वतःचा फ्लॅट आहे, सधन कुटुंबातल्या मुली घरी आल्या आहेत आदि सुखाची लक्षणे त्याने पुनरावृत्ती करून सांगितली आणि त्यांचे अध्यात्म मला ऐकवले. मीही असमाधानी-पणाचे नाटक करून त्याला अधिक सुखी केले. पुढे जेवणाच्या वेळी 'बाहेरचे जेवण अपायकारक म्हणून मी घरचेच अन्न सोबत आणतो' हे मी न विचारताही मला सांगून त्याने 'बाहेरचे महाग पडते' हा हिशोब लपविण्याचा प्रयत्न केला. नको म्हणून शेवटी उरणार असलेली एक पोळी त्याने मला सुरवातीलाच ऑफर केली. पण मी हट्टाने नको म्हणाल्याने केवळ फेकू नये वा कुणालाही द्यावी लागू नये म्हणून त्याने ती संपविली आणि 'जरा पडतो' म्हणून तो बर्थवर आडवा झाला. छातीवर हात जुळवलेला त्याचा देह त्याही अवस्थेत असलेले उराशी जपून ठेवण्याचा अट्टाहास दाखवीत होता. मनात विचार आला हा उठल्यावर 'तू खरोखरच सुखी आहे का ?' हे त्याला विचारावे पण नंतर वाटून गेले स्वतःला सुखी समजणाऱ्या एकाला या अनपेक्षित प्रश्नाने दुःखी करण्याचा आपल्याला काय अधिकार आहे ? सुखाची एकेक कल्पना निश्चित करून तिच्या मागे प्राणपणाने धावणाऱ्याला सुखप्राप्तीच्या एका धवलक्षणी ते सुख नसल्याचे आढळून येते. हे नवे ज्ञान पचविण्याची त्याची ताकद तोवर संपलेली असते. मग नसलेले सुख असल्याचे इतरांना व स्वतःलाही पचविण्याची त्याची केविलवाणी धडपड सुरू होते. म्हातारपण नाकारणाऱ्या लावण्यवतीत साज-शृंगाराचा अतिरेक होतो त्यातलाच हा प्रकार. धनाच्या वेडापायी आयुष्याचे कावळ्याचे घरटे करणाऱ्या असल्याच एकाचे उदाहरण मला ज्ञात आहे. 'सोने' हेच आयुष्याचे एकमेव सार झालेल्या या इसमाला एका शोधक्षणी पिवळ्या धातूचा तुकडा सापडतो. सुखाच्या या आत्यंतिक क्षणीं 'हे सोने नाही' हा धक्का त्याला इतर लोक देतात पण वेडात निर्मितीचे एक प्रचंड सामर्थ्य असते. 'सोने नाही' म्हणणाऱ्या सगळ्या शहाण्यांना वेड्यात काढून त्याने नसलेल्यातून सोने निर्माण केले. आपले हे मौल्यवान बोचके छातीशी घेऊन, स्वतःभोवती गुंडाळलेल्या चिंध्या जगावर उगारीत वणवण फिरून त्याच अवस्थेत चेहऱ्यावर तृप्तीचे स्मित पांघरून, वडाच्या झाडाखाली मरून पडलेल्या या वेड्याचा मला चिरंजीव हेवा वाटत आला आहे. माझ्या समोर निश्चलपणे झोपलेल्या मधुच्या चेहऱ्यावरही एक तृप्ती आहे. आताच्या या क्षणी मला मधुचा हेवा वाटतोय्.

एक पत्र

प्रिय बी. विठ्ठल आणि प्रभा,

मुंबईहून परततांना तुम्हा दोघांच्या अल्पशा सहवासातून स्वप्नील रंगांच्या विविध प्रतिमा मी सोबत आणल्या आहेत. तुमची भेट माझ्या आयु-ष्यातल्या अवचितपणे आलेल्या फारच थोड्या सुखद क्षणांपैकी कधी संपू नये वाटावा असा एक क्षण. अचानकपणे मिळालेल्या या सुखद धक्क्यातून मी अद्याप पुरता सावरलो नाही. खरे तर व्यक्ती या नात्याने मला तुमच्याविषयी काहीही माहिती नव्हती. केवळ तुमच्या कलाकृतींच्या माध्यमातून तुमचे एक चित्र मनाशी साकार झालेले होते. प्रत्यक्षातल्या तुम्हाला या चित्राशी ताडून बघ-ण्याची उत्सुकता होती व अजूनही आहे. कला-काराच्या व्यक्तिमत्त्वाचा विस्तार म्हणजेच त्याची कला असे मी मानतो. आपल्या जाणिवेच्या सीमा-रेषांना जे जे स्पर्शून जाते त्याची नोंद घेण्याचा व त्याला अर्थवाही करण्याचा प्रत्येक प्रयत्न कला-प्रकार ठरतो ही माझी कलेची व्याख्या आहे. प्रत्येक कलाकार आपल्या परीने स्वतःच्या अनुभव-विश्वाला अर्थवाही करण्याचा प्रयत्न करीत असतो.

प्रकाशाने उजळलेल्या परिसरात अंधाराच्या एका चौकटीत कुणीतरी कुणाची वाट बघत उभे असावे, छायांच्या पावलांनी आलेल्या रात्रवेळी अत्यंत शांत असे तळे त्यात फेकलेल्या दगडाने कातर-कंपित व्हावे. आपल्या आयुष्याची ही शेवटचीच संध्याकाळ आहे हे कळून आलेल्याने दवाखान्यांच्या खिडकीबाहेरचे तांबडे-पिवळे आभाळ आपल्या थिजत्या डोळ्यांवर नोंदवून घ्यावे, चिंध्यात गुंडाळलेल्या अर्भकाला स्पर्श करतांना राजपदाला तुच्छ करणारा एक क्षण भिकारणीला पकडता यावा, एखाद्या मुग्धेने कुणालाही कळणार नाही अशा एका आठवणीने स्वतःशीच हंसावे, स्मशानातला चाफा भरगच्च फुलून यावा, नक्षत्रांच्या एकाकी छत्राखाली देवाच्या पुत्राने आपले उष्ण श्वास संपवत मानेवरचा ताबा सोडावा, सर्वस्व अर्पण करण्याच्या तयारीने कोसळताना समोरच्या नग्न देहावर कोडाचा डाग आढळावा, चविष्ट मटण खाताना अचानक बोकडाचा जिवंत देह आठवावा, आयुष्यभर साथ देणाऱ्या पत्नीची चिता पेटवताना शालीला गाठ मारलेल्या भरजरी शालूचा पदर मिरवणाऱ्या एका नवयौवनेची आठवण व्हावी या सगळ्यातून मानवी जीवन उसळत-उधळत, ओसंडत-ओघळत, गळत-ठिवकत प्रवाही होत असते. कलावंताला हे सगळेच आव्हान असते. यातले To be चे कोणतेतरी रूप घेऊन तोही जगत असतो व आपल्या या जगण्याचे कलात्मक भाषांतर करीत असतो. जीवनातली विविधता आणि विसंगती. तुम्ही स्वतःला जाळून-पोळून घेतलेले आहे. अशा एका जीवनापासून आम्हाला खूप ऐकणे आहे. केवळ याच कारणासाठी मला तुम्हा दोघांचे खूप आकर्षण आहे. यात चांगली गोष्ट हीच की प्रथमपासून माझा तुमच्या-विषयी कुठलाही समज वा अपसमज नाही. प्रसिद्धीच्या वलयात आलेल्या कुण्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्व विविध प्रसिद्धी-माध्यमातून बनत जाते. ही माध्यमे व्यक्तिभोवती वलये चढवत जातात. या प्रयत्नात बहुधा त्या व्यक्तितला 'माणूस' संपून जाऊन त्या जागी एक कृत्रिम व्यक्ती जन्माला येते. एखादा कलाकार ख्यातिप्राप्त झाला म्हणजे त्याचे मोठेपण त्याच्या सगळ्याच कलाकृतींना प्राप्त होते. यात त्याने कॅनव्हासला ब्रश पुसला तरी ते महान चित्र ठरते. केवळ रसिकच नव्हे तर समीक्षकदेखील कलाकाराच्या प्रसिद्धी-माध्यमातल्या या प्रतिमेला कसे 'रिॲक्ट' होतात याचे हे उदाहरण आहे. संत समजले गेलेल्यांचे वेडेपणदेखील त्याच्या साधुत्वाचा आविष्कार समजले जाण्यासारखा हा प्रकार आहे. माझे सगळे प्रयत्न याउलट आहेत. प्रसिद्धीची पुटे पुसून त्याआड डोकावण्याचा माझा प्रयत्न आहे. यात बरेचदा शेंदुराची पुटे काढल्यावर आंत मारुतीच नसावा असाही अनुभव येतो. असो.

तुमचा,

मनोहर सप्रे

□ □

सामार पोच

आकाशगर्भ / उत्तरा हुद्दार / ज्ञानेश प्रकाशन नागपूर / दहा रुपये / पृ. ६०, अनिकेत / लक्ष्मीकांत देशपांडे / मीनाक्षी प्रकाशन, द्वारा दिवाकर देशपांडे ता. चिखली जि. बुलडाणा / दहा रुपये / पृ. ५१, उंदीरमामाचे लगीन / केशवराव शेजाळ / अर्जूनराव शेजाळ, मनोहर प्रकाशन तिवरंग, ता, उमरखेड जि. यवतमाळ / सात रुपये / पृ. ५६, तळघरातील पाणी / भा. ज. कविमंडन / चेतश्री प्रकाशन अमळनेर / वीस रुपये / पृ. ८०, आक्रोश / सोपान हालमकर / त्र्यं. वा. देशमुख रिमझिम प्रकाशन, भवानीनगर औरंगाबाद / दहा रुपये / पृ. ५४, नार्सिसिस / नारायण पेडणेकर / कस्तुरीमृग प्रकाशन, दादर मुंबई / पंधरा रुपये / पृ. ५४, धांडोळा / शे. दे. पसारकर / महासारंग प्रकाशन, मंगळवार पेठ सोलापूर / बारा रुपये / पृ. ८६.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

कार्यवृत्त (१ सप्टें. ते ३१ ऑक्टोबर, ८३)

३ सप्टें. : पहिली ग्रंथ व्यवहार परिषद, अध्यक्ष डॉ. वसंत वऱ्हाडपांडे व उद्घाटक डॉ. सुरेन्द्र बारलिंगे, याच प्रसंगी नागपूर प्रकाशनचे श्री. दि. मा. घुमरे यांचा सत्कार.

४ सप्टें. : पहिले बाल साहित्य संमेलन. अध्यक्ष डॉ. मो. दा. देशमुख, वरोरा, उद्घाटन— प्रा. वामनराव चोरघडे.

११ सप्टें. : विनोबा जयंती संपन्न. आमदार टी. जी. देशमुख यांनी पूज्य विनोबांचे तैल-चित्र वि. सा. संघाचा भेट दिले. अध्यक्ष श्री. दि. मा. घुमरे, संपादक, तरुण भारत.

२५ सप्टें. : वरोरा—आनंदवनला विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष, सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस व आमंत्रक प्रकाशन समिती यांची संमेलनाच्या पूर्वतयारीबाबत भेट.

दिनांक २५ ते २९ सप्टें. रोजी हिंगणघाट येथील वि. सा. सं. च्या शाखेतर्फे रघुनाथराव आष्टीकर विनोदी—एकांकिका स्पर्धा झाल्यात. रंजन कला मंदिर, नागपूरने सादर केलेल्या "अला-ऊद्दीनची बहीण" या नाटकाला पहिले बक्षिस मिळाले. अभिनयाचे पहिले पारितोषिक पुरुष नटात श्री. रंजू पैठणकर व स्त्री पात्रात सौ. शामला पटवर्धन यांना मिळाले.

२६ सप्टें : शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे श्री. कौला, प्राध्यापक बनारस हिंदु विद्यापीठ, यांचे "पन्नास वर्षाचा महाराष्ट्रातील ग्रंथालयाचा कायदा" या विषयावर भाषण.

१ व २ ऑक्टो. : अचलपूर शाखेतर्फे रानडे आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. फिरती ढाल अमरावतीच्या विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाला तर पहिले व दुसरे वैयक्तिक पारितोषिक श्री. सुहास कुळकर्णी, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती व पूर्णचंद्र भावे वि. रि. कॉलेज ऑफ इंजि. नागपूर यांना मिळाले.

२ ऑक्टो. : कै. वा. सं. गडकरी जन्मशताब्दी समारोह उद्घाटक मा. सुधाकरराव नाईक, शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य. प्रमुख वक्ते माधव गडकरी, संपादक मुंबई सकाळ. स्मृतिग्रंथाचे प्रकाशन— डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांचे हस्ते.

३ ऑक्टो. : "माणुसकी" या चित्रपटातील कलाकारांचा सत्कार. अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर, प्रमुख उपस्थिती न्यायमूर्ती हरिभाऊ धावे—खासदार श्री. वा. धावे यांचे हस्ते पारितोषिक वितरण.

८ व ९ ऑक्टो. : नांझा जि. यवतमाळ येथे जिल्हा साहित्य संमेलन, अध्यक्ष श्री. बाळशंकर देशपांडे, संपादक "वसंत," उद्घाटक ना. सुधाकर नाईक, शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य. या संमेलनाचे आमंत्रक—प्र. मा. रुईकर ट्रस्ट होते. वि. सा. संघाच्या कार्यकारिणीची तिसरी बैठक नांझा येथेच झाली.

१५ ऑक्टो. : प्रबोधन प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कवी अशोक बनसोडे यांच्या "माझ्या बापाचा बाप" या काव्यसंग्रहाचे श्री. सुरेश भट यांचे हस्ते प्रकाशन. खास उपस्थिती प्रा. अनिल सोनार, अध्यक्ष राम शेवाळकर.

२२ ऑक्टो. : विदर्भ साहित्य संघात सुरू असलेल्या उर्दू कोचिंग क्लासतर्फे श्री. के. ए. गफुर यांचे हस्ते प्रमाणपत्र वितरण समारंभ. डॉ. ए. ए. मुन्शी चेअरमन उर्दू अॅकेडेमी, महाराष्ट्र राज्य हे अध्यक्ष होते. या प्रसंगी श्री. एम. एच. शंकार औरंगाबादी, डॉ. गो. मा. कुळकर्णी व डॉ. विनय वाईकर यांची भाषणे झाली.

२० ऑक्टो. : वरोरा येथील वि. सा. संमेलनाचे अध्यक्ष प्रा. गंगाधर पानतावणे यांचा सत्कार. वक्ते प्रा. यादवराव वडस्कर व प्रा. ज्योती लांजेवार, अध्यक्ष राम शेवाळकर.

अनुक्रमणिका

२१ ऑक्टो. : आनंदवन संमेलनात वि. सा. संघाच्या संगीत समिती तर्फे सुप्रसिद्ध कवी ना. घ. देशपांडे यांच्या कवितांच्या गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. भाग घेणारे कलावंत कु. शामला अमरावतकर, कु. सीमा सहस्रबुद्धे, कु. गीता तवनंदी, श्री. शाम देशपांडे, विनायक वाल्दुलकर व सदानंद देशपांडे, या कार्यक्रमाचे सादरकर्ते व संगीत दिग्दर्शक श्री. सदानंद देशपांडे हे असून श्री. विवेक देशपांडे व श्री. वाल्दुलकर (हार्मोनियम) आणि श्री. प्रमोद गुजर (तबला) यांनी साथ संगत केली. (संमेलनाचा अहवाल पुढील अंकात)

माननीयांच्या भेटी :

प्रसिद्ध चित्रकार बाबुराव सडवेलकर यांची कलादालनाला भेट (३-१०-८३) नामदार सुधाकरराव नाईक, शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (२१-१०-८३)

" रंग-सावल्या "

वि. सा. संघाच्या नाट्य विभागाने बसविलेल्या सुप्रसिद्ध कथाकार श्री. जी. ए. कुळकर्णी यांच्या कथेवर आधारित श्री. शं. ना. नवरे यांनी लिहिलेल्या व श्री. रमेश अंभईकर यांनी दिग्दर्शित केलेल्या " रंग-सावल्या " या नाटकाचे दिनांक ११ ऑक्टो. रोजी धनवटे रंगमंदिरात, दिनांक १७ ऑक्टो. रोजी गोंदिया येथे व दिनांक २३ ऑक्टो. रोजी वि. सा. संमेलनात आनंदवन वरोरा येथे यशस्वी प्रयोग झाले. यात भाग घेणारे कलावंत, मृणाल पुराणिक, विजय चवरे, विनय वैद्य, सुरेश घडयाळपाटील, गिरीश ओक, आनंद घारपुरे, कुंदा प्रधान, निर्मिती-सुरेश घडयाळपाटील.

नवीन आजीव सभासद

मनोहर जगन्नाथ मुजुमदार, रवीन्द्र द्वारकानाथ लेले, गंगाधरराव नानाजी भगत, दादी फिरोज दलाल, विनोद शर्मा, हरिष रैना, कृष्णा हरिहर देशपांडे, रवी कृष्णराव देशपांडे, वामन पांडुरंग जोशी, दिलीप वामनराव देशपांडे, डॉ. प्रकाश गोविंदराव पुराणिक, अॅड. विकास श्रीधर शिरपूरकर, सौ. कुमकुम शिरपूरकर, सौ. नीलिमा अजित दिवाडकर, रजनीकांत अच्युतराव सुंकर, गजानन जैरामजी आवळे, श्रीराम नारायणराव बेहरे, गणपतराव अक्काजी हुमणे, हरिराम नारायणराव बेहरे, सौ. अनुजा अरविंद पुराणिक, हरिदास गणपत टेंभुर्णे, माणिकराव दाजीबाजी झोटिंग, प्रा. सौ. दमयंती सुरेश पांढरीपांडे, सुधाकर गोविंदराव बोरीकर, प्रसन्न शांताराम मुजुमदार, प्रभाकर जगन्नाथ गुर्जर, सौ. तारा सावंगीकर, डॉ. भालचंद्र विठ्ठल मोहरील, सौ. विद्यागौरी अनंत खरे, अनंत यशवंत खरे, मंजू हातवळणे, (सर्व नागपूर), प्रदीप देशपांडे, अमरावती, अरुण द्वारकानाथ लेले, वर्धा.

नवीन शाखा

काटोल, दर्यापूर, बनोसा-येवदा, धारणी, रिसोड आरमोरी, बल्लारपूर, भद्रावती, चिमूर, अहेरी, आर्वी, कारंजा घाडगे, पुलगाव, मेहकर, दारव्हा, घाटंजी, राजुरा.

शाखावृत्त

भंडारा : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : श्री. मा. तु. दलाल, उपाध्यक्ष : सौ. सुधाताई कापरे, कोषाध्यक्ष : डॉ. एल. टी. गिन्हेपुंजे, कार्यवाह : श्री. वि. तु. रणदिवे, सहकार्यवाह : कु. माधुरी सुतोने, सौ. शुभदा आगलावे.

नेरपरसोपंत : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : श्री. नामदेवराव दशरथजी मिसाळ, उपाध्यक्ष : दादासाहेब चिलजवार, सरचिटणीस : श्रीरंग गोळे, सहचिटणीस : सुधीर कुळकर्णी, प्रा. पंडीतराव पांडे, खजिनदार : श्री. विलास राखडे.

ब्रम्हपुरी : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : प्राचार्य डॉ. डी. जे. टेंभरे, कार्याध्यक्ष : प्रा. डी. एफ. जगनाडे, उपाध्यक्ष : प्रा. वी. झेड. गजभिये, सरचिटणीस : अरुण मुनशी, चिटणीस : अरुण

कहारे, कोषाध्यक्ष : अनिल भट, आमंत्रक, परीक्षा समिती : रावभाऊ भट, नाट्य समिती : मनोहर शिनखेडे, सांस्कृतिक कार्य समिती : प्रा. बी. जी. रडे.

दारव्हा : नवे पदाधिकारी दारव्हा येथील तालुका नगर वाचनालयात ॲड. दुग्गलवार यांचे अध्यक्षतेखाली श्री. वटेसर यांच्या प्रमुख उपस्थितीत वि. सा. संघाची सभा झाली. अध्यक्ष : श्री. गजानन जितपुरे, उपाध्यक्ष : मा. माधव बालोकर, कोषाध्यक्ष : श्री. मुरेश शेंडे.

उमरखेड : येथे आतापर्यंत वि. सा. संघाचे ५७ सभासद झाले. तीन सभासद आजीव आहेत. त्यांची नावे सर्वश्री प्रा. वा. दा. जोशी, डॉ. मनोहर चिनारवार व शामसुंदर उत्तरवार.

२८–५–८२ ला सावरकर जन्मशताब्दीनिमित्त 'सावरकर जीवनदर्शन' ह्या विषयावर प्रा. बा. दा. जोशी व प्रा. रा. कृ. कुळकर्णी ह्यांची भाषणे आयोजित केली होती. ह्या शिवाय नारद जयंती निमित्ताने ७ जून व ८ जून या दोन दिवशी 'वेदान्त दर्शन' ह्या विषयावर श्री. सीताराम शास्त्री कुंकदकर यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम झाला. दि. १७ ऑक्टो. ८३ ला वि. सा. संघ शाखेचे उद्घाटन वि. सा. संघाचे अध्यक्ष राम शेवाळकर यांचे हस्ते झाले.

काटोल : सर्व साधारण सभा दि. ५–१०–८३ ला सायंकाळी ५ वाजता नबीरा महाविद्यालयात झाली. अध्यक्षस्थानी प्रा. ना. आ. मेंघळे होते.

अस्थायी पदाधिकारी असे, अध्यक्ष श्री. अविनाश वरोकर, उपाध्यक्ष : श्री. प्रा. जे. जी. वंड, श्री. मिलिंद पाटील, सरचिटणीस : प्रा. एस. जी. देशमुख, चिटणीस : श्री प्रा. एन. आर. महाजन, श्री. विजय घाटे, प्रा. एस. पी. चौधरी, कोषाध्यक्ष : प्रा. डी. वी. डोंगरे.

दर्यापूर : अध्यक्ष–सौ. प्रतिमा इंगोले, उपाध्यक्ष–ॲड्. श्रीरंग पाटील, कोषाध्यक्ष–सौ. शांता गणोरकर,, सचिव–श्री. शरद रोहणकर, सहसचिव–श्रीकृष्णा गावंडे.

वरोरा : अध्यक्ष–प्रा. मो. दा. देशमुख, सचिव–प्रा. श्रीकांत पाटील, कोषाध्यक्ष–प्रा. प्रकाश ल. शेंडे.

घाटंजी : अध्यक्ष–सू. शं. वल्लाळ, उपाध्यक्ष–उमाकांत उलटवार, चिटणीस–श्री. बोबडे, कोषाध्यक्ष–दि. द. मोखडकर.

रिसोड : अध्यक्ष–श्री. मा. ह. पांडे, उपाध्यक्ष–श्री. क.रा. टेमधरे, सरचिटणीस–श्री. ग. मा. लक्रस, चिटणीस–श्री. अनंत घाळकर

नेरपिंगळाई : अध्यक्ष–श्री. वा. रा. पाटील, उपाध्यक्ष–श्री. अरूण नेरकर, श्री. अशोक पोटे, सरचिटणीस–श्री. प्रदीप वि. देशमुख, चिटणीस–श्री. विनोद ना. देशमुख, श्री. मधुकरराव वा. चौधरी, श्री. प्रकाश पुंभावळे, कोषाध्यक्ष–श्री. राजेश राठी.

गुरुकुंज मोझरी : अध्यक्ष–प्राचार्य वा. ना. आवारे, उपाध्यक्ष–श्री. प्रमोदराव देशमुख, प्रा. चंद्रशेखर चौधरी, सरचिटणीस–श्री. शामसुंदर भुतडा, चिटणीस–सर्वश्री. सदगुण देशमुख, प्रा. एन. व्ही. देशमुख, श्री. सुरेंद्र मोहोड, कोषाध्यक्ष–श्री रविंद्र वारसकर, आमंत्रक सांस्कृतिक विभाग–श्री. संजय गुवळे, परीक्षा विभाग–एम. एस. गडलिंग, स्पर्धा विभाग–श्री. रत्नाकर सोंडे.

आर्वी : श्री. ल. बा. मोरोणे, उपाध्यक्ष–श्री. म. वा. जाधव, सरचिटणीस–श्री. सु. व्यं. ढाणके, चिटणीस–श्री. या. बा. चौधरी, कोषाध्यक्ष–श्री. भा. रा. दापुरकर,

बल्हारपुर : अध्यक्ष–श्री. वि. मा. गोरंटीवार, उपाध्यक्ष–सौ. रेखा भास्करवारट सरचिटींस–श्री. वि. शा मासटवार, चिटणीस–सौ. सुधा मालधुरे, कोषाध्यक्ष–श्री. अ. च. सोयीतकर.

आरमोरी : अध्यक्ष–प्रा. धर सुपारे, उपाध्यक्ष–श्री. श्री. के. एल. झेले, श्री. आर. ए. बेदरे, सरचिटणीस– प्रा. किशोर सांवरे, चिटणीस–श्री. पी. एस. सोनकर, (सांस्कृतिक विभाग)–प्रा. हितेंद्र चौधरी, (बौद्धिक विभाग)–प्रा. सुरेश खोड, (परीक्षा विभाग)–कोषाध्यक्ष–श्री प्रदीप हेमके.

अनुक्रमणिका

२१ ऑक्टो. : आनंदवन संमेलनात वि. सा. संघाच्या संगीत समिती तर्फे सुप्रसिद्ध कवी। ना. घ. देशपांडे यांच्या कवितांच्या गायनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. भाग घेणारे कलावंत कु. शामला अमरावतकर, कु. सीमा सहस्त्रबुद्धे, कु. गीता तवनंदी, श्री. शाम देशपांडे, विनायक वालदुलकर व सदानंद देशपांडे, या कार्यक्रमाचे सादरकर्ते व संगीत दिग्दर्शक श्री. सदानंद देशपांडे हे असून श्री. विवेक देशपांडे व श्री. वालदुलकर (हार्मोनियम) आणि श्री. प्रमोद गुजर (तबला) यांनी साथ संगत केली. (संमेलनाचा अहवाल पुढील अंकात)

माननीयांच्या भेटी :

प्रसिद्ध चित्रकार बाबुराव सडवेलकर यांची कलादालनाला भेट (३-१०-८३) नामदार सुधाकरराव नाईक, शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (२१-१०-८३)

"रंग-सावल्या"

वि. सा. संघाच्या नाटय विभागाने बसविलेल्या सुप्रसिद्ध कथाकार श्री. जी. ए. कुळकर्णी यांच्या कथेवर आधारित श्री. शं. ना. नवरे यांनी लिहिलेल्या व श्री. रमेश अंभईकर यांनी दिग्दर्शित केलेल्या "रंग-सावल्या" या नाटकाचे दिनांक ११ ऑक्टो. रोजी धनवटे रंगमंदिरात, दिनांक १७ ऑक्टो. रोजी गोंदिया येथे व दिनांक २३ ऑक्टो. रोजी वि. सा. संमेलनात आनंदवन वरोरा येथे यशस्वी प्रयोग झाले. यात भाग घेणारे कलावंत, मृणाल पुराणिक, विजय चवरे, विनय वैद्य, सुरेश घडचाळपाटील, गिरीश ओक, आनंद घारपुरे, कुंदा प्रधान, निर्मिती-सुरेश घडचाळपाटील.

नवीन आजीव सभासद

मनोहर जगन्नाथ मुजुमदार, रवीन्द्र द्वारकानाथ लेले, गंगाधरराव नानाजी भगत, दादी फिरोज दलाल, विनोद शर्मा, हरिष रैना, कृष्णा हरिहर देशपांडे, रवी कृष्णराव देशपांडे, वामन पांडुरंग जोशी, दिलीप वामनराव देशपांडे, डॉ. प्रकाश गोविंदराव पुराणिक, ॲड. विकास श्रीधर शिरपूरकर, सौ. कुमकुम शिरपूरकर, सौ. नीलिमा अजित दिवाडकर, रजनीकांत अच्युतराव सुंकर, गजानन जैरामजी आवळे, श्रीराम नारायणराव वेहरे, गणपतराव अवकाजी हुमणे, हरिराम नारायणराव वेहरे, सौ. अनुजा अरविंद पुराणिक, हरिदास गणपत टेंभुर्णे, माणिकराव दाजीबाजी झोटिंग, प्रा. सौ. दमयंती सुरेश पांढरीपांडे, सुधाकर गोविंदराव बोरीकर, प्रसन्न शांताराम मुजुमदार, प्रभाकर जगन्नाथ गुर्जर, सौ. तारा सावंगीकर, डॉ. भालचंद्र विठ्ठल मोहरील, सौ. विद्यागौरी अनंत खरे, अनंत यशवंत खरे, मंजू हातवळणे, (सर्व नागपूर), प्रदीप देशपांडे, अमरावती, अरुण द्वारकानाथ लेले, वर्धा.

नवीन शाखा

काटोल, दर्यापूर, बनोसा-येवदा, धारणी, रिसोड आरमोरी, बल्लारपूर, भद्रावती, चिमूर, अहेरी, आर्वी, कारंजा घाडगे, पुलगाव, मेहकर, दारव्हा, घाटंजी, राजुरा.

शाखावृत्त

भंडारा : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : श्री. मा. तु. दलाल, उपाध्यक्ष : सौ. सुधाताई कापरे, कोषाध्यक्ष : डॉ. एल. टी. गिन्हेपुंजे, कार्यवाह : श्री. वि. तु. रणदिवे, सहकार्यवाह : कु. माधुरी सुतोने, सौ. शुभदा आगलावे.

नेरपरसोपंत : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : श्री. नामदेवराव दशरथजी मिसाळ, उपाध्यक्ष : दादासाहेब चिलजवार, सरचिटणीस : श्रीरंग गोळे, सहचिटणीस : सुधीर कुळकर्णी, प्रा. पंडीतराव पांडे, खजिनदार : श्री. विलास राखडे.

ब्रम्हपुरी : नवे पदाधिकारी : अध्यक्ष : प्राचार्य डॉ. डी. जे. टेंभरे, कार्याध्यक्ष : प्रा. डी. एफ. जगनाडे, उपाध्यक्ष : प्रा. बी. झेड. गजभिये, सरचिटणीस : अरुण मुनशी, चिटणीस : अरुण

कहारे, कोषाध्यक्ष : अनिल भट, आमंत्रक, परीक्षा समिती रानाभाऊ भट, नाट्य समिती : मनोहर शिनखेडे, सांस्कृतिक कार्य समिती : प्रा. वी. जी. रडे.

दारव्हा : नवे पदाधिकारी : दारव्हा येथील तालुका नगर वाचनालयात अॅड. दुग्रलवार यांचे अध्यक्षतेखाली श्री. वटेसर यांच्या प्रमुख उपस्थितीत वि. सा. संघाची सभा झाली. अध्यक्ष : श्री. गजानन जितपुरे, उपाध्यक्ष : मा. माधव वालोकर, कोषाध्यक्ष : श्री. सुरेश शेंडे.

उमरखेड : येथे आतापर्यंत वि. सा. संघाचे ५७ सभासद झाले. तीन सभासद आजीव आहेत. त्यांची नावे सर्वश्री प्रा. वा. दा. जोशी, डॉ. मनोहर चिनारवार व शामसुंदर उत्तरवार.

२८–५–८२ ला सावरकर जन्मशताब्दीनिमित्त 'सावरकर जीवनदर्शन' ह्या विषयावर प्रा. बा. दा. जोशी व प्रा. रा. कृ. कुळकर्णी ह्यांची भाषणे आयोजित केली होती. ह्या शिवाय नारद जयंती निमित्ताने ७ जून व ८ जून या दोन दिवशी 'वेदान्त दर्शन' ह्या विषयावर श्री. सीताराम शास्त्री कुंकदकर यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम झाला. दि. १७ ऑक्टो. ८३ ला वि. सा. संघ शाखेचे उद्घाटन वि. सा. संघाचे अध्यक्ष राम शेवाळकर यांचे हस्ते झाले.

काटोल : सर्व साधारण सभा दि. ५–१०–८३ ला सायंकाळी ५ वाजता नबीरा महाविद्यालयात झाली. अध्यक्षस्थानी प्रा. ना. आ. मेंघळे होते.

अस्थायी पदाधिकारी असे, अध्यक्ष श्री. अविनाश वरोकर, उपाध्यक्ष : श्री. प्रा. जे. जी. वंड, श्री. मिलिंद पाटील, सरचिटणीस : प्रा. एस. जी. देशमुख, चिटणीस : श्री प्रा. एन. आर. महाजन, श्री. विजय घाटे, प्रा. एस. पी. चौधरी, कोषाध्यक्ष : प्रा. डी. वी. डोंगरे.

दर्यापूर : अध्यक्ष–सौ. प्रतिमा इंगोले, उपाध्यक्ष–अॅड्. श्रीरंग पाटील, कोषाध्यक्ष–सौ. शांता गणोरकर,, सचिव–श्री. शरद रोहणकर, सहसचिव–श्रीकृष्णा गावंडे.

वरोरा : अध्यक्ष–प्रा. मो. दा. देशमुख, सचिव–प्रा. श्रीकांत पाटील, कोषाध्यक्ष–प्रा. प्रकाश ल. शेंडे.

घाटंजी : अध्यक्ष–सू. शं. वल्लाळ, उपाध्यक्ष–उमाकांत उलटवार, चिटणीस–श्री. वोवडे, कोषाध्यक्ष–दि. द. मोखडकर.

रिसोड : अध्यक्ष–श्री. मा. हृ. पांडे, उपाध्यक्ष–श्री. क.रा. टेमधरे, सरचिटणीस–श्री. ग. मा. लक्रस, चिटणीस–श्री. अनंत घाळकर

नेरपिंगळाई : अध्यक्ष–श्री. वा. रा. पाटील, उपाध्यक्ष–श्री. अरूण नेरकर, श्री. अशोक पोटे, सरचिटणीस–श्री. प्रदीप वि. देशमुख, चिटणीस–श्री. विनोद ना. देशमुख, श्री. मधुकरराव वा. चौधरी, श्री. प्रकाश पुंभावळे, कोषाध्यक्ष–श्री. राजेश राठी.

गुरुकुंज मोझरी : अध्यक्ष–प्राचार्य वा. ना. आवारे, उपाध्यक्ष–श्री. प्रमोदराव देशमुख, प्रा. चंद्रशेखर चौधरी, सरचिटणीस–श्री. शामसुंदर भुतडा, चिटणीस–सर्वश्री. सदगुण देशमुख, प्रा. एन. व्ही. देशमुख, श्री. सुरेंद्र मोहोड, कोषाध्यक्ष–श्री रविंद्र वारसकर, आमंत्रक सांस्कृतिक विभाग–श्री. संजय गुवळे, परीक्षा विभाग–एम. एस. गर्डालिंग, स्पर्धा विभाग–श्री. रत्नाकर सोंढे.

आर्वी : श्री. ल. वा. मोरोणे, उपाध्यक्ष–श्री. म. वा. जाधव, सरचिटणीस–श्री. सु. व्यं. ढाणके, चिटणीस–श्री. या. बा. चौधरी, कोषाध्यक्ष–श्री. भा. रा. दापुरकर,

बल्लारपुर : अध्यक्ष–श्री. वि. मा. गोरंटीवार, उपाध्यक्ष–सौ. रेखा भास्करवारट सरचिटीस–श्री. वि. शा मासटवार, चिटणीस–सौ. सुधा मालघुरे, कोषाध्यक्ष–श्री. अ. च. सोयीतकर.

आरमोरी : अध्यक्ष–प्रा. धर सुपारे, उपाध्यक्ष–श्री. श्री. के. एल. झेले, श्री. आर. ए. बेदरे, सरचिटणीस– प्रा. किशोर सांवरे, चिटणीस–श्री. पी. एस. सोनकर, (सांस्कृतिक विभाग)–प्रा. हितेंद्र चौधरी, (बौद्धिक विभाग)–प्रा. सुरेश खोड, (परीक्षा विभाग)–कोषाध्यक्ष–श्री प्रदीप हेमके.

कारंजा (घाडगे) : अध्यक्ष–श्री. सी. शिरभाते, सु. टी. पालीवाल, सचिव–श्री. अ. भा. फाळके, सहसचिव–श्री. द. म. उपाध्याय, कोषाध्यक्ष–न. मा. इंगळे, सभासद–सर्वश्री शिवकुमार म. वाजपई, त्र्यंबक भाऊरावजी ढाले, बा. बा. भुसारी, प्र. श. इंगळकर, रा. द. मरघाडे, सु. अग्रवाल.

बुलडाणा : वि. सा. संघ शाखा बुलडाणा दि. २३–१०–८३ रोजी जळगाव आकाशवाणी केंद्राचे सहाय्यक संचालक श्री. भैया उपसनी यांचा कथा/कविता वाचनाचा कार्यक्रम जिल्हा परिषद सभागृहात झाला. विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. गो. या. सावजी यांनी स्वागत केले.


कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. अरविन्द देशपांडे होते. आभार प्रदर्शन श्री. सर्जेराव चव्हाण यांनी केले.

कविभूषण कै. अण्णासाहेब खापर्डे

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीची विशेष सभा कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अमरावतीला घेण्यात आली होती. कै. खापर्डे यांच्या निवासस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. अमरावतीतील साहित्यिक आणि वि. सा. संघाचे पदाधिकारी या सभेला उपस्थित होते. (मागील अंकात कै. वि. रा. हंबर्डे यांच्या निवासस्थानी सभा झाल्याचे प्रकाशित झाले आहे. सभा खापर्डेंच्या वाड्यात झाली.)


मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस वि. सा. संघ, नागपूर

□ □



२० कलमी कार्यक्रमाव्दारे उपेक्षितांच्या जीवनात नवा प्रकाश

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ४०० ०३२



अनुक्रमणिका